IRBK-0100206

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र २०६

IRBK-0100206

IRBK-0100206

स. ग्रं. ... २०६ ... संगीत नाटक 206

# कृष्णकांचन नाटक.

हें पुस्तक

## वासुदेव वामन खरे

यांनीं रचिलें

तें

IRBK-0100206

**पुणें येथें**

आर्यभूषण छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं

छापिलें व **वासुदेव वामन खरे** यांनीं

मिरज येथें प्रसिद्ध केलें.

शके १८३९. इ. स. १९१७.

किंमत एक रुपया.

# प्रस्तावना.

राष्ट्राचें हिताहित व सुखदुःख आत्मौपम्यानें जाणणें, राष्ट्राच्या बचावासाठीं कोणताही स्वार्थ गमावण्यास न भिणें, हा राष्ट्रधर्म होय. या धर्माचें ध्येय हेंच आहे कीं, राष्ट्रीय संकटाचें निवारण करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. जाति, वर्ण व आश्रम यांचे धर्म जर या कर्तव्याला विरोध करूं लागतील तर त्यांची मातब्बरी मानतां येत नाहीं. हें काम प्रत्येकाचें असल्यामुळें स्त्री किंवा पुरुष, उच्च अथवा नीच, श्रीमंत अथवा गरीब, हा विचार येथें नाहीं. किंबहुना कौटुंबिक बंधनें जर आड येऊं लागतील तर तींसुद्धां कठोरपणानें तोडून राज्यरक्षण करण्यास प्रत्येकानें पुढें सरसावलें पाहिजे. हाच राष्ट्रधर्माचा विषय या नाटकांत मुख्यत्वें वर्णिला आहे.

विजापुरचा अल्पवयी पादशहा सुलतान शिकंदर याची बहीण पादशहाबिबी ही औरंगजेबाच्या मनांत सून करून घ्यावयाची होती. पण त्याचें म्हणणें विजापूरराज्याच्या अधिकाऱ्यांनीं न ऐकल्यामुळें औरंगजेब हट्टास पेटला व त्या राज्याचा विध्वंस करण्यास उद्युक्त झाला. त्या वेळीं आपल्यासाठीं भावाच्या राज्याचा नाश होणें योग्य नाहीं हें समजून ती उदार अंतःकरणाची शहाजादी पादशहाबिबी आपण होऊन मोंगल सैन्याच्या स्वाधीन झाली. ही इतिहासप्रसिद्ध गोष्ट या नाटकाचें संविधानक सुचण्याला कारण झाली.

" चित्रवंचने " प्रमाणें माझें हेंही नाटक रंगभूमीवर आणण्याचें श्रेय 'शिवराज संगीत नाटक मंडळी'नें घेतलें आहे. याही नाटकांतल्या पदांच्या चाली दिल्याबद्दल व पुस्तकांत चित्रें घालण्यासाठीं आपल्या मंडळींतील नटांचे फोटो घेऊं दिल्याबद्दल मी 'शिवराज संगीत नाटक-मंडळी'चे मालक रा. रा. गोविंद सदाशिव टेंबे यांचा आभारी आहें.

मिरज.
ता० २९ नोव्हेंबर सन १९१७.

वासुदेव वामन खरे.

# पात्रें.

## पुरुष.

कृष्णदेव–कैवर्त देशाचा राजा.

कांचन–कृष्णदेवाचा अमात्य व मेहुणा.

नरवाहन–कृष्णदेवाचा मंत्री.

चंचरीक–नरवाहनाचा पुत्र व कृष्णदेवाचा हेर.

सेनापति<br>वकील } – कृष्णदेवाचे अधिकारी.

सारंगदेव–वैवर्त देशाचा राजा.

प्रद्योत–सारंगदेवाचा जहागीरदार.

खद्योत–सारंगदेवाचा नोकर.

## स्त्रिया.

सुमंगला–कृष्णदेवाची पट्टराणी व कांचनाची बहीण.

मधुमालती–सुमंगलेनें बाळगलेली एक मुलगी.

उज्वला–सारंगदेवाची बहीण.

कज्जला–खद्योताची स्त्री.

मल्लिका–खद्योताची कन्या.

शिवाय दोन्ही राजांचे सरदार, सैनिक, शिपाई, माळदार, व इतर नोकर वगैरे.

स्थळें–पद्मनाभक्षेत्र, कांचनपुर, सारंगपुर, इत्यादि.

श्री.

# संगीत कृष्णकांचन नाटक.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

स्थळः—सीमान्त देशांत एका पर्वतावर श्रीपद्मनाभाचें देवालय आहे; त्याच्या आवाराबाहेरच्या बागेचा एक भाग. देवळांत देवाची पूजा-धुपारती चालली आहे.

राग—हिंदोल. ताल—तेवरा.

हार हरिचरणीं । भार भयहर ओपिला कुसुमोपहार ॥ ध्रु० ॥
भ्रमर-संकुल सांद्र-सुम-रस गंध-सुंदर-सुमन सुरुचिर ॥ १ ॥

राग—बहार. ताल—एका.

गहनतम विभु-लीला कवणा कळे ॥ ध्रु० ॥
भ्रमलें पंडित-मंडल मोघ असे मानव-मति-बल आगळें ॥ २ ॥

( प्रद्योत प्रवेश करितो. )

प्रद्योतः—आतां देवाची धुपारती आटपत आली त्याअर्थी उज्वला-देवी देवळांतून बाहेर पडेलच. ती गिरिप्रदक्षिणेला याच वाटेनें जाणार. आज तिला गांठून माझ्या मनोरथाचें साफल्य ती कधीं करणार याबद्दलचें उत्तर तिजकडून वदवलेंच पाहिजे. तिचा भाऊ राजा सारंगदेव याची इच्छा तिनें मलाच वरावें अशी आहे हें प्रसिद्ध आहे. मग हिनें टाळाटाळ कां चालवली आहे हें कांहीं समजत नाहीं.

**राग**–खमाज. ताल–तेवरा.

**मधुर मोहन वचन उपजवि हृदयीं तोष न ॥ ध्रु० ॥**
**हासित लज्जा–लसित लोचन कुटिल–लीलाभरण ।**
**उपजवि हृदयीं तोष न ॥ १ ॥**
**परिणयोत्सव–विधृत–कंकण–पाणि–पद्माकलन ।**
**करि मम सफल जीवन ॥ २ ॥**

( विचार करून ) हो, असें तर नसेलना ? कृष्णदेव राजाचा अमात्य कांचन तिला मागणी घालणार आहे असें मीं ऐकलें आहे. तें जर खरें असेल तर कृष्णदेवाशीं सख्य जोडावें म्हणून त्याच्या मेहुण्याला म्हणजे या अमात्य कांचनाला आपली बहीण द्यावी असें तर सारंगदेवाच्या मनांत आलें नसेल ना ? अथवा खुद्द उज्वलेचें मन मला सोडून कांचनाकडे वळलें नसेलसें कशावरून ? तीही गोष्ट संभवते. होय. तोच तर्क खरा असला पाहिजे. एकूण इतक्या प्रयत्नानें रचलेला माझ्या मनोरथसहस्राचा डोलारा ढांसळून पडला म्हणायचा ! अथवा त्यांत आश्चर्य तरी कसलें ? तरुणीच्या चंचल नेत्रकटाक्षाच्या पायावर रचलेल्या या इमारती अशाच ढांसळायच्या ! आतां उज्वलेची मुद्दाम गांठ घेऊन तूं माझी स्त्री होणार कीं नाहीं हें तरी तिला विचारा कशाला ? हात दाखवून अवलक्षण ! तिला माझें अगत्य नाहीं तर मलाही तिचें अगत्य नाहीं ! हा मी माझ्या स्थळाला निघून चाललों ! ( जाऊं लागतो व पुन्हां परततो. ) पण छे बुवा ! उज्वलेला न कळत जर मला तिचें दर्शन घडण्याचा हा सुयोग आला आहे तर तो फुकट कां घालवावा ? आपण वाटेवरच्या या कुंजांत दडून बसावें आणि ती इकडून जाऊं लागली म्हणजे निवांतपणें तिचें एकदां शेवटचें दर्शन घ्यावें. ( कुंजांत दडून राहतो. मल्लिका धाई धाईनें येते )

**मल्लिका:**–( टाळ्या वाजवून ) छुश् ! हें बघ, ऐकतो आहेसना ? अरेच्या ! हूं नाहीं कीं चूं नाहीं ! कांहीं हालचालसुद्धां करीत नाहींस ! नीघ इथून !

प्रद्यो०:–कां ? माझ्या कां राशीस लागली आहेस बया ! मी इथे उभा राहिलों तर तुझ्या कां पोटांत दुखतें !

मल्लि०:–चंचरीक ! चंचरीक ! काय सांगितलें तुला ?

प्रद्यो०:–( स्वगत ) कोण बाई ही ? ( जाळींतून पहातो. ) ही तर उज्वलेची सखी मल्लिका ! पण ही ज्याला हांक मारते तो चंचरीक कोण ?

मल्लि०:–अरे ! आज नाहीं मला तुझ्याशीं बोलत बसायला वेळ होत. मला दुसरीं कामें आहेत. आजची तुझी खेप फुकट गेली. आतां क्षणभरसुद्धां इथे राहूं नकोस !

प्रद्यो०:–हां ! आतां आलें सारें खटलें ध्यानांत !

मल्लि०:–लबाडा ! जात नाहींस होय ? ( हंसत ) थांब ! तुला धोंडे मारमारून कुंजाबाहेर काढतें !

प्रद्यो०:–बाई ! धोंडेबिंडे मारूं नकोस ! हा मी इथून चालता होतों !

( कुंजाबाहेर येतो. त्यास पाहून मल्लिका लज्जित होते. )

मल्लि०:–प्रद्योतराय, कुंजांत आपण आहां हें मला माहीत नव्हतें. माझी मोठी चूक झाली.

प्रद्यो०:–कांहीं नाहीं. कांहीं हरकत नाहीं ! ( जाऊं लागतो.)

मल्लि०:–छे छे महाराज ! आपण आधीं जाऊं नये. उज्वलाताई गिरिप्रदक्षिणेला निघाल्या आहेत त्या जातांना याच कुंजांत घटकाभर विसावा घेणार आहेत. आपणाला भेटण्याची त्यांना अतिशय उत्कंठा आहे.

प्रद्यो०:–(हर्षानें) खरेंच कीं काय ? काय सांगते आहेस तूं !

मल्लि०:–मी कसें खोटें सांगेन ! इथे क्षणभर उभे रहाल तर मी त्यांना पाठवून देतें. ( जाते. )

प्रद्यो०:–(हंसत स्वगत ) तसें असेल तर क्षणभर कां, वर्षभरसुद्धां उभा राहतों !

उज्वला०:–( गात प्रवेश करिते. )

**राग**–भूप. ताल–त्रिवट.

**आज उगवला मंगल-दिन हा लाभ मजासिं झाला ॥ध्रु०॥**
**प्रिय-मुख-चंद्रालोकें चिंता ।**
**शमली मातें गमे दुरंता ।**
**जिवा सुखावा अतिशय आला ॥ ४ ॥**

( हर्षानें ) प्रद्योतराय, आज इकडे माझ्याच का भेटीकरतां आलां आहांत ?

**प्रद्यो०**:–होय. उज्वले, मी माझ्या दुर्गकांताराला आतांच निघून चाललों हें तुला कळवावें, आणि उभाउभी तुझी शेवटची भेट घ्यावी, म्हणून इथे आलों आहें.

**उज्व०**:–( खिन्न मुद्रेनें ) असें का ! तर मग इकडे येण्याची आपण कृपा करून तसदी घेतली हे माझ्यावर उपकार झाले ! पण हा गांवाला निघून जाण्याचा बेत हा वेळपर्यंत कुठे आपल्या तोंडून ऐकला नाहीं, आणि आतांच हें एकाएकीं जाण्याचें निघालें, याचें कारण काय ? माझ्याकडून कांहीं अंतर पडलें आणि त्यामुळें राग आला असें तर नाहीं ना ?

**प्रद्यो०**:–अंतर पडलें कीं काय झालें तें कांहीं मला समजत नाहीं. पण दिवसेंदिवस मीं तुझ्यापासून दुरावत चाललों एवढें मात्र खरें ! आणि आतां तर मी मुद्दाम दूर अंतरावर रहावें म्हणूनच निघालों आहें !

**उज्व०**:–आपल्या मनांत विकल्प येऊन आपण असे निष्ठुर व्हाल असें वाटत नव्हतें. पण आपल्या मनाला हेंच बरें वाटलें त्याला काय करायचें ? आपला आणि माझा इतकाच ऋणानुबंध होता म्हणावा ! दुसरें काय !

**प्रद्यो०**:–( स्वगत ) माझ्या जाण्यामुळें हिला कांहीं फारसें वाईट वाटत असल्याचें दिसून येत नाहीं. एकूण अमात्य कांचनाबद्दलचा मीं तर्क काढला तो खराच असला पाहिजे ! बरें, आतां आणखी हिच्या मनाचा ठाव पाहूं या. ( उघड ) उज्वले, आतां इथे राहणें मला

नितांत–दुःसह वाटतें. याउपर केव्हांही तुझ्या दर्शनाचा हर्ष मला दुःखसंमिश्रच असणार ! आतां निरोप दे. मला कां थांबवतेस ?

उज्व०:––छे छे ! मी कशाला थांबवूं ? आपणाला मी क्षणभर सुद्धां थांबवूं इच्छीत नाहीं.

प्रद्यो०:—( स्वगत ) हिनें माझी चांगलीच बोळवण केली ! ( जाऊं लागतो. )

उज्व०:–पण थांबा. माझ्या नेत्रांना आपलें हें रमणीय दर्शन शेवटचेंच घडतें आहे हें खरें ना ? तर मग एक वस्तु मी आपणाजवळ मागतें ती तेवढी मला द्यावी. नाहीं म्हणूं नये.

प्रद्यो०:– मी कसा नाहीं म्हणेन ! माग. पाहिजे ती वस्तु माग.

उज्व०:– आपल्या बोटांत ती हिरकणीची लहानशी अंगठी आहे; ती मला पाहिजे.

प्रद्यो०:–( आश्चर्यानें ) काय ! ही अल्प मोलाची अंगठी ! हीच कशाला पाहिजे ? आणखी दुसऱ्या आहेत या फार चांगल्या आहेत. यांतली एखादी माग. किंवा सर्वच काढून देतों.

उज्व०:–नाहीं. नाहीं. मला तीच अंगठी पाहिजे. ती कशाकरतां हें दिल्यावर सांगेन.

प्रद्यो०:–बरें. तुझी मर्जी ! ( अंगठी काढून देतो. ) सांग. सांग. हीच अंगठी तूं कां मागितलीस ?

उज्व०:–( गहिंवरून ) आपण दिसेनासे झालां म्हणजे या अंगठींतली हिरकणी खाऊन मला प्राण देणें भाग आहे !!! मरणाचीं साधनें दुसरीं पुष्कळ आहेत, परंतु आपल्या हातानेंच मरण यावें ही माझी इच्छा ही हिरकणी खाल्ल्यानेंच पूर्ण होणार आहे ! ( शिळेवर बसून रडूं लागते. )

प्रद्यो०: ( बावरून तिच्या जवळ बसून ) हें काय ! उज्वला देवी, ही काय भलतीच गोष्ट तूं मनांत आणली आहेस ! बोल बोल ! कां बोलत नाहींस ? दया कर ! नको ! अशी निष्ठुर होऊं नकोस !

**उज्व०:**–काय बोलूं ! अमात्य कांचन इथे येऊन मला मागणी घालणार आहे हें आपण नाहीं का ऐकलें ?

**प्रद्यो०:**–( स्वगत ) मीं मोठ्या शहाणपणानें म्हणून जो तर्क काढला तो शेवटीं कुतर्कच ठरला एकूण ! ( उघड ) बरें मग ? त्यानें मागणी घातली एवढ्यावरून तूं त्याला प्राप्त होते आहेस असें थोडेंच आहे !

**उज्व०:**–पुढलें भवितव्य कोणीं सांगावें ? त्या मदोन्मत्त कांचनाच्या मनांत माझ्याविषयीं जी दुर्वासना उद्भवली आहे, ती माझ्या जन्माचे धिंडवडे करणार आणि माझ्या अब्रूवर घाला घालणार हें मला कळून चुकलें आहे. ते दिवस येण्यापूर्वी मरण आलें तरी बरेंच म्हणायचें ! किती हो मी अभागी !

**प्रद्यो०:**–उज्वले, तूं उगीच घाबरली आहेस. कांचनाच्या हेतूविषयीं सारंगदेव महाराजांचा मनोदय काय आहे ?

**उज्व०:**–दादाच्या मनांत त्या अमात्याविषयीं अथवा त्याच्या धन्याविषयीं सुद्धां किती तुच्छभाव आहे हें आपणाला माहीतच आहे. त्या बाबतींत मला मुळींच काळजी नाहीं.

**प्रद्यो०:**–तर मग आतां तुला कशाची काळजी राहिली ? प्राण देण्याचा हा असला वेडाविद्रा विचार मनांत सुद्धां आणूं नकोस ! किती झालें तरी तूं सारंगदेव महाराजांची बहीण आहेस. तुला शत्रूचें काय भय आहे ? आपल्या बंधूच्या सामर्थ्यावर विश्वास टाकून स्वस्थ रहा.

**उज्व०:**–( उसासा टाकून ) कशी स्वस्थ राहूं ? हें अफाट राज्य दिसतांना सामर्थ्यवान् दिसतें खरें. पण हें सारें आंतून शत्रूच्या फितुरानें चोहोंकडून पोखरलें गेलें आहे ! होय. माझा भाऊ मला त्या कसाब कांचनाच्या हवालीं करणार नाहीं हें खरें, पण माझा एकटा भाऊ म्हणजे कांहीं सारें राज्य नव्हे ! कृष्णदेवाचें कांचन घेऊन त्याचे मिंधे झाले नाहींत असे अधिकारी, सरदार अगर कर्ते पुरुष आतां या राज्यांत कोणीच राहिलेले नाहींत. कृष्णकांचनानें राजकीय पुरु-

षांच्या नेकीचा आणि स्वामिभक्तीचा सत्यानास पाडला आहे ! वेळ आली तर कोणीही हरामखोरी करून मला शत्रूच्या हवाली करायला चुकायचे नाहींत ! कुणाचा विश्वास धरूं ? एक आपण मला सोडणार नाहीं ही आशा मीं धरली होती. आपल्या पराक्रमाचा आसरा मानून मी खुशाल होतें. ते आपणही निघून चाललांत ! आणि म्हणूनच ही हिरकणी मीं आपणाजवळून मागून घेतली आहे.

प्रद्यो०:—काय ? इथली स्थिति इतकी बिघडली आहे म्हणतेस ?

उज्व०:—अलीकडे आपण इथे रहात नाहीं, दादाच्या भेटीकरतां येतां ते एक दोन दिवस राहून तसेच परत जातां, ह्यामुळें इथे काय काय कृष्णकारस्थानें चालतात हें आपणाला कसें कळावें ?

प्रद्यो०:—उज्वले, स्वतःच्या सुरक्षितपणाबद्दल तुला इतकी भीति वाटते तर ती भीति निवारण करण्याचा सुलभ उपाय तुझ्या हातीं आहे तो तूं कां करीत नाहींस ?

उज्व०:—कोणता उपाय ?

प्रद्यो०:—मी इतके दिवस तुझी प्रार्थना करतों आहें ती मान्य करून माझी सहधर्मिणी हो. आपण आपल्या दुर्गकांतारांत जाऊन बसलों म्हणजे तिथे कांचनच काय, पण महाराज कृष्णदेव येऊन बारा वर्षे झुंजला तरी आम्हांवर त्याचा कांहींएक इलाज चालणार नाहीं.

उज्व०:—नाहीं नाहीं ! असें कसें होईल ? मी राजकन्या आणि राजभगिनी आहें. माझ्या वाडवडिलांनीं वसवलेल्या व संभाळलेल्या या राज्याचा मला अभिमान आहे. माझ्या भावावर आणि या राज्यावर परचक्राचें संकट येऊं पहात असतां केवळ माझा बचाव व माझें सुख मीं पहावें असें आपण म्हणाल तर तें मी कसें मान्य करीन आपणावर माझी अमर्याद प्रीति आहे. आपणाला वरावें हाच माझा निश्चय आहे. पण माझ्या प्राप्तीची हांव धरणारा हा दुरात्मा कांचन राज्यावर जें संकट आणूं पहात आहे, त्याचें निवारण करून आपण माझें भय दूर करावें आणि मग माझें पाणिग्रहण खुशाल करावें. पूर्वी-

च्या राजकन्या स्वयंवरांत पण लावीत होत्या, तसा माझासुद्धां हा पणच आहे. भयार्तांचें रक्षण करणें हें वीरव्रत आहे. मी भयार्त आहें. माझें रक्षण करण्याची हिंमत असेल तर हें वीरव्रत पतकरा! नाहीं तर खुशाल निघून जा! ही माझी अंगठी मला काय सांगेल तें मी करीन!

प्रद्यो०:–माझ्या प्रार्थनेला अनुमोदन देण्याविषयीं तूं आजपर्यंत टाळाटाळ करीत होतीस त्याचें कारण हेंच होतें तर एकूण!

उज्व०:–हेंच. दुसरें कोणचें असणार!

प्रद्यो०:–( स्वगत ) अरेरे! हिच्या मनांत स्वार्थत्यागाच्या केवढाल्या उदात्त कल्पना घोळताहेत आणि मी स्वार्थलंपट होऊन भलभलते संशय घेऊन हिच्यावर उगीच रागावलों होतों! हिनें मला लाजवलें खरें! ( उघड ) उज्वले, तुझा राज्याभिमान आणि कुलाभिमान स्तुत्य नाहीं असें कोण म्हणेल! कांचनाच्या दुरिच्छेपासून तुझें रक्षण करणें हें माझें मुख्य कर्तव्यच आहे. जें वीरव्रत स्वीकारण्याविषयीं तूं मला आव्हान केलेंस तें वीरव्रत मी हौसेनें पतकरतों. महाराज सारंगदेवाची बहीण आपल्या भावाच्या सामर्थ्यावर न विसंबतां स्वसंरक्षणाकरितां माझ्या बाहुबलाचा आश्रय करते यापेक्षां वीराला स्पृहणीय भूषण कोणचें असणार!

राग–अडाना–ताल त्रिवट.

**अभिनव हा प्रेमोल्लासें गौरव वरवा गणिला ॥ ध्रु० ॥**
**प्रबल–नृपाल–बला द्यावा दयितें तोचि मान बाहु-**
**बला मम तूं दिधला ॥ ५ ॥**

कांचनाची काय बिशाद आहे कीं मीं रणरंगधीर प्रद्योतानें तुझ्या रक्षणाचें बिरुद बांधलें असतां त्या मशकानें तुला धरून नेण्याची आशा धरावी!

**उज्व०**:—पहा पहा ! आपण मला जें आश्वासन देत आहां त्याचा अर्थ पुरतेपणानें आपण लक्षांत घेतला आहे ना ? कांचन म्हणजे कोणी सामान्य व्यक्ति नव्हे कीं ज्याचें निवारण करणें आपणाला इतकें सुलभ वाटावें ! त्या दुरात्म्याची आशा तृप्त झाली नाहीं म्हणजे तो आपल्या धन्याचीं म्हणजे कृष्णदेव राजाचीं सैन्यें मला बळजबरीनें नेण्यासाठीं पाठवील. तसें झालें म्हणजे उभय राज्यांमध्यें मोठें भयंकर युद्ध सुरू होईल. कांचनाच्या जुलमापासून माझें रक्षण ज्याला करायचें त्याला या भावी युद्धांत पुढाकार घेऊन शत्रूचा गर्वपरिहार करावा लागेल.

**प्रद्यो०**:—होय होय ! तूं म्हणतेस तो सर्व अर्थ समजूनच मीं तुला आश्वासन दिलें आहे. त्या आश्वासनाची जबाबदारी मीं आपल्या शिरावर घेतली आहे. कृष्णदेव राजा सुज्ञ आहे. केवळ तूं कांचनाचा हिरमोड केलास एवढेंच निमित्त करून तो युद्धास प्रवृत्त होईल हें संभवत नाहीं. तथापि त्यानें तसें केलेंच तरी त्याची काय पर्वा आहे ? श्रीपद्म-नाभाचें स्मरण करून मी प्रतिज्ञा करतों कीं, प्रत्यक्ष कृतांताशीं जरी झगडण्याचा प्रसंग आला तरी बेहत्तर, परंतु संकटापासून तुझें व राज्याचें रक्षण करायला मी बिलकुल कचरणार नाहीं.

**उज्व०**:—या राज्याचें रक्षण करण्याची चिंता माझ्या भावानें वहावी. परंतु त्याचे वाईट नाद सुटत नाहींत; चोहोंकडे फितुर माजल्यामुळें राज्याची काय दुर्दशा झाली आहे हें तो पहात नाहीं; कोणी कितीही सांगितलें तरी त्याचे डोळे उघडत नाहींत; पूर्वीप्रमाणेंच आपण सामर्थ्य-वान् आहों याच भ्रमांत तो असल्यामुळें शत्रूचें त्याला कांहींच भय वाटत नाहीं; हें राज्याचें मोठें दुर्दैव आहे. अशा या संकटाच्या काळांत आपण माझे सहकारी सहचारी सहाय व्हाल असा मीं भरंवसा मानला होता. ते आपण एकाएकीं निघून जातों म्हणालां, त्यामुळें माझी पराकाष्ठेची निराशा झाली. आतां आपण पुन्हां आश्वासन दिल्यामुळें माझें मन प्रसन्न झालें.

प्रद्यो०:–होय होय. राज्याचें रक्षण करण्याच्या कामीं प्रत्येक गोष्टींत माझें तुला पूर्ण साहाय्य आहे व तुझ्या देहाचें रक्षण करणें हें माझ्या जीविताचें मुख्य कर्तव्य आहे हें तूं पक्कें समज. आतां तर तुझें समाधान झालें ना ? आतां ती माझी अंगठी मला परत कां देत नाहींस ?

उज्व०:–(हंसत) राहूं दे ती माझ्याजवळ !

प्रद्यो०:–ती अंगठी तुझ्या बोटांत असलेली जेव्हां जेव्हां मी पाहीन तेव्हां तेव्हां तूं मघांशीं उच्चारलेल्या भयंकर शब्दांचें स्मरण होऊन माझा जीव अस्वस्थ होईल.

उज्व०:–तसें कांहीं आपण मनांत आणूं नये. एवढे आपण धुरंधर वीर मला धीर देणारे व माझें रक्षण करणारे असतां विनाकारण जिवावर उदार होण्याइतकी का मी वेडी आहें ! (हंसत) आपण स्वीकारलेल्या वीरव्रताबद्दल जामीन म्हणून मी ही अंगठी ठेवून घेणार !

प्रद्यो०:–(हंसत) पण तूं माझ्या गळ्यांत माळ घालून मला धन्य करण्याचें आश्वासन दिलें आहेस त्याला जामीन कोण होणार ?

उज्व०:–ही माझ्या गळ्यांतली चंपकमाला ! ही मी आपल्या गळ्यांत घालतें. (माळ काढून हातांत घेते.)

प्रद्यो०:–(हंसत) ही माळ कांचनाची आहे !

उज्व०:–नाहीं. सुवर्णाची आहे. कांचनाच्या दागिन्याचा मला स्पर्श होईल असें आपणाला वाटलें तरी कसें ?

प्रद्यो०:–कांचन या नांवाचासुद्धां इतका तिटकारा ना ? हा तिटकारा कुणाला हास्यास्पद वाटत असेल तर वाटो, पण मला तो प्रीतिदायकच आहे.

उज्व०:–लग्नाच्या वेळीं जेव्हां मी फुलांची माळ आपल्या गळ्यांत घालीन तेव्हां ही माझी सौवर्णी चंपकमाला काढून घेईन. (माळ घालते.)

प्रद्यो०:–मी तुझें पाणिग्रहण करीन तेव्हां तुझ्या बोटांतून माझी अंगठी मी काढून घेईन. याप्रमाणें करार ठरला ना ?

उज्व०:—होय. हा करार पक्का ठरला.

प्रद्यो०:—( हंसत ) उभय पक्षीं करार ठरले, जामीन पटले, हें सारें ठीक झालें. पण सारंगदेव महाराजांकडून या बाबतींत आयत्या वेळेस कांहीं हरकत येणार नाहीं ना ?

उज्व०:—त्याबद्दल आपण बेफिकीर रहावें. ( प्रद्योत दुसरीकडे पहातां पहातां एकदम दचकतो. ) माझ्या भावाच्या गळ्यांतला मी ताईत आहें.

प्रद्यो०:—( दुसरीकडे पहात ) अरेरे ! किती खेदाची गोष्ट ! काय हा घोर अन्याय !

उज्व०:—माझ्या कल्याणाविषयीं व सुखाविषयीं माझा दादा रात्रंदिवस तत्पर असतो.

प्रद्यो०:—( दुसरीकडे पहात ) लुच्चा ! हरामखोर ! मस्तवाल !

उज्व०:—त्याचें तर मला नेहमींचें सांगणें आहे कीं, तुला आणि प्रद्योतरायाला—

प्रद्यो०:—( दुसरीकडे पहात मध्येंच ) देहांत शासन केलें पाहिजे !

उज्व०:—( जवळ जाऊन ) प्रियकरा, मी काय म्हणतें आहें आणि आपण काय बोलतां हें ?

प्रद्यो०:—उज्वले, माझें तुझ्या बोलण्याकडे लक्ष नव्हतें आणि तें आतां लागणारही नाहीं. आधीं मला त्या दुष्ट मनुष्याचें पारिपत्य करूं दे. असल्या अपराधाचें पारिपत्य न करणें हें माझ्या शिपाई बाण्याला क्षणभरसुद्धां खपणार नाहीं.

उज्व०:—कोण कुठला दुष्ट मनुष्य म्हणतां ?

प्रद्यो०:—तो पहा. तो पहा. सरकारच्या निशाणाच्या हद्दींत आलेला माणूस निशाणाला मुजरा न करतां तसाच बेफिकीरपणानें आणि निर्भयपणानें हिंडतो आहे ! निशाणाजवळचे पहारेकरी काय नाहींसे झाले, कीं निजले, कीं मेले ? काय हा अंधेर ! अरे ! अजूनही मुजरा करीत

नाहीं ! दुष्टा ! थांब. थांब. हा मी आलोंच तुझा समाचार घ्यायला ! ( जातो. )

उज्व०:– प्रीति आणि शौर्य या दोहोंत प्रद्योतराय शौर्यालाच अग्रस्थान देतात ही गोष्ट ते मला टाकून तिकडे धांवले यावरून नाहीं का उघड होत ? पण याचें मला नाहीं वाईट वाटत ! हल्लींच्या काळांत यांनीं माझ्या प्रीतीपेक्षां आपल्या शौर्यालाच अधिक जपावें हेंच बरें ! केवळ स्वकीय सुखाची अपेक्षा बाळगणारें यांचें हें शौर्य खाणींतल्या हिऱ्याप्रमाणें ओबडधोबड असूनसुद्धां तेजस्वी आहे. याच शौर्याला प्रीतीच्या हत्यारानें मी देशाभिमानाचे पैलू पाडीत आहें त्यामुळें यांच्या या शौर्याचें तेज सहस्रपटीनें देदीप्यमान नाहीं का होणार ? आणि ह्याच शौर्याचें मौल्य सहस्रपटीनें नाहीं का वाढणार ? ( पाहून ) अहाहा ! प्रद्योतरायांची वीरश्रीनें चालण्याची ढब किती मोहक आहे ! यांच्याकडे एकसारखें पहात उभें रहावेंसें वाटतें ! तो दूर अंतरावर निशाणाच्या आसपास हिंडणारा माणूस दिसतो आहे तोही बेगुमान दिसतो ! अंगांत तशीच रग असल्याखेरीज सरकारच्या निशाणाला मुजरा न करण्याचा अपराध कोण करणार ? आतां या दोघांची खडाजंगी झाल्याशिवाय रहात नाहीं ! पण असल्या कामांत आजच प्रद्योतरायांनीं आपला जीव धोक्यांत घालावा हें ठीक नाहीं. याकरतां ही लढाई थांबवलीच पाहिजे ! छे. छे ! नाहीं ग बाई मी असला मोहरा कधीं गमावायची !

राग–मुलतानी. ताल–त्रिवट.

चंद्र हा होय नव सुखमय नयना । शिकवि जना प्रणय-भावना ।
संतत करि दर-तिमिर-नाशना । स्वांत-शांति-कर नितांत ॥ ध्रु० ॥
क्षय-परिचय नच गत-कलंका
ग्रहण-भय-शंका अमृत-वचन
उदयन निशिदिन सूर्य-नाम-धर ॥ ६ ॥

---

## प्रवेश २ रा.

**स्थळः**—पर्वताचा पायथा.

( कुबड्या यात्रिकरूचें सोंग घेतलेला कृष्णदेव भजन गात येतो. )

**राग**—पिलू. ताल—धुमाळी.

**सतत मना भज यदु-पति-चरणा ॥ ध्रु० ॥**
**दुनिया झूटी तुज वांचविना ।**
**कोण चुकाविल जनि-मरणा ॥ १ ॥**
**काळ-व्याळा कोठुन करुणा ।**
**शरण सख्या जा भय-हरणा ॥ ७ ॥**

**कृष्णदेवः**—या स्थळाचें काय हें पवित्र सौंदर्य ! तें पद्मनाभजीचें मंदिर, या विस्तीर्ण वनराजि, हे मंद्रमंजुळ गर्जना करणारे जलप्रपात, हें पुण्यपावन पद्मतीर्थ, पर्वताचीं हीं तृणाच्छादित शिखरें, हीं सर्वच स्थळें सुंदर असून श्रीपद्मनाभाच्या सान्निध्यानें पूज्यता पावलीं आहेत. या ठिकाणीं संचार करीत असतां कांताकनकादि सामान्य वस्तूंपासून तों मोठमोठ्या राज्यांच्या उलथापालथीपर्यंतच्या नानाविध विषयांचें चिंतन करण्यांत शीण पावलेलें मन सांसारिक व्याप विसरून जातें, आणि प्रसन्न होऊन सात्विक आनंदातिशयांत डुलत राहतें ! ( पडद्यांत शब्द होतो—"अरे दुष्टा ! थांब, थांब. सरकारच्या निशाणाचा तूं काय म्हणून उपमर्द केलास याचा जबाब दे." ) आं ! माझ्या मनोवृत्तीचा—या कृष्णदेव राजाच्या सात्विक मनोवृत्तीचा—भंग करणारा हा अधिक्षेप कुठून कुणाला उद्देशून होत आहे बरें ! ( पाहून ) अरेच्या ! हा तर कोणी एक वीरश्रीनें धुंद झालेला माणूस तरवार उपसून माझ्यावरच चालून येतो आहे ! ( तरवार उपसतो. प्रधान येतो. )

**प्रधा०**:—घमेंडखोरा ! सरकारच्या निशाणाचा तूं काय समजून उपमर्द केलास याचा जबाब ही माझी तरवार तुला विचारीत आहे.

कृष्ण०:—तरवारीला जबाब तरवारीनेंच दिला पाहिजे ! चल ये !

( दोघे लढूं लागतात. शिंग वाजतें. )

प्रद्यो०:—अरे लढाई बंद कर ! ( तलवार म्यानांत घालून चालूं लागतो. )

कृष्ण०:—बरें आहे ! तुझी मर्जी ! लढाई तूंच सुरू केलीस आणि तूंच बंद करतोस तर होऊं दे बंद ! इथे कुणाला लढण्याची हौस आहे ! आम्ही गरीब यात्रेकरू आहों तरी जिवावरच बेतलें म्हणजे लढणें भाग पडतें ! एरवीं आमच्या पेशाला हा तामसी वृत्तीचा व्यवहार शोभत नाहीं हें तूं जाणतोसच. (तलवार म्यानांत घालतो.)

प्रद्यो०:—( कृष्णदेवाचा हात धरून ) चल चल ! इथे क्षणभरसुद्धां आपणाला उभें राहतां येत नाहीं. तूं यात्रेकरू असतां या बाजूला आलास कसा, याच बुचकळ्यांत मी पडलों आहें. तूं नवखा दिसतोस, याकरितां या जंगलाबाहेर पडण्याची वाट मी तुला दाखवतों. चल. ( चालूं लागतात. ) सर्व लोकांनीं निशाणापासून दोन हजार पावलांच्या अंतरांत आलें असतां निशाणाला मुजरा केल्याखेरीज जाऊं नये असा इथला कायदा आहे तो तूं कां मोडलास ?

कृष्ण०:—मला गरीब यात्रेकरूला काय करायचे तुमचे कायदे आणि बैदे ! मला वाटलें माझ्यासारख्या यात्रेकरूला या कायद्याची माफी असेल ! बरें. तें असो. तें शिंग काय वाजलें, आणि तूं लढाई काय बंद केलीस, हें कांहीं मला समजलें नाहीं.

प्रद्यो०:—सांगतों एक. राजाच्या कुटुंबांतलीं माणसें जेव्हां बाहेर हिंडायला निघतात तेव्हां त्यांच्या मार्गांत हें शिंग वारंवार वाजत असतें. जेथवर हें ऐकूं जातें तेथवरच्या प्रदेशांत कोणीही तंटाभांडण, लढाई करीत असेल तर त्यानें तें तत्काळ बंद करून शिंगाच्या आवाजाच्या हद्दीबाहेर गेलेंच पाहिजे, असा इथला नियम आहे. राजभगिनी उज्वलादेवी गिरिप्रदक्षिणेकरितां निघाली आहे आणि त्याची सूचना देण्या-

करतांच हें शिंग वाजलें. या साध्या गोष्टीसुद्धां तुला माहीत नाहींत यावरून तूं या देशचा मनुष्य दिसत नाहींस.

**कृष्ण०:**—तुझें अनुमान बरोबर आहे. मी कैवर्त देशांतला मनुष्य आहें. मला इथले रिवाज कुठून माहीत असणार ?

**प्रद्यो०:**—(साशंक मुद्रेनें) कैवर्त देशांतला ? तूं तिथे कोणता धंदा करतोस ?

**कृष्ण०:**—माझा धंदा तुला काय करायचा ?

**प्रद्यो०:**—अरे, धंद्यावरून माणसाची पारख ! तूं माझ्याशीं निःशंकपणें बोल. कांहीं फिकीर नाहीं.

**कृष्ण०:**—पूर्वीं मी कृष्णदेवाच्या सैन्याचा सरदार होतों. पुढें त्या कामाचा कंटाळा आल्यामुळें, रत्नपारख्याचा वडिलार्जित धंदा होता तोच करूं लागलों.

**प्रद्यो०:**—तरी मला वाटलेंच ! तूं असा उतारवयाचा कुबडा दिसतोस तरी अजून चांगला कणखर आहेस कीं रे ! तुझें नांव काय ?

**कृष्ण०:**—लोक मला कुबडाशेट म्हणत असतात. त्याच नांवानें मला हांक मारलीस तरी चालेल.

**प्रद्यो०:**—कुबडाशेट ! हें कसलें नांव ! हें टोपण नांव झालें. तुझें खरें सबंध नांव काय असेल तें सांग.

**कृष्ण०:**—(हंसत) अरे, माझ्या त्या नांवाची बरीच भानगड आहे. सांगूंच का तें तुला ?

**प्रद्यो०:**—सांग सांग. तुझें नांव, तुझ्या वडिलांचें नांव, आडनांव, सगळें मला ऐकूं दे.

**कृष्ण०:**—बरें आहे. तूं विचारतोस त्या पक्षीं सबंध नांव सांगणें भाग आहे. ऐक. माझें नांव संग्राम–रंग–रंजित–चित्र–चारित्र्य !

**प्रद्यो०:**—(स्वगत) खरें नांव सांगत नाहीं ! कांहीं तरी थाप देतो आहे.

कृष्ण०:–वडिलांचें नांव मौक्तिक–माणिक्य–पट्ट–भट्टारक !

प्रद्यो०:–( स्वगत ) भले थापाडे !

कृष्ण०:–उपनांव धर्म–शर्मावदात–कीर्ति–वर्म ! सबंध नांव संग्राम–रंग–रंजित–चित्र–चारित्र्य मौक्तिक–माणिक्य–पट्ट–भट्टारक धर्म–शर्मा॰वदात–कीर्ति–वर्म !

प्रद्यो०:– ( हंसन ) अबब ! किती लांबलचक नांव सांगतोस हें !

कृष्ण०:–कांहीं हरकत नाहीं. पुन्हां सांगतों. संग्राम–रंग––

प्रद्यो०:–राहूं दे कीं तुझें तें नांव ! त्यापेक्षां मला आपला कुबडा-शेटच बरा वाटतो !

कृष्ण०:–तें मी तुला प्रथमच बोललों होतों. तूं माझें नांव विचारलेंस त्याअर्थी तुझेंही नांव विचारण्याचा मला हक्क पोंचतो. तुझें नांव काय ?

प्रद्यो०:–माझें नांव प्रद्योत. सबंध नांव तुला काय करायचें ?

कृष्ण०:–कांहीं जरूर नाहीं. तूं नांव सांगितलेंस एवढ्यावरून तूं कोण कुणाचा हें सर्व मला कळलें आहे. तूं दुर्गकांताराचा जहागीरदार. तुझ्या बापाचें नांव भीमसेन. आईचें नांव सुनंदा. आजाचें नांव उग्रसेन तुझा बाप फार वर्षांपूर्वी कृष्णदेवाचा सरदार होता. खऱ्या ना या गोष्टी ?

प्रद्यो०:–( आश्चर्यानें ) होय. तूं म्हणतोस हें सर्व खरें आहे. पण तुला ही माहिती कुठून कळली ?

कृष्ण०:–कुठून कळली, कशी कळली, हें तुला काय करायचें ? प्रद्योता, भीमसेन माझा जिवलग मित्र होता; आणि त्याचा तूं पुत्र आहेस, त्यामुळें तुझ्याविषयीं माझ्या मनांत वात्सल्य उत्पन्न होतें. मी तुझ्या हिताची एखादी गोष्ट सांगितली तर ऐकशील काय ?

प्रद्यो०:–तुझें काय म्हणणें आहे तें सांगशील तर खरें ! ऐकणें न ऐकणें माझ्या मर्जीवर आहे.

कृष्ण०:–प्रद्योता, तूं शूर आणि भला मनुष्य आहेस. तूं हें राज्य सोडून कृष्णदेवाची चाकरी कां पतकरीत नाहींस ?

प्रद्यो०:—तूं बोलतोस हीच गोष्ट कृष्णदेवाच्या दूतांनीं यापूर्वी अनेक वेळां माझ्याजवळ काढलेली आहे. आणि प्रत्येक वेळीं ते फजीत होऊनच परत गेले आहेत.

कृष्ण०:—तर मग तूं वेडा आहेस. अरे, आपण शिपाई गडी. आपल्याला हें राज्य काय नी तें राज्य काय ! तूं कृष्णदेवाच्या नोकरीला राहत असशील तर द्रव्य व अधिकार या बाबतींत इथल्यापेक्षां तुझा तिथे दसपट फायदा होईल.

प्रद्यो०:—आपलें स्वराज्य सोडून कोणच्याही लाभासाठीं शत्रूची चाकरी धरणें ही देखदेखत हरामखोरी आहे. या राज्यांतल्या बहुतेक प्रमुख लोकांची नेकी कृष्णदेवानें सोन्याच्या पिंजऱ्यांत अडकवून ठेविली आहे हें खरें आहे, पण इथले सर्वच लोक असे कृतघ्न आहेत असें तूं समजूं नकोस; आणि या बाबतींत माझ्याशीं शब्दही बोलूं नकोस. असल्या गोष्टींची मला फार चीड आहे.

कृष्ण०:—बरें, तें राहिलें ! स्वदेश सोडून कृष्णदेवाकडे चाकरीत येण्याचें तुझ्या मनांत नसेल तर राहूं दे. पण इथे बसल्या बसल्या कृष्णदेवाची तैनात घ्यायला तुझें काय जातें ? तूं सारंगदेवाची मनःपासून चाकरी करूं नकोस आणि कृष्णदेवाची मुळींच करूं नकोस ! दोहोंकडची चाकरी करायला नको, आणि दोहोंकडची तैनात फुकटची फुकट ! कां ? खाशी सोय आहे कीं नाहीं !

प्रद्यो०:—बस ! पुरे कर तुझी वटवट ! कृष्णकांचनाच्या लोभाला गुंतून स्वदेशाचा द्रोह करणारा हा प्रद्योत आहे असें तूं समजतोस त्याअर्थी तूं फार नीच मनुष्य आहेस. तुझें पारिपत्य करणें जरूर होतें, पण माझ्या वडिलांचा आपण जिवलग मित्र असल्याचें तूं सांगतोस त्यामुळें एक वेळ मी तुला क्षमा करतों. तूं पुन्हां माझ्यापुढें तोंड दाखवायला येशील तर पश्चात्ताप पावशील.

राग–सारंग. ताल–एका.

प्रेम-हेमिं तव होइ नीच जना ॥ ध्रु० ॥
शील-धना मज मोहि न कनक-शैल कोंवि
हें कळे पिशुना ॥ ८ ॥

कृष्ण०:–बरें आहे बुवा ! तुझें कल्याण करायला गेलों त्याबद्दल तूं माझी चांगलीच पूजा केलीस ! खासा न्याय !

प्रद्यो०:–आतां तुला जंगलाबाहेर आणून सोडलें आहे. तुला रस्ता सांपडेल ना ? हा मी परत चाललों.

कृष्ण०:–आतां तुझ्या सोबतीचें मलाही कारण नाहीं. हा यात्रेकरू येतो आहे हा माझा मित्र आहे. याला हा प्रदेश चांगला माहीत आहे. ( नरवाहन येतो. ) कृष्णदेवाची चाकरी करण्याचें तुझ्या मनास येत नसेल तर माझाही आग्रह नाहीं. पण तुझ्यावर कांहीं तरी उपकार करावा असें त्या राजाच्या मनांत आहे आणि माझा त्या राजाजवळ उत्तम वशिला आहे. याकरितां मी तुला अगत्यानें सांगतों कीं, कृष्णदेवाच्या हातून होण्याजोगें जर तुझें एखादें काम उद्भवेल तर मजकडे ये. मी तें करून देईन.

प्रद्यो०:–मला शत्रूच्या उपकाराची जरूर नाहीं व तुझ्या रदबदलीचें-ही कारण नाहीं. (जातो. )

नरवाहन:–कां महाराज, या प्रद्योताचा प्रभाव कृष्णकांचनालाही दुर्भेद्य आहे अशी आतां तरी आपली खात्री झाली कीं नाहीं ?

कृष्ण०:–होय बुवा ! शत्रूचा हा मुख्य सरदार आपल्या हातीं लागेल असें आजमितीस तरी दिसत नाहीं. तथापि जें सावज समोरून पकडतां येत नाहीं तें कोणच्या तरी निराळ्या बाजूनें धरतां येतें. या तरुण सरदाराचें जिच्यावर प्रेम असेल त्या स्त्रीला कह्यांत आणून तिच्या मार्फत याला ताब्यांत आणलें पाहिजे ! त्या देवळाजवळच्या कुंजांत याला कोणा स्त्रीजवळ बोलत असतांना मघाशीं पाहिल्याचा भास झाला. ती स्त्री कोण असावी ?

**नर०**:–अहो, तिचें नांवसुद्धां घेऊं नका ! ती सारंगदेवाची बहीण उज्वलादेवी ! तिचें प्रद्योतावर आतिशय प्रेम आहे हें खरें, पण ती आपल्या हातीं कशी लागणार ? तिचा राज्याभिमान तिच्या नांवाप्रमाणेंच उज्ज्वल आहे ! किंबहुना तिचा देवधर्म, प्रीति, भक्ति, आशा, सर्व कांहीं तिच्या राज्यभिमानांत सांठवलेलें आहे ! तिजवर आपला काय इलाज चालणार ! ( दूर अंतरावर खद्योत दृष्टीस पडतो. )

**खद्यो०**:–( स्वगत ) ते दोन यात्रेकरू जातांना दिसताहेत त्यांचा मला संशय येतो. त्यांच्यावर पाळत ठेवली पाहिजे.

**नर०**:–हो, त्या उज्वलादेवीबद्दलची आपणाला एक चमत्कारिक बातमी सांगायची आहे.

**कृष्ण०**:–तुझी चमत्कारिक बातमी मग मी ऐकेन. आधीं मला हें कुबड तुझ्या पाठीवर बांधूं दे ! नाहींतर इथेंच एखादा चमत्कार व्हायचा !

**नर०**:–( हंसत ) एवढा वेळ आपण कुबडे होतां, आतां कुबडा होण्याची माझी पाळी आली आहे ! ( कृष्णदेव नरवाहनाच्या पाठीवर कुबड बांधतो. )

**खद्यो०**:–( स्वगत ) अरे गुलामांनो ! हें रे काय ? तुम्ही शत्रूचे हेर आहां यांत संशय नाहीं. आतां पकडतों तुम्हांला ! (अदृश्य होतो. )

**कृष्ण०**:–आतां सांग तुझी काय चमत्कारिक बातमी ती !

**नर०**:– दुसरी कोणची बातमी ! उज्वलादेवी ही आपली स्त्री व्हावी असा कांचनानें ध्यास घेतला आहे आणि तसें घडून आलेंच पाहिजे असा सुमंगला राणीसाहेबांनीं आग्रह धरला आहे !

**कृष्ण०**:–अरे, त्यांत त्या दोघांची काय बरें चूक ? उज्वला ही त्यांची चुलत बहीण आहे हें त्यांना तूं किंवा मीं सांगितल्याशिवाय कसें कळावें ?

**नर०**:–तर मग या गुप्त गोष्टीचा परिस्फोट करून टाकाना एकदांचा ? म्हणजे असले घोंटाळे पुन्हां कधीं उत्पन्न होण्याचा संभव राहणार नाहीं.

**कृष्ण०:**—जेव्हां तेव्हां तूं मला हेंच सांगत असतोस ! याबद्दल तुझ्या मनानें इतकी खंती कां घेतली आहे न कळे !

**नर०:**—त्याचें कारण सारंगदेवाचा चुलता भैरवदेव याला मीं लढाई-च्या गर्दींत मारलें तें धर्मयुद्धानें मारलेलें नाहीं. त्याच गर्दींत त्या भैरवदेवाच्या डेऱ्यांतून त्याचीं दोन मुलें मीं धरून आणलीं व आपल्या हवालीं केलीं तीं हीं सुमंगला व कांचन. हीं आमच्या कृतीमुळें वंश-भ्रष्ट झालेलीं आहेत. आम्हांला आतां किती दिवस जगायचें आहे ? तेव्हां म्हणतों मरणापूर्वीं सारंगदेवाचें व आपलें सख्य झालेलें डोळ्यांनीं पहावें आणि त्याच्या चुलत भावंडांची आणि त्याची ओळख करून द्यावी.

**कृष्ण०:**—तें मी कधींही ऐकणार नाहीं. सारंगदेवाचीं चुलत भावंडें मीं मारून टाकलीं अशी त्याची समजूत झालेली आहे व सार्वत्रिक लोकप्रवादही असाच आहे. असें असतां तीं तुझीं भावंडें जिवंत आहेत असें आपण होऊन त्याला कळवण्याचें मला कांहींएक कारण नाहीं ! हा उपकार मीं सारंगदेवावर कां करावा ? त्याचीं भावंडें आहेत तिथे चैनींत खुशाल आहेत. त्याची चुलत बहीण माझ्या पट्टराणीचें वैभव भोगतेच आहे. आणि त्याचा चुलत भाऊ माझ्या राज्यांत अमात्याचा अधिकार गाजवतोच आहे. त्यांचें कोणतें कमी पडलें आहे ? सारंगदेव हा माझा पिढीजाद हाडवैरी आहे व त्याचें राज्य घेण्याची सर्व तयारी मीं करून चुकलों आहें. त्याशीं माझें सख्य व्हावें ही तुझी इच्छा कधीं सफल होणार नाहीं.

**नर०:**—केवळ पराक्रमाच्या जोरावर आपण त्याचें राज्य घेतां तर माझें बोलणेंच नव्हतें. पण कृष्णकांचनाच्या द्वारानें शत्रूच्या राज्यांत फितूर माजवणें हा मार्ग सरळ नाहीं व श्लाघ्यही नाहीं.

**कृष्ण०:**—तो श्लाघ्य नसला तरी प्रसंगविशेषीं क्षम्य आहे. राजनीति ही केव्हां केव्हां अशीच वक्र व निष्ठुर असते.

**नर०:**—( स्वगत ) आग्रही माणसाशीं वाद करून काय उपयोग ? ( उघड ) बरें. तें असो. पण तूर्तच्या प्रसंगीं सुमंगला व कांचन यांनीं

उज्वलेच्या बाबतींत जो हेका धरला आहे त्याचें निवारण आपण कसें करणार ?

**कृष्ण०:**—अरे कसें करणार हें काय विचारतोस ? कांहीं तरी सांगून त्यांची समजूत काढायची, आणि नाहीं समजूत झाली तर त्यांच्यापासून जो कांहीं त्रास होईल तो सोसायचा ! दुसरें आपण काय करणार ! नरवाहना, हा त्रास मला तुझ्यामुळें भोगावा लागणार आहे. मी सुमंगलेशीं मुळींच लग्न करीत नव्हतों. तिचें लोंढणें तूं माझ्या गळ्यांत बांधलेंस !

**नर०:**—( हंसत ) लोंढणें माझ्या उपकारासाठींच बांधून घेतलें असाल! आपण जेव्हां पट्टाभिषेकाची सिद्धता केलीत, तेव्हां पट्टराणी व्हायला राजकन्या असावी लागते ती कुठे मिळेना, म्हणून आपण सुमंगलेशीं लग्न केलेंत बरें ! ती स्वभावानें जहाल असेल व हट्टी असेल, त्रास देत असेल, पण चरफडून उपयोग काय ! म्हाताऱ्या नवऱ्याची तरणी बायको त्याला अशीच वांकवायची ! आतां सोसा आणि हंसा ! रडवें तोंड केलेंत तर खबरदार !

**खद्यो०:**—( एकदम प्रवेश करून ) खबरदार !

**कृष्ण०:**—( हंसत ) हें रे कोण पिशाच इथे एकदम उमटलें !

**खद्यो०:**—खबरदार पुढें जाल तर !

**नर०:**—कां रे बाबा, आम्हां यात्रेकरूंना तूं कां अडवतोस !

**खद्यो०:**—अरे ए बहुरूप्यांनो, चला. सरकारापुढें खेळ करून दाखवा आणि आपली बिदागी घेऊन जा. तुमची हजेरी मी लावतों.

**कृष्ण०:**— हात् मूर्खा ! आम्ही बहुरूपी आहों का ! आम्ही यात्रेकरू आहों हें तुला दिसत नाहीं ? चल हो एकीकडे !

**खद्यो०:**—तुम्ही बहुरूपी नसाल तर तुम्ही लुच्चे माणूस आहां. तुम्ही सोंगें घेऊन फिरणारे शत्रूचे हेर आहां. या कुबडाचा कारभार तुम्ही काय काय केलात तें सारें मीं पाहिलें आहे !

**कृष्ण०:**—तोंड संभाळ ! तोंड संभाळ !

**खद्यो०**:–कां ? फारशी तंबी देतो आहेस ! तूं मला कोण मनुष्य समजतोस ? माझें काम सारंगदेव महाराजांवर मोर्चेल धरण्याचें असून शिवाय शत्रूचे हेर पकडण्याचे कामावर माझी नेमणूक झाली आहे. मी हेरांवरचा हेर आहें. मी चोरावरचा मोर आहें. आतां ओरड करीन तर कोतवालाचे शिपाई इथे आणीन.

**नर०**:– अहो, सारंगदेव महाराजांचे मोर्चेलजी ! कशाला या उपद्व्यापाच्या गोष्टी बोलतां ? काय तुम्हाला हवें असेल तें मागून घ्या आणि चालायला लागा. आम्हीही चालते होतों.

**खद्यो०**:–पण तुम्हाला जाऊं देतो कोण ? छद्मवेष घेऊन राजा कृष्णदेव या प्रदेशांत बातमीसाठीं हिंडत असतो असे मीं ऐकलें आहे. तुम्हां दोघांतला एक जण कृष्णदेव नसेलसें कशावरून ?

**कृष्ण०**:–तोंड संभाळ ! तोंड संभाळ !

**खद्यो०**:–तोंड संभाळ म्हणजे ! तें संभाळलेलेंच आहे. माझें तोंड घेऊन तूं कुठे पळून जाणार आहेस कीं काय ? (नरवाहनास) अरे, तोंड संभाळ, तोंड संभाळ, असें हा म्हणतो याचा अर्थ कायरे ?

**नर०**:–त्याचा अर्थ काय तो तुला लवकरच कळेल ! नाहीं तर तोंड संभाळ ! .

**खद्यो०**:–तूंही त्यांतलाच आहेस का ? बरें आहे. (वेडावून) संभाळतों बरें तोंड ! तुम्ही मला लांच देऊन सुटून जाऊं म्हणत असाल पण मी चकार पकार घेऊन गप्प बसणारा नव्हे हें लक्षांत ठेवा ! सारंगदेवाजवळच्या दरबारी लोकांत कृष्णकांचन न घेतलेला असा मी एकटाच राहिलों आहें. आणि या गोष्टीचा मला मोठा अभिमान वाटतो. कृष्णकांचनाला मी स्पर्श करणार नाहीं अशी माझी प्रतिज्ञा आहे. मी छातीवर हात ठेवून असें म्हणतों कीं, कृष्णकांचन नांवाच्या अमंगल वस्तूला स्पर्श करणारे सर्व लोक हरामखोर आहेत. तुम्ही मला भ्रष्ट करूं पहातां आहां, पण मी भ्रष्ट होणार नाहीं. (कृष्णदेवास) तूं कृष्णदेव राजा कशावरून नाहींस हें शाबीत कर. चल ! फार दरडावणी दाखवीत असतोस तूं !



कांचन०:– सारंगदेवा ! ही अधमपणाची तूं पराकाष्ठा केलीस ! ( पृ. ४२. )

कृष्ण०:–तोंड संभाळ, नाहीं तर दांत पाडीन ! तोंड संभाळ !

खद्यो०:–नाहीं संभाळीत जा ! काय करतोस तूं ? मी करतोंच ओरड ! अरे धांवा ! हा कृष्ण—( इतकें बोलतो तों त्याच्या तोंडावर कृष्णदेव थैली मारतो. ) ओ यो यो यो यो ! ( कृष्णदेव व नरवाहन हंसत निघून जातात. ) अरे दुष्टांनो ! माझें तोंड फुटून रक्तबंबाळ झालें ना ! ओ यो यो ! माझे पुढचे दांत पाडलेत किरे ! ओ यो यो ! तोंड संभाळ नाहीं तर दांत पाडीन म्हणत होतां तें खरेंच करून दाखवलेंत कीं ! आतां अर्ध्या घटकेंत तुम्हां दोघांच्या पाठीस कोतवालाचे दोनशें शिपाई लावून तुम्हाला पकडून आणतों. तुम्ही काय समजलां आहांत ! ( रडत ) बटकीच्यांनो, केवढा मोठा लोखंडाचा गोळा माझ्या तोंडावर मारलात ! ( पाहून ) नाहीं. हा लोखंडाचा गोळा नाहीं. हा कापडाचा बोळा दिसतो. ( चांचपून ) नव्हे पण ! हा लोखंडाचा गोळाही नाहीं आणि कापडाचा बोळाही नाहीं ! हा सोन्याचा लोळा आहे सोन्याचा लोळा ! या थैलींत मोहोरांसारखें कायसेंसें हाताला लागतें आहे. काय आहे पाहूं या तरी ! ( थैली ओतून हर्षानें ) अबबब ! या थैलींत तर मोहोरा, माणकें आणि हिरे यांशिवाय कांहींच दिसत नाहीं ! आतां कसें करावें ? पापाची श्रीमंती बरी कीं सोंवळ्याची माधुकरी बरी ! उं: ! आपण बोलून चालून खद्योत ! आपल्याला ही सोंवळयाची उठाठेव आणि बढाई पाहिजे कशाला ! आलेली श्रीमंती पतकरावी हीच पोक्त मसलत दिसते. एवढा हा सोन्याचा बोळा माझ्या तोंडांत कोंबणारा कृष्णदेव राजाशिवाय कोण असणार ! होय. तोच तो ! पण ही वर्दी कोतवालाला कळवण्यासारखा दुसरा मूर्खपणा कुठेच सांपडायचा नाहीं ! कोतवाल माझें कांचन हिसकून घेईल तें घेईलच; आणि शिवाय कोतवालींत मला सहा महिने हेलपाटे घालायला लावील तें निराळेंच ! बस बस्स ! कृष्णकांचनाला स्पर्श करणार नाहीं अशी मीं प्रतिज्ञा केली होती ती तडीस नेलीच कीं नाहीं ! आतां त्या कांचनानें आपण होऊन मला स्पर्श केला त्याला मी काय करणार ! हे लक्ष्मी ! तूं माझ्याकडे चालून आलेली आहेस त्यामुळें थकली असशील. तर तुला आतां मीं अश्शी

पाठीवर घेऊन घराकडे जाणार ! ( थैली पाठीवर घेतो. ) ओ हो ! मी आतां राजा होणार राजा ! सारंगदेवापुढें त्याच्या राण्या ज्याप्रमाणें विलासाचीं गुलजार भाषणें करीत असतात तशीं आमच्या घरांतल्या तिनें—आमच्या कज्जला राणीनें—आम्हासमोर गुलजार भाषणें केलींच पाहिजेत !

( जातो. )

## प्रवेश ३ रा.

**स्थळः—खद्योताचें घर.**

( मल्लिका परडींत फुलें घेऊन माळ करीत आहे. चंचरीक जवळ उभा आहे. )

**मल्लिका०ः**—चंचरीक, काल तूं ठरलेल्या ठिकाणीं भेटला नाहींस ?

**चंचरीक०ः**—काल मुळीं मला वेळच मिळेना. कांचनपुराहून कुणी यात्रेकरू आले होते त्यांच्या दिमतींत माझा सारा वेळ गेला.

**मल्लि०ः**—एकूण माझ्या भेटीपेक्षां तुला यात्रेकरूंची मर्जी राखणें अधिक आवडलें, असेंच ना ?

**चंच०ः**—पण तुला टाकून मी त्यांच्या दिमतीस लागलों एवढ्यावरून ते यात्रेकरू तसेच मोठे असले पाहिजेत हें नाहीं का तुझ्या ध्यानांत येत?

**मल्लि०ः**—खरं कीं काय ! असे ते एवढे मोठे होते तरी कोण ?

**चंच०ः**—कोण काय विचारतेस ? अगदीं मुख्यांतले मुख्य !

**मल्लि०ः**—अग बाई ! अगदीं खुद्द तेच का ? ते तुला काय म्हणत होते तें मला ऐकावेंसं वाटतें, पण सांगावेंसं तुला नाहींच वाटणार !

**चंच०ः**—कां नाहीं वाटणार ? तूं तर माझी जिवलग सोबतीण !

**मल्लि०ः**—तूं मोठा गोडबोल्या आहेस, पण स्वभावानें भारी मतलबी आहेस !

**चंच०ः**—मी मतलबी असलों तरी दुसऱ्याजवळ ! तुझ्याजवळ मतलबीपणा करण्यांत मतलब नाहीं. ऐक सांगतों. त्यांनीं सांगितलें कीं, कांचनाचा इथे मुक्काम असतां उज्वलादेवीबद्दल तो कांहीं वेडावांकडा विचार करूं लागला तर त्याची वर्दी तूं मल्लिकेला कळव म्हणजे ती उज्वलादेवीला सावध करील.

मल्लिका०:–असें का त्यानीं सांगितलें आहे ? तर मग तसें वागायला चुकूं नकोस बरें का ? नाहींतर तुझ्या आळसामुळें भलताच एखादा घात व्हायचा !

चंच०:–कृष्णदेव महाराजांनीं जर मुद्दाम मला त्याबद्दल सांगितलें आहे तर मी चुकेन कसा ? बरें. तें राहूं दे. तुझ्या आईला मीं वेळोवेळ दागिने दिले आहेत, त्यांवर ती संतोषी आहे ना ? हें बघ, तुझीं आमचीं बोलणीं चालणीं व्हावयाचीं हें सारें तिच्या लहरीवर अवलंबून आहे. नेहमीं तिला खूष ठेवलें पाहिजे. ती आणखी कांहीं मागत असेल तर सांग म्हणजे तत्काळ देतों. तुझा बाप अलीकडे लागलाहे हेराचें काम करायला. त्याची माझी गांठ पडतां कामा नये. मी या घरीं येतों हें त्याच्या कानावरसुद्धां जाऊन सोय नाहीं. हें ध्यानांत आहे ना ?

मल्लि०:– ( घाबरून ) हो ! बरें आठवलें ! तुला आतां इथून गेलेंच पाहिजे. बाबा बाहेर गेले आहेत ते परत येण्याची हीच वेळ आहे. ( ऐकून ) हें कवाड वाजलें. आलेच वाटतें ते ! मी इकडून जातें. तूं तिकडून पळ. ( परडी टाकून पळून जाते. ) ( उलट दिशेनें चंचरीक पळूं लागतो, तों पडद्यांतून खद्योत हांका मारीत येतो. )

खद्योत०:–हे कज्जले ! हे मन्नयनचंद्रिके ! हे प्राणप्रिये ! ( चंचरीकाच्या अंगावर आदळतो. )

चंच०:–आस्ते ! आस्ते कदम महाराज !

खद्योत०:–कोणरे तूं ? अरे तूं कोण ?

चंच०:–या देहाला चंचरीक असें म्हणतात.

खद्यो०:–तूं कुणाच्या परवानगीनें माझ्या घरांत आलास ?

चंच०:– मामीसाहेबांच्या परवानगीनें.

खद्यो०:– ( चवताळून ) अरे ए वेडा पीर ! कुठल्या मामीसाहेब तूं इथे आणल्यास ?

चंच०:–मीं मामीसाहेब आणल्या नाहींत, मामीसाहेबांनीं मला आणलें !

खद्यो०:–अरे मामीसाहेब कोण ?

चंच०:–मल्लिकेला मी माझी स्त्री म्हणतों.

खद्यो०:–तूं केळीं खातोस ! तूं लाख म्हणशील पण ऐकून घेतो कोण ? म्हणे मल्लिकेला मी माझी स्त्री म्हणतों !

चंच०:–मल्लिकेच्या मातोश्री त्या माझ्या मामीसाहेब नव्हेत का ?

खद्यो०:–अरे ! पुन्हां तेंच !

चंच०:–आणि मला वाटतें आपणालासुद्धां मीं मामासाहेब म्हणूनच हांक मारली पाहिजे !

खद्यो०:–चल ! तूं लुच्चा आहेस. माझ्या गैरहजेरींत तूं असलीं नातीं जोडलेलीं मला खपायचीं नाहींत. चालता हो ! माझी मुलगी तुला कोणीं देऊं केली ?

चंच०:–तुमच्या स्त्रीनें रोख रुपये पांचशें आणि पुतळ्यांची माळ, टिक्का, गळेसरी, अंगठी, शिवाय आणखी बारीक सारीक जिन्नस पांचशें रुपये किमतीचे घेऊन तुमची मुलगी मला दिली आहे. या कामीं मला काय काय खर्च पडला याची याद दाखवतों पाहिजे तर !

खद्यो०:–याद रद्द आहे.

चंच०:–आणि मीं दागिने आणि रुपये दिले ते ?

खद्यो०:–दागिने आणि रुपये रद्द आहेत.

चंच०:–अहो, तुमच्या मुलीचें आणि स्त्रियेचें या कामांत माझ्याशीं वचन झालेलें आहे वचन !

खद्यो०:–वचन बिचन सब रद्द आहे !

चंच०:–अहो असें कसें बरें म्हणतां ? तुम्हाला असें म्हणतां यायचें नाहीं. तुम्ही मामीसाहेबांचे यजमान ना ?

खद्यो०:–यजमान रद्द आहे ! बस्स ! मुलीचा मालक मी आहें.

चंच०:– ( स्वगत ) तर मग मालकसुद्धां रद्द आहे !

खद्यो०:–माझ्याशीं तुझा व्यवहार झालेला नाहीं. आत्तां इथून चालता हो !

चंच०:–जाणार नाहीं.

खद्यो०:–असें काय ? तर मग तुला आतां पकडतों. तूं शत्रूचा हेर असला पाहिजेस. मी हेरांवरचा हेर आहें. मी चोरावरचा मोर आहें. आहेस कीं नाहीं तूं हेर ? बोल.

चंच०:–हां ! हां ! तोंड संभाळ. तोंड संभाळ.

खद्यो०:– तर ! तर ! आतां या खेपेला मी नाहीं फसायचा बच्चाजी ! ( परडी तोंडाआड धरून ) मार थैली ! मार ! मार ! शंभर मोहरांची–दोनशें–पांचशें अथवा हजार मोहोरांची देखील थैली माझ्या तोंडावर मार पाहिजे तर ! चल. आतां कां कचरतो आहेस ?

चंच०:–( आश्चर्यानें स्वगत ) हें मला नवीनच कळलें ! कृष्णदेव महाराजांनीं सांगितलेले ते हेच गृहस्थ बरें का ! ( उघड ) काय हो मामासाहेब, तुम्ही मला हेर म्हणून पकडणार आणि कोतवालाकडे नेणार नव्हे का ?

खद्यो०:–( पुन्हां परडी तोंडाआड धरून ) मार ! मार तोंडावर थैली ! नाहीं तर पकडतों तुला ! सोडीत नाहीं !

चंच:०–तुम्ही मला खुशाल कोतवालाकडे घेऊन चला. मीही त्याला कळवतों कीं काल तुम्ही दोन यात्रेकरू–

खद्यो०:–( घाबरून मधेंच ) हां ! हां ! चूप ! चूप !

चंच०:– यात्रेकरूंपासून मोहोरा, हिरे माणकें—

खद्यो०:–अरे भाई, तुझ्या पायां पडतों. गप रहा. ( त्याच्या तोंडावर हात ठेवतो. ) मी सारें समजलों. आतां अक्षर बोलूं नकोस. तेरे बी चीप् आणि मेरे बी चीप् ! माझी मुलगी तुला बायको पाहिजे ना ? आणखी पांचशें रुपये आणून दे म्हणजे तुझें तिचें लग्न लावून देतों आणि आपल्या बायकोला घेऊन जा कसा !

चंच०:–हां ! आतां कसें काम ताळ्यावर आलें ! ( जातो. दुसऱ्या बाजूनें कज्जला येते. )

कज्जला०:–( रागानें ) ठाऊक आहे सारें शहाणपण ! त्या मुलाला कां घालवून दिलेंत ? कसला शहाणा सुतो हुशार मुलगा आहे !

खद्यो०:–( ग्याहाळून ) तरी मी अलीकडे मनाशीं म्हणतों आहें कीं, आमच्या या लंकेच्या पार्वतीला सोन्यानें मढवली कुणी ? दूर हो ! कृष्णकांचनाच्या स्पर्शानें तूं दूषित झाली आहेस. मी अद्यापि सोंवळा आहें. मला तुझा विटाळ होईल. हो दूर !

कज्ज०:–ठाऊक आहे मला तुमचें सारें सोंवळें ! कुणी लांच देणारा भेटला नाहीं तोंपर्यंत सोंवळें मिरवायला काय जातें ! बसले आहेत तिथे कृष्णकांचन नी विष्णुकांचन करीत ! माझ्या अंगावर गुंजभर सोनें घालायचें साऱ्या जन्मांत कधीं आलें आहे का कपाळाला ! चंचरीकाला पोरगी देऊं केली म्हणून उगीच कुठे एखाददुसरा जिन्नस अंगावर पहायला मिळतो आहे तोही बघवेना ! माझी पोर मी वाटेल तितक्या माणसांना देऊं करीन आणि वाटेल तितके दागिने आणि रुपये मिळवीन ! कां हो तुम्ही मधें मधें लुडबुड करीत असतां ?

खद्यो०:–अग, अशी भांडतेस कां ? भांडूं नकोस. काय म्हणतेस तूं ? आत्तां आलेल्या त्या पोराला मल्लिका द्यायची हेंच ना तुझें म्हणणें ?

कज्ज०:–द्यायची नाहीं, देऊं करायची ! कुठे गेली अकल न कळे !

खद्यो०:–हो, चुकलों. द्यायची नाहीं. देऊं करायची ! तुझी गोष्ट मी कबूल करतों. मग झालें ना ? आतां तुझें माझें भांडण राहिलें नाहीं. आतां आपण श्रीमंत झालों आहों बरें का ?

कज्ज०:–ठाऊक आहे श्रीमंती ! केळीवर नारळी चढतातच आहेत आणि घर चंद्रमौळी तें दिसतेंच आहे !

खद्यो०:–दिसूं दे. दिसूं दे. मी फार श्रीमंत झालों आहें. पण श्रीमंताप्रमाणें जर तूं वागायला शिकली नाहींस तर माझी श्रीमंती बाहेर काढून काय उपयोग ? म्हणून तुला सांगतों कीं आजपासून मी राजा सारंगदेवाप्रमाणें वागायचा आणि तूं शोभना, सुलक्षणा, विलासवती वगैरे राण्या वागतात तसें वागायचीस ! मी राजावर नेहमीं मोर्चेल धरीत असतों त्यामुळें तिथल्या पुष्कळ गोष्टी माझ्या डोळ्यांसमोर घड-

लेल्या आहेत. सबब राजाप्रमाणें कसें वागायचें हें पाठांतर मला पूर्णपणें आहे. तुला मात्र त्यांतलें अजून कांहींच माहीत नाहीं. याकरतां आधीं प्रथम माझ्याशीं बोलायचें कसें इथपासून तुला शिकवलें पाहिजे. त्यासाठीं मी तुला आजपासून साहित्यशास्त्राचा धडा देणार.

कज्ज०:-ठाऊक आहे तें तुमचें शास्त्र ! सारें साहित्यशास्त्र मला पाठ आहे ! साहित्य कुठे आहे तें आणा आणि मग पहा माझें शास्त्र ! कुठे आहे डाळ, तांदूळ, तूप, रवा, साखर, केशर, वेलदोडे ? काय साहित्य आणलें आहे ? साहित्याचा धडा राहिला, पण पांसरीभर तरी साहित्य आणायचें होतेंत ! पांसरी सोडून चिमटीभर सुद्धां आणलें नाहींत ! कुठे रडतें आहे तुमचें साहित्य ! दाखवा.

खद्यो०:-वेडी कुठची ! अग तें साहित्य मी म्हणत नाहीं ! तांदूळ, तूप, रवा, साखर, वगैरे साहित्य मिळवून चम्मन करायची तसलें तें साहित्यसंमेलन मी मुळींच म्हणत नाहीं ! माझें हें फक्त बोलायचें शास्त्र आहे.

कज्ज०:-तुमचें असलें कोरडें बोलायचें शास्त्र पाठ करायला माझें कांहीं नडलें नाहीं ! मी आहें तीच बरी आहें. मला खासें बोलतां येतें !

खद्यो०:-( कळवळ्यानें ) छे ! छे ! तुला अजून कांहींच बोलतां येत नाहीं. बोलायचें शास्त्र तुला माहीत नाहीं. शास्त्रोक्त बोलणें तुला येत नाहीं. हे कनकवर्णोद्भासिनि !

कज्ज०:-हां, शिव्या देऊं नका ! शिव्या देण्याचें कारण नाहीं.

खद्यो०:-हे मंदहासिनि ! विलासिनि ! सुवासिनि !

कज्ज०:-( चवताळून ) तोंड संभाळा ! तोंड संभाळा !

खद्यो०:-( वाचरून ) अग शिंचे ! हेंही कसब तुझ्याजवळ आहे का ! ( परडी तोंडाआड धरून ) मार ! मार बघूं मोहोरांची थैली माझ्या तोंडावर ! नाहीं तर पकडतों तुला !

कज्ज०:-( घाबरून स्वगत ) अग बाई ! आतां काय करूं ! यांना

वेड लागलें यांत संशय नाहीं ! वैद्याला आणून कांहीं डागडीग तरी द्यायची तजवीज पाहूं दे ! ( बाईबाईनें निघून जाते. )

**खद्यो०**:–शिकेल. शिकेल. आहे हुशार. पण शिंची तर्कटी आहे ! असूं दे. हिला साहित्यशास्त्र पढवल्याखेरीज सोडीत नाहीं ! साहित्य झाल्यानंतर मग नृत्यगायनादि चौसष्ट कला शिकवून तरबेज करतों ! हिला राणी केल्याशिवाय नाहीं सोडायचा ! मग या कामाला दहा वर्षें लागोत कीं शंभर वर्षें लागोत !

( जातो. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळः**—कांचनपुर-सुमंगलेचा महाल.

( सुमंगला गात येते. )

**राग**–भीमपलास. ताल–त्रिवट.

**मानिला वश नाथ अनुनयें।**
**प्रणय-पाश वाटे रचियेला ॥ ध्रु० ॥**
**मानस वंचक चंचल याचें।**
**देखुनि चिंता-वेध उदेला ॥ १ ॥**

**कांचन०**:–( प्रवेश करून ) अक्का, सारंगदेवाशीं तहाची वाटाघाट चालली आहे तिचा अखेरचा निकाल लावण्याकरतां महाराजांनीं मला वकील म्हणून त्याच्या दरबारीं पाठवण्याचें ठरवलें, त्याप्रमाणें मी सारंगपुरास जायला निघालों आहें; व तुझा निरोप घ्यायला आलों आहें.

**सुमंगलाः**–( कुरवाळून ) ये बरें बाबा! परदरबारीं जातो आहेस तिथे नीट जपून वाग बरें ! पण थांब आधीं. कांचना, तुला एक मुद्याची गोष्ट सांगतें ती ध्यानांत धर. अरे, तुझ्या वकिलीचें काम एक वेळ राहिलें तरी पुरवलें, पण सारंगदेवाजवळ उज्वलेबद्दल मागणी घालण्याचें जें तूं मनांत आणलें आहेस तें मात्र तडीस नेल्याशिवाय राहूं नकोस बरें !

**कांचन०:**—वकिलीचें मुख्य सरकारी काम बाजूला ठेवून उज्वलेची मागणी करण्याचें काम आधीं करावें म्हणतेस ? असें काय त्या कामाचें तुला महत्त्व वाटतें आहे !

**सुमं०:**—अरे महत्त्व म्हणून काय विचारतोस ? आमच्या महत्त्वाचें महत्त्व काय तें सारें त्यांतच आहे ! उज्वलेशीं तुझ्या लग्नाचा घाट एक-दांचा जुळून येऊन कधीं एकदां अक्षता पडतील असें मला झालें आहे !

**कांच०:**—इतकी घाई तुला होण्याचें कारण माझ्या कल्याणापेक्षां दुसरें तर कांहीं नाहींना ?

**सुमं०:**—तुझ्या आणि माझ्या कल्याणापेक्षां दुसरें कांहीं नाहीं एवढें मात्र खरें ! कांचना, काय सांगूं तुला ! आपलेच दांत आणि आपलेच ओंठ ! अलीकडे माझ्या मनाला आंतून कोरणी लागली आहे, पण ओंठाबाहेर शब्द फुटत नाहीं ! काय करूं ?

**कांच०:**—( सचिंत मुद्रेनें ) काय म्हणते आहेस तूं ? माझ्या लक्षांत कांहीं आलें नाहीं. काय असेल तें बोलून टाक एकदां ! माझ्याशीं बोलायची कसली चोरी ?

**सुमं०:**—( उसासा टाकून ) कसें बोलूं ? पण बोललें नाहीं तर तुला तरी कसें कळणार ? सांगतें. ऐक. अलीकडे महाराजांच्या मनांत दुसरें लग्न करायचा बेत घोळतो आहे !

**कांच०:**—( तिरस्कारानें ) कांहीं तरी सांगतेस ! महाराज उतार वयांत दुसरें लग्न करणार म्हणे !

**सुमं०:**—अरे, 'साठीं बुद्धि नाठी' ! माझ्याशीं लग्न झालें तें उतार वयांतलेंच नव्हे का ? जिथे एक तिथे दुसरें !

**कांच०:**—पण ते दुसरें लग्न करणार म्हणतेस तर त्यांनीं नवरी कोणती पाहिली आहे ?

**सुमं०:**—नवरी कोण विचारतोस ना ? अरे तूं स्वतःकरतां योजलेली वधू उज्वला ! तीच ते नवरी पहाताहेत !

**कांच०:**–( दचकून ) काय ! उज्वला ! हें तूं कशावरून म्हणतेस ? याला प्रत्यंतर काय ?

**सुमं०:**–ऐक. तें नरवाहनाचें पोरटें चंचरीक आहेना ? तो ह्या कामांत अगदीं सर्वाध्यक्ष बनला आहे ! अलीकडे बहुधा तो सारंगपुरासच असतो. आणि तो तिथून जेव्हां जेव्हां इथे येतो तेव्हां तेव्हां महाराजां-जवळ बसून कानाशीं हळू हळू उज्वलेच्याच गोष्टी सांगत असतो ! परकी राजाची उपवर बहीण उज्वला. तिची पंचाईत इकडे जी चालत असते त्याचें कारण दुसरें काय असेल सांग बरें ! मी म्हणतें तेंच कारण!

**कांच०:**– ( तर्क करून ) होय. हें कांहींसें तसेंच दिसतें आहे खरें, पण एवढ्यावरून खात्री होत नाहीं. आणखी कांहीं प्रत्यंतर आहे का ?

**सुमं०:**–आहे तर ! अलीकडे पहातें आहें, जेव्हां तेव्हां मला उज्वलेचे दाखले द्यायचे असतात. बोलण्यांतलें तात्पर्य, काय, तर ती चांगली आणि मी वाईट ! मी म्हणतें मी असेन वाईट ! पण उज्वलेचे दाखले मला पाहिजेत कशाला ? ती काय माझी बहीण, कीं आत, कीं मावशी ? तिचा माझा संबंध काय ? मला वाईट ठरवून त्याच निमित्तानें तिच्याशीं लग्न करायचें हेंच आहे बकध्यान ना दुसरें काय ! आणखी सांगतें. अलीकडे दोन दोन चार चार दिवस कुठेसें नाहींसें व्हायचा नाद लागला आहे. म्हणतात ना, पुरुषाला एखाद्या स्त्रीचा नाद लागला म्हणजे त्याला भयाची आणि जनलज्जेची पर्वा रहात नाहीं ! असें वेळीं अवेळीं गुप्त व्हायचें असतें त्या वेळीं सारंगपुरास जाऊन उज्वलेच्या भेटी घ्यायच्या होत नसतीलसें कशावरून ? बाबा, लौकिकाची चाड तिकडे नाहींशी झाली तरी आपल्याला ती बाळगली पाहिजे ना ? तिकडून कांहीं भलताच म्हातारचळाचा वेडगळ प्रकार झाला तर लोक हंसतील आम्हांला ! तें कांहीं नाहीं. कांचना, तुझीं सारीं कामें बाजूला ठेव. अरे, माझ्या जाग्यावर उज्वला आली तर मी कुठे आणि तूं कुठे ? नुसता अंकुर फुटतो आहे तों नखानें तोडतां येईल. वृक्ष वाढला तर कुऱ्हाडीनेंही

तुटणार नाहीं ! या कामांत जितकी घाई करशील तितकी थोडी आहे. सारंगदेवाची बहीण उज्वलादेवी माझ्या कांचनाची स्त्री झालीच पाहिजे !

**कृष्ण०:**– ( एकदम प्रवेश करून ) सारंगदेवाची बहीण उज्वलादेवी तुझ्या कांचनाची स्त्री कधींही होऊं शकणार नाहीं.

**सुमं०:**–कां नाहीं होऊं शकणार ? इकडूनच हरकत असली तर मग बोलणेंच नाहीं !

**कृष्ण०:**–होय. माझीच हरकत आहे.

**कांच०:**–हरकत कां व काय आहे हें महाराजानीं कृपा करून सांगितलें तर आम्हांला कळेल तरी !

**कृष्ण०:**–( स्वगत ) हा अज्ञानामुळें चुलत बहिणीशीं लग्न करूं इच्छितो आणि हरकत काय म्हणून मला विचारतो आहे ! पण याचें तिच्याशीं काय नातें आहे तें मला कुठे सांगायचें आहे ! ( उघड ) मला तूर्त तें कांहीं एक सांगतां येत नाहीं.

**सुमं:०**– ( स्वगत ) कसें सांगतां येईल ? नाहींच यायचें !

**कृष्ण०:**–शिवाय उज्वलेनें दुसराच वर पसंत केला आहे तिथे कांचनाची डाळ कशी शिजणार ?

**सुमं०:**–( भीतीनें ) तिनें वरसुद्धां पसंत केला एकूण ! हें इकडे कशावरून कळलें ?

**कृष्ण०:**–सरकारी रीतीनें नव्हे, पण खाजगी रीतिनें ही बातमी मला कळलेली आहे; आणि ती खरी आहे. कांचना, सारंगदेवाकडे मी तुला वकिलीकरतां पाठवतों आहें. तिथे उज्वलेबद्दल तूं चकारशब्द काढशील तर मला खपणार नाहीं. ( स्वगत ) मला पक्कें ठाऊक आहे कीं तूं माझें ऐकणार नाहींस आणि सारंगदेवाकडून फजीती करून घेतल्याशिवाय रहायचा नाहींस ! आणि व्हायला पाहिजे आहे तसेंच ! एरवीं लढाईच्या मसलतीला रंग कसा येणार ? ( जातो. )

**सुमं०:**–ऐकलींस ना हीं बोलणीं ? आतां तरी झाली का खात्री ? कांचना, उज्वलेशीं तुझें लग्न होण्याला माझीच हरकत आहे असें तोंडानें कबूल करतात ! काय बाई निलाजरेपणा हा !

**कांच०:**–म्हणे तूर्त यांना कांहीं ऐकं सांगतां येत नाहीं ! उज्वलेशीं यांचें लग्न होऊन गेल्यावर हे सांगणार वाटतें ! जणु काय तेथवर आम्हीं झोंपच काढीत बसणार आहों !

**सुमं०:**–उज्वलेजवळ म्हणे कांचनाची डाळ शिजणार नाहीं ! आणि ही बातमी यांना खासगी रीतीनें कळली ! उपवर मुलींच्या खासगी बातम्या खासगी रीतीनें हे काय म्हणून आणवीत असतात रे !

**कांच०:**–उज्वलेशीं मींच लग्न करावें हें एवढा वेळ माझें खासगी काम होतें, आतां तर त्याला राजकार्याचें स्वरूप आलें ! हरतऱ्हा करून हें काम फार जलद्दीनें साध्य केलेंच पाहिजे.

**सुमं०:**–केलेंच पाहिजे ! कसेंही कर ! सारंगदेवाचें मन वळव ! उज्वलेचें मन वळव ! या कामांत तुला अर्धे राज्य द्यावें लागलें तरी माझ्याकडून तुला मुखत्यारी आहे ! महाराजांचें आतांचें बोलणें ऐकून माझें अवसान अगदीं खचून गेलें ! काय करावें !

**कांच०:**–आक्का, तूं कांहीं काळजी करूं नकोस. उज्वलेला माझी स्त्री करून तुझ्या सेवेला न लावीन तर मी तुझा भाऊच नव्हे !

**राग** बागेसरी–ताल त्रिवट.

**उज्वला किसलय–कोमला तव पद्–रता परिचरी करिन ॥ध्रु०॥**
**अनुभव गत–भय सुसंपदा देवी ! तव असो भजनिं**
**रमण–मन अनुदिन ॥ १० ॥**

**सुमं०:**–काय करशील तें खरें ! माझा भरंवसा सारा तुझ्या अकलेवर आहे.

**कांच०:**–मी येतों आतां. ( जातो. )

**सुमं०:**–देवा ! हें राज्यवैभव मला तूंच दिलेंस आणि आतां मला नवीन सवत उत्पन्न करून माझ्याकडून तें हिरावून घ्यावें हें तुला योग्य वाटतें काय ?

**राग** तिलक कामोद–ताल त्रिवट.

**तुज देवा न दया सवत सुरी उरिं लागलि भय थरथरवी हृदया ॥ध्रु०॥**
**सुचे वैभव, न रुचे आदर, तळमळ मज अजि पावे समया ॥११॥**

( जाते. )

## अंक पहिला समाप्त.

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळः**—सारंगदेवाची छावणी.

( राजा सारंगदेव व अमात्य कांचन व उभयतांचा कांहीं परिवार असे बसले आहेत. )

**कांचन**०:–राजेसाहेब, राजा–राजांमध्यें जेव्हां कलह निर्माण होतात तेव्हां युद्धाचा अवलंब करण्यापेक्षां सामोपचारानेंच तंट्याची कांहीं तड-जोड लावणें सर्वथा श्रेयस्कर असतें.

**सारंगदेव**०:–अमात्य, आपण म्हणतां हें अगदीं खरें आहे.

**कांच**०:–तर मग आपण युद्धाचा विचार अजीबात सोडून देऊन कसेंही करून आमच्या महाराजांची मर्जी सुप्रसन्न करण्याचें धोरण धराल तर मला मोठें यश मिळाल्यासारखें होईल.

**सारंग**०:–( स्वगत ) स्वारी खूबच घमेंडींत आहे म्हणायची ! थांब. तुझी घमेंड लवकरच पार नाहींशी करतों ! ( उघड ) या गोष्टीला माझ्या-कडून ना नाहीं हें मीं तुम्हाला दर्शवलेंच आहे. कृष्णदेवासारख्या बलाढ्य राजाशीं युद्ध करणें जर चुकवतां येत असेल व त्याच्या कृपेचा लाभ होत असेल तर तें आम्हाला अवश्य करायचें आहे !

**कांच**०:–( स्वगत ) ही भाषणाची नम्रता खरी असेल काय? होय. तसेंच दिसतें. ( उघड ) राजेसाहेब, हा सीमान्त देश आमच्या महाराजांच्या राज्यापैकीं असतां तो तुम्हीं बळजबरीनें घेतला होता तो त्यांनीं पुन्हां घेऊन कांचनपुर येथें वस्ती केली. त्यावरून आपणही सैन्यासह चालून येऊन या पद्मनाभ क्षेत्राजवळ छावणी केली. आजपर्यंतचा आपला रोख गार्विष्ठ-पणाचा व शिरजोरपणाचा होता. परंतु आतां आपण बलाबलाचा विचार

करून नम्रतेचा स्वीकार केलात यामुळें मला फार आनंद वाटतो. कृष्ण-देव महाराजांस शरण येऊन त्यांची कृपा संपादन करण्याचें आपण बोलतां, तर त्या कृपेचें कायमचें साधन कोणचें असें आपण विचाराल तर तें मी दाखवून देतों.

**सारं०**:–( स्वगत ) पक्का मूर्ख आहे ! आणखी काय काय चेष्टा करतो तें तरी पाहूं ! ( उघड ) कृष्णदेव महाराजांची मर्जी संपादन करा-यला कोणचें साधन आपण म्हणतां ?

**कांच०**:– ( स्वगत ) हा राजा भ्याला आहे, काळजी करतो आहे, तेव्हां अक्कानें बजावल्याप्रमाणें उज्वलेची मागणी करायची वेळ हीच आहे. ( उघड ) तें साधन स्वतः मीच आहें. कृष्णदेवाचा सर्व राज्य-कारभार माझ्या बुद्धिबलावर चालला आहे. पुत्राप्रमाणें ते मजवर विश्वास ठेवतात व प्रेम करतात. माझी बहीण सुमंगला ही त्यांची पट्टराणी आहे. ती माझा शब्द कधींही मोडीत नाहीं. आणि आमचे महाराज तर तिच्या तंत्राबाहेर कधींही जात नाहींत. तात्पर्य, कृष्णदेव महारा-जांची मर्जी सुप्रसन्न करावयाची असेल तर आधीं माझ्याशीं सख्य आपण केलें पाहिजे. आपली बहीण उज्वलादेवी हिच्या सौंदर्या-विषयीं व सद्गुणांविषयीं कीर्ति ऐकल्यावरून तिचें पाणिग्रहण करावें असें माझ्या मनांत आहे. ती गोष्ट आपण घडवून आणाल तर मी आपला संबंधी झाल्यामुळें आपणाविषयीं सख्याखेरीज दुसरा विचार माझ्या मनांत उत्पन्न होणें शक्यच नाहीं.

**सारंग०**:–( स्वगत ) आतां हा बोकड वधस्थानाजवळ येऊन ठेपला ! ( उघड ) फार फार उत्तम गोष्ट ! माझी बहीण तुम्हाला देण्या-खेरीज कृष्णदेव महाराजांची समजूत करायला आम्हाला दुसरें साधन राहिलेलें नाहीं, तेव्हां तुम्ही म्हणतां तोच मार्ग धरणें आम्हाला भाग आहे ! त्यांतून उज्वलेला तुम्हासारखा पति मिळणें आमच्या राजकुलाला भूषण असून तिचें महद्भाग्य समजलें पाहिजे !

**कांच०**:–( स्वगत हर्षानें ) आतां साधलें माझें काम ! ( उघड )

तर मग उज्वलादेवीची व माझी भेट आतांच्या आत्तांच करून द्या ! मीं तिला पहावें, तिनें माझ्याशीं बोलावें, चालावें, या गोष्टीला आपली हरकत नसेलच !

सारंग०:—आपणासारख्या नवख्या मनुष्याशीं ती बोलूं चालूं शकेल तर मी कशाला हरकत करूं !

कांच०:—( उत्सुकतेनें ) तर मग उज्वलेला माझ्या समोर घेऊन या.

सारंग०:—( हंसत ) ती आपणांपुढें उभीच आहे..तिला पाहिजे तितका वेळ खुशाल पहात बसा !

कांच०:—(आश्चर्यानें ) कुठे आहे ती ?

सारंग०:—ती पहा ! ती पहा ! ( आरशांत उज्वलेचें प्रतिबिंब दाखवतो. )

कांच०:—तिला अशी माझ्याजवळ आणा !

सारंग०:—( हंसत ) अहो अमात्य, भरदरबारांत इतक्या लोकांसमक्ष ती लज्जावती कुलवधू पुढें कशी येईल ? आपणच तिजकडे जा, तिला बोलवा, चालवा. उठा !

कांच०:—( उठून जवळ जातो व आरशांतलें प्रतिबिंब पहातो. संतापून ) हा काय प्रकार आहे ! काय ही मूर्खपणाची चेष्टा आहे ! हें तर उज्वलेचें प्रतिबिंब आहे !

सारंग०:—( हंसत ) किती माझी बहीण द्रांडगी आहे ! एवढे तुम्ही अमात्य उठून तिच्याजवळ गेलां असतां ती तुम्हाशीं बोलत नाहीं, चालत नाहीं, आणि जाग्यावरून हालतसुद्धां नाहीं ! ( सर्व हंसतात. )

कांच०:—राजा ! पोराप्रमाणें माझी समजूत करतोस काय ? उज्वलेचें दर्शन तिच्या प्रतिबिंबदर्शनापलीकडे घेण्याची माझी योग्यता नाहीं असें तुला वाटतें काय ?

सारंग०:—कांचना, तुझी भीड मला मोडवेना, एवढी आशा धरून आलेला जो तूं त्या तुझा मनोभंग माझ्या हातून होईना, म्हणून तर हें प्रतिबिंब दाखवून तुला संतोषी करण्याचा उपाय माझ्या हातीं होता

त्याची पराकाष्ठा मीं केली आहे. याउपर तूं रागावशील तर तुझी मर्जी !

**कांच०**:–उज्वलेचें प्रत्यक्ष दर्शन घेण्याची माझी योग्यता नाहीं हें तूं कशावरून ठरवलेंस ? सांग.

**सारंग०**:–अरे, तुझी जात कोण हें कोणाला माहीत नाहीं ! तुझा गोत-गोतवळा कुठे आहे, तुझे आईबाप कोण, याचासुद्धां पत्ता अद्यापि कुणाला लागलेला नाहीं ! असा तूं हीन जन्माचा अधम मनुष्य–प्राचीन काळापासून स्वकीर्तीनें भूमंडल धवलित करणाऱ्या पराक्रमी श्रेष्ठ राजांच्या वंशांत जन्म पावलेल्या उज्वलेशीं– शीलसौंदर्यसंपन्न उज्वलेशीं–कोणत्या योग्यतेच्या बळावर विवाह करूं इच्छितोस तें सांग बरें ? तुझ्यासारखा मूर्ख तूंच नव्हेस काय ? कृष्णदेव राजानें म्हातारपणीं विषयलंपट होऊन तुझ्या बहिणीशीं लग्न केलें म्हणे ! ( भोंवतालच्या लोकांकडे वळून ) काय हो ? ज्या मुलीचे आईबाप, जातगोत कुणाला ठाऊक नाहींत त्या मुलीशीं लग्न करतां येतें का हो ? आपण तर बुवा असल्या संबंधाच्या स्त्रीला कृष्णदेवाची विवाहित पत्नी न म्हणतां भोगांगनाच म्हणणार ! ज्या विवाहित स्त्रीला पट्टराणीच्या पदाचा मान द्यायचा असतो ती मूळची राजकन्या असावी लागते. तुझ्या कृष्णदेवानें भोगांगनेला सिंहासनावर बसवून तिजवर व स्वतःवर पट्टाभिषेकाचें पाणी शिंपडून घेतलें ही पट्टाभिषेकाची थट्टाच नव्हे काय ?

**कांच०**–( उसळून ) राजा, तूं शुद्धीवर आहेस काय ? तूं आत्तां उच्चारलेल्या शब्दांबद्दल मी तुझ्या काळजांतल्या रक्ताचा पाट वाहवीन ! याद राखून ठेव !

**सारंग०**:–( हंसत ) अमात्या, रागावूं नकोस. तुझ्या समजुतीकरतां तुझ्या बहिणीशीं कृष्णदेवानें लग्न केलें असेंच आपण म्हणूं, किंबहुना तुझ्या आग्रहास्तव तिला पट्टराणीही म्हणूं, पण तेवढ्यावरून तूं पवित्र आणि कुलीन ठरतोस असें मुळींच नाहीं ! त्यानें तुला अमात्यपदवीला चढ-

वलें तरी तुझें हीनत्व कमी झालेलें नाहीं ! माकडाच्या गळ्यांत कुणी रत्नहार बांधला तरी तेवढ्यावरून तो मनुष्य ठरत नसतो !

राग–बहार. ताल–आडा चौताल.

धरिसि पाय जरि वदसि हाय। तुजसि नृपसुता वरिल काय?॥धु०॥
भ्रमसि मदें मदनांध अधम। तुज त्यजुनि लाज कां जाय? ॥ १२ ॥

**कांच०:** पुरे ! पुरे कर तुझी वल्गना ! याउपर कृष्णदेवाशीं मैत्री होण्याची तूं आशा धरूं नकोस !

**सारंग०:**–अरे जा ! लघिष्ठा ! तुझ्या धन्याच्या मैत्रीची अथवा वैराची तरी कुणाला पर्वा आहे ! कृष्णदेव म्हणजे शेंपन्नास खेड्यांचा पाटील ! तो झाला म्हणे सार्वभौम आणि तूं त्याचा अमात्य ! परंतु माझ्या दृष्टीनें तुम्ही दोघे तुच्छ कीटकच आहांत आणि कीटकाप्रमाणें पायांखालीं चिरडले जाण्यालाच योग्य आहांत ! कृष्णदेवाची मैत्री ! मैत्री करण्याजोगा कृष्णदेवानें या राज्यावर कधीं कोणता उपकार केला आहे ? जसें प्रकाशाचें आणि अंधकाराचें वैर, तसें कृष्णदेवाचें आणि माझें वैर स्वयंसिद्ध आहे. पूर्वीच्या अपकारांचें विस्मरण या राजवंशांत उत्पन्न झालेल्या पुरुषांच्या हातून होणें शक्य नाहीं !

**कांच०:**–राजा, कृष्णदेवाची कृपा प्राप्त करून घेण्याचा हा सोन्या-सारखा प्रसंग तूं घालवावास हें तुझें दुर्दैव होय !

**सारंग०:**–दुर्दैव माझें कीं त्याचें ? तुझा कृष्णदेव माझ्याशीं मैत्री जोडूं इच्छीत असेल, पण ती पहा ! ती पहा ! ( तसबीर दाखवितो. ) ती धीरोदात्त मूर्ति तूं पहातोस ? ती मूर्ति माझा चुलता भैरवदेव याची आहे. ( आश्चर्यानें चपापून स्वगत ) अरे ! माझ्या चुलत्याच्या आणि या अमात्याच्या चेहऱ्यांत किती आश्चर्यकारक साम्य हें !

**कांचन०:**–( स्वगत ) आं ! या तसबिरींतला चेहरा पहातांच माझ्या मनाला हें असें कां होतें आहे? या चेहऱ्यांत अशी काय अतर्क्य आकर्षण-शक्ति आहे कीं हा पहातां क्षणीं माझ्या मनांत प्रेमाची व पूज्यतेची भावना

प्रादुर्भूत व्हावी ! या तसबिरीला नमस्कार करण्यासाठीं आपोआप मान वांकते व हात जुळतात !

**सारंग०:**– ती मूर्ति कृष्णदेवाशीं मैत्री करण्याविषयीं माझें निवारण करते इतकेंच नाहीं, तर त्या दुष्ट राजाचा आणि त्याच्या राज्याचा विध्वंस करण्याविषयीं मला वारंवार आज्ञा करते ! कृष्णदेवाला माझी मैत्री पाहिजे असेल तर त्यानें माझी समजूत न करतां त्या मूर्तीची समजूत करावी ! कृष्णदेवानें दगा करून माझ्या चुलत्याचा वध केला त्या गोष्टीला वीस वर्षें होऊन गेलीं तरी तें दुःख अजून सुद्धां माझ्या डोळ्यांपुढें उभें आहे ! त्या गर्दींत माझ्या चुलत्याचीं मुलें– जयंत व जयंती नांवाचीं माझीं चुलत भावंडें–कृष्णदेवाच्या हातीं लागलीं त्यांचीही त्या निर्दय राक्षसानें कत्तल केली ! त्या अर्भकांनीं त्याचा कोणचा अपराध केला होता ? कृष्णदेव माझा मांडलिक असतां मी क्षमेचा सागर होऊन त्याचे इतकेही अपराध पोटांत घालीत आलों, आणि त्याला त्याच्या राज्याचा आजपर्यंत उपभोग घेऊं दिला. परंतु अलीकडे त्याचीं पट्टाभिषिक्त सार्वभौम म्हणवून घेण्याचीं सोंगें, त्याची महत्त्वाकांक्षा, त्याचा चढेलपणा, या गोष्टी केवळ असह्य झाल्या असून असल्या तुच्छ व कृतघ्न माणसाच्या हातीं सत्ता राहूं देणें धोक्याचें झालें आहे; व त्यासाठींच त्याचीं पाळें मुळें खणून काढायला मी आतां तयार झालों आहें हें पक्कें समजून रहा !

**कांचन०:**–राजा ! तूं कुणाचीं पाळें मुळें खणून काढावीं म्हणतोस ? कुणीकडे कृष्णदेव आणि कुणीकडे तूं ! तूं मदांध झाला आहेस, पण बळाविषयींचा तुझा गर्व पोकळ आहे ! नेहमीं ऐष आरामाचें सेवन केल्यामुळें तुझ्या विवेकबुद्धीला मालिन्य आलें आहे. तूं इतका वेळ वल्गना केल्यास त्या मीं ऐकून घेतल्या, पण तुला आतां बजावतों कीं, राज्याचा उपभोग फार दिवस घेणें तुझ्या कपाळीं राहिलें नाहीं ! वकील कांचन तुझ्या कल्याणाची गोष्ट सांगत असतां त्याचा तूं

असा उपमर्द केलास, परंतु पुढच्या खेपेस सेनाधीश्वर कांचन इथे येईल त्या वेळीं त्याचा तूं उपमर्द करूं शकणार नाहींस ! कारण त्या वेळीं कृष्णदेव राजाची एक लाख तलवार या कांचनाच्या भ्रूभंगाची प्रतीक्षा करीत त्याला गराडा देऊन उभी असेल ! त्या वेळीं हा कांचन तुला पायांशीं लोटांगणें घालायला लावील, आणि सौंदर्याचा व कुळाचा तोरा मिरवणाऱ्या तुझ्या बहिणीला—उज्वलेला—बटीक करून हा कांचन घेऊन जाईल ! हे शब्द अक्षरशः खरे होणार आहेत हें ध्यानांत ठेव आणि स्वतःवर ओढून आणलेल्या तुझ्या या भयंकर राज्यप्रलयाचें निवारण करण्याच्या उद्योगाला लाग !

**राग** बिहाग. ताल–त्रिवट.

**फुकट कां गर्जना । ही । येइ मरण–समय तुज ।**
**जाण निकट विकट–हठ । काळ चुकविं करिं खटपट ॥ ध्रु० ।**
**अतुल–बल समर–सम–रस मम भट । कृतांत–सम**
**धरिति न करुणा । तुज कवण वांचविल । बल–मद**
**बुडवी नरासिं झटपट ॥ १३ ॥**

( जाऊं लागतो. )

**सारंग०:–** ( हंसत ) अरे ! अरे ! हे अमात्यसाहेब चवताळून अगदीं बेताल झाले ! मेजवानी घेतल्यावर यांची मर्जी प्रसन्न होते कीं काय हें तरी पाहूं या ! ( कांचनाचा हात धरून ) अहो अमात्य, माझ्या दरबारीं येऊन मेजवानीसुद्धां घेतल्याखेरीज तुम्ही परत जाल तर त्यांत माझा दुर्लौकिक होईल. थांबा. थांबा. अरे मेजवानी आणा ! मेजवानी ! मेजवानी ! ( कांहीं लंगडे, पांगळे, एकडोळे विद्रूप लोक फळफळावळ, पक्वान्नें, हारतुरे व सुगंधी द्रव्यांचीं ताटें घेऊन एकदम गडबडीनें येतात व कांचनापुढें ताटें ठेवतात. ) अमात्य, तुम्ही आपल्या घरीं आलां आहां, ही तुमच्या घरची मेजवानी आहे असें समजा; आणि मेजवानी घेण्यांत संकोच करूं नका !

**खद्यो०:–**तें काय म्हणून ? मी तर उलट म्हणतों कीं संकोचाचा संकोच करा आणि यथेष्ट ताव मारा !

**कांचन०:**– ( क्रोधानें तारें लाथाडून ) बस्स बस्स ! सारंगदेवा ! ही अधमपणाची तूं पराकाष्ठा केलीस ! मी आतां क्षणभरसुद्धां इथें रहाणार नाहीं !

**सारंग०:**–( धिक्कारानें ) कांहीं राहण्याचें कारण नाहीं ! तुला निरोप दिला आहे. ( कांचनाकडे पाठ वळवून ) अरे, खानगीकडचे कोण कामगार इथे हजर आहेत ? काय ? कुणीच नाहींत ! सर्वांनींच पुढच्या मुक्कामाला जाण्याचें काय कारण होतें ? बरें. असो. खद्योता, इकडे पुढें ये. तुला एक विशेष जबाबदारीचें काम सांगतों.

**खद्यो०:**–जी महाराज !

**कांच०:**–( जातां जातां आठवण झाल्यासारखें करून मागें परततो. ) राजा, तुझ्या दरबारीं येण्याचें माझें मुख्य काम तें अजून राहिलें आहे !

**सारंग०:**–( कांचनाकडे दुर्लक्ष करून ) खद्योता, इथलें काम आतां संपलें आहे. याकरतां मी शिकारीला जातों आणि तिकडून परस्परच सारंगपुराला जाईन. उद्यां भल्या पहांटेस उज्वलादेवीची इथून सारंगपुराकडे रवानगी झाली पाहिजे. तिच्या रक्षणार्थ फौजेची व पहारेकऱ्यांची नेमणूक झालेलीच आहे. तुझें काम एवढेंच कीं, पहांटेस पालखीचे भोई व फरासखान्याकडचे कामाठी वगैरे लोक जुळवून तूं तिच्या स्वारीची रवानगी करून द्यायची.

**कांच०:**–राजा, कृष्णदेव महाराजांचें मुख्य काम तुझ्याकडे आहे तें मीं अजून कळवलें नाहीं !

**सारंग०:**– ( कांचनाकडे दुर्लक्ष करून खद्योतास ) अरे, मीं काय सांगितलें तें नीट समजलासना ?

**खद्यो०:**–जी महाराज ! भोई, कामाठी–

**कांच०:**–( खद्योतास एकीकडे ढकलून मध्येंच ) राजा, माझ्या वकिलीचा मुख्य भाग उरकायचा अजून राहिला आहे !

**सारंग०:**–( कपाळास आंठ्या घालून ) काय म्हणतोस तूं ?

**कांच०**:--कृष्णदेव महाराजांचें आज्ञापत्र मीं बरोबर आणलें आहे तें तुला सादर करतों.

**सारंग०**:--( स्वगत ) आण तुझें चिठोरें इकडे !

**कांच०**:--सारंगदेवा, पूज्य वस्तूची अशी अवज्ञा करूं नकोस ! हें आज्ञापत्र तूं न मानशील तर तुला मृत्युपत्र करावें लागेल !

**सारंग०**:--( स्वगत ) करतों ! तुझें आणि तुझ्या धन्याचें--दोघांचींही लिहून ठेवतों !

**कांच०**:--महाराजाधिराज सार्वभौम कृष्णदेव महाराजांचें आज्ञापत्र तुझ्या-सारख्या मांडलिकांनीं समारंभानें दरबार भरवून शिरसा वंदन करून सर्वांना जाहीर करायचें असतें ! ( कागद सारंगदेवाच्या हातीं देऊन जाऊं लागतो. )

**सारंग०**:--कोण आहे रे तिकडे ? महाराजाधिराज सार्वभौम कृष्णदेव महाराजांचें हें आज्ञापत्र कुत्र्याच्या शेंपटाला बांधून छावणींतून हिंडवा ! !

**कांच०**:--( त्वेषानें मागें वळून तरवारीस हात घालतो. ) दुरात्मन् ! या क्षणीं तुझा शिरच्छेद करावा असें मनांत येतें !

**सारंग०**:--( हंसत ) तर मग तें मनांतच राहूं द्या ! चला आतां ! जा ! तुम्ही वकील आहांत म्हणूनच जिवंत चालला आहांत. नाहीं तर केव्हांच तुमचीं मांसखडें गिधाडांच्या भक्ष्यस्थानीं पडलीं असतीं ! ( कांचन जातो.) खद्योता, पांच वर्षांपूर्वीं हाच कृष्णदेव माझ्या जय-दुंदुभीचा नाद ऐकतांच सैरावैरा पळत होता ! आणि तोच आतां स्वतःला पट्टाभिषेक करून घेऊन सार्वभौम म्हणवून घेतो आणि मला मांडलिक बनवूं पहातो आहे ! आणि शरण येण्याविषयीं मला धमकावणीही देतो आहे हें कोणच्या बळावर ? ( चिंतन करतो )

**खद्यो०**:--( स्वगत ) कृष्णकांचनाच्या बळावर ! पण हें तुला कुठे अजून कळतें आहे ! कृष्णदेवानें तुझ्या पायांखालीं जी गर्ता तयार केली आहे तींत जेव्हां तूं एखाद्या गजराजाप्रमाणें धाडकन् पडशील तेव्हां-च हें सर्व तुला समजेल ! पण मग हें समजूनही कांहीं उपयोग नाहीं !

कारण त्या संकटांतून सुटण्यासाठीं जों जों तूं धडपड करशील तों तों तुझ्या बळाचा ऱ्हासच होत जाईल !

**सारंग०:**—समजलों सारें ! माझी उपेक्षा हेंच कृष्णदेवाचें बळ ! मी पूर्वींच या क्षुद्र शत्रूचा युद्धामध्यें वध केला असता तर आजचा हा अपमानास्पद प्रसंग कशाला आला असता ? कांहीं हरकत नाहीं ! या खेपेला ज्या अर्थीं तो आपण होऊन युद्धाला प्रवृत्त होतो आहे, त्याअर्थीं त्याचा नाशकाल समीप आला हेंच खरें ! ही संधी आतां वांयां जाऊं देत नाहीं. तो व त्याचें राज्य दोन्हीही या भूतलावर नामशेष करतों !

**राग**—कामोद. ताल—एका.

**तुमुल रण-कलह बहु घडले । गत कथा स्मरुनि चळतें**
**जळतें लव न विभव-सुखीं रमे मन ॥ ध्रु०**
**जरि जित संगरिं वैरि न वधिला । पीडांकुर कां जागें जगवुं**
**दिला विसरुन ॥ १४ ॥**

( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

### सीन १ ला.

**स्थळ:**—सारंगदेवाची छावणी.

( उज्वला व मल्लिका येतात. )

**उज्वला०:**—मल्लिके, कांचनानें दगा करण्याची जी मसलत योजली आहे तिचें वर्तमान तूं प्रद्योतरायांना नीटपणें सांगितलें आहेसना ?

**मल्लिका०:**—होय ताईसाहेब, सर्व सांगितलें आहे. आणि त्या अमात्याच्या दगलबाजीबद्दल त्याला चांगलेंच शासन घडावें अशी त्यांनीं योजनाही करून ठेवली आहे. ती योजना कशी कशी ठरवली आहे, तें आपणाकडे येऊन ते स्वतःच आपल्याला समजून देतील. आपणाला त्यांनीं असा निरोप सांगितला आहे कीं, आपण तिळमात्र चिंता करूं नये. खुशाल झोंप घ्यावी.

**उज्वला०**:–मल्लिके, मला निर्भय करण्याचें हें त्यांचें आश्वासन या प्रसंगापुरतेंच आहे असें तं समजूं नकोस. सदा सर्वदा मला निर्भय ठेवण्याचें त्यानीं व्रतच पतकरलें आहे. केवढे हे त्यांचे मजवर उपकार !

**मल्लिका०**:–पण ताईसाहेब, त्या अमात्याच्या गुन्ह्यांत माझ्या वडिलांचें अंग आहे ही गोष्ट बाहेर फुटूं नये व त्याबद्दल त्यांना शासन होऊं नये असें आपण मला वचन दिलें आहे त्याची आठवण आहे ना ? वचन दिल्याप्रमाणें आपण वागाल ही माझी खात्रीच आहे, पण प्रद्योतराय त्याप्रमाणें वागतीलच असा काय भरवंसा आहे ?

**उज्व०**:–तूं कांहीं काळजी करूं नकोस. माझ्या सांगण्याबाहेर प्रद्योतराय कधींच जायचे नाहींत ! जा तूं. ( मल्लिका जाते. ) माझ्या सांगण्याबाहेर प्रद्योतराय कधींच जायचे नाहींत हें मी निःशंकपणानें सांगूं शकतें तें कशामुळें ? तर त्यांच्या निस्सीम प्रेमामुळें ! ज्या प्रेमामुळें मी त्यांच्या उपकाराला पात्र झालें तें प्रेम त्यांच्या अनेक सद्गुणांचा प्रकाश माझ्या हृदयावर पाडून मला सदैव सुखी करीत आहे ! प्रद्योतरायांच्या या प्रेमाचा परिपाक विपन्नावस्थेला पोंचलेल्या या राज्याचा बचाव करण्याकडे होईल काय ? होय ! होईलच होईल. त्यांत काय संशय ? नर्मदेचा प्रचंड ओघ थांबवून धरणाऱ्या सहस्रार्जुनाप्रमाणें कृष्णदेवाचा सैन्यसमुद्र कांहीं वेळ तरी अडवून धरतील तर माझे प्रद्योतरायच धरतील ! ज्याच्या योगानें नरदेहाला अमरत्व प्राप्त होतें तो प्रद्योतरायांचा देशाभिमान सदैव उद्दीपित राहो व त्यांच्या पराक्रमाच्या शोभेनें हा वैवर्त देश धन्य होवो !

**राग** जीवनपुरी–ताल त्रिवट.

**कुल-धन हा वीर विराजो देवा वर दे हा ॥ ध्रु० ॥**
**भूतलीं भानु । हानि हा नेणू ।**
**सार्थक आणू कीर्तिनें नर-देहा ॥ १५ ॥**

( जाते. )

# प्रवेश २ रा.

## सीन २ रा.

**स्थळ:**—सारंगदेवाची छावणी. उज्वलेचा डेरा.

( खद्योत कांहीं कामाठी घेऊन येतो. )

**खद्योत०:**–( टेहाळणी करून ) अरे कामाठी लोक, तुम्ही इथेंच उभे रहा. सोन्या, चल माझ्याबरोबर आंत आणि मी बोजे दाखवतों ते उचलून आणून या कामाठ्यांच्या हवालीं कर. चल. ( कामाठ्याचा वेष घेतलेला कांचन पुढें व खद्योत मागें याप्रमाणें डेऱ्याच्या तोंडाशीं येतात व हळू स्वरांत बोलतात.)

**कांच०:**–ती केव्हां बाहेर येईल ? कोणच्या दारानें येईल ? मी कुठे उभा राहूं ?

**खद्यो०:**–निघण्याची तयारी झाल्याचें मी तिला सांगून आलों आहें. ती या वाटेनें आत्तां बाहेर येईल. बाहेर आल्याबरोबर तिच्या तोंडांत बोळा कोंबून तिला उचला आणि पालखींत नेऊन ठेवा ! मी तुमच्या मदतीला आहेंच. घाबरूं नका !

**कांचन०:**–ठीक आहे.

**खद्योत०:**–हां! पावलें वाजताहेत. आलीच ती ! व्हा पुढें ! ( कांचन पुढें होतो तों प्रद्योत अकस्मात् आंतून येऊन कांचनास ओढून त्याच्या मानेवर तरवार ठेवतो. उज्वला, मल्लिका व चंचरीक हत्यारबंद होऊन येतात व कांचनास घेरतात. उज्वलेचें तोंड बुरख्यानें झांकलें आहे. चंचरीकाचा बुरखा पायघोळ आहे. )

**खद्यो०:**–खबरदार जाग्यावरून हाललास तर ! यत्किंचित् चळवळ करशील तर फुकट मारला जाशील !

**कांच०:**– ( अंतरावरच्या कामाठ्यांस ) गडे हो ! दगा झाला ! घात झाला ! धांवा !

**खद्यो०:**– ( घाबरून ) अरे बापरे ! ( कामाठ्यांत जाऊन मिसळतो. कामाठी हत्यारें उपसून पुढें येऊं लागतात.)

**प्रद्यो०:**– ( कामाठ्यांस ) अरे फितुरी लोक ! तुम्ही पुढं पाऊल टाकाल तर याचे तुकडे तुकडे करीन ! संभाळा ! यत्किंचित् गडबड कराल तर पहारेकरी येऊन तुम्ही पकडले जाल. या माणसाचा व तुमचा जीव तुम्हांला हवा असेल तर चित्राप्रमाणें उभे रहा ! ( कामाठी थबकतात. ) कांचना, असल्याही वेषांत मी तुला ओळखलें आहे !

**खद्यो०:**–कोण ? हे कामाठी झालेले अमात्यसाहेब आहेत म्हणतां ? ( कांचनास ) भले महाराज ! तुम्ही या भलत्या फंदांत शिरून नसती हरामखोरी माझ्या पदरांत बांधलीत !

**प्रद्यो०:** ( कांचनास ) तूं या वेळीं इथे कशाला आला आहेस ? बोल.

**कांच०:**– हा प्रश्न मला विचारणारा तूं कोण आहेस ? तुझें नांव काय हें मला आधीं कळलें पाहिजे.

**प्रद्यो०:**–तें तुला कळण्याचें कारण नाहीं. टाळाटाळ करशील तर फुकट मरशील. इथे कां आलास तें सांग.

**कांच०:**–काल उज्वलादेवींचें प्रत्यक्ष दर्शन मला घडलें नाहीं, सबब तें घेऊन कांचनपुरास निघून जावें म्हणून हा वेष घेऊन कामाठ्यांत मिसळून मी इथे आलों.

**खद्यो०:**–तुम्ही थोर दर्जाचे गृहस्थ ! शिवाय नांवानें प्रत्यक्ष कांचन ! बाईसाहेबांचें दर्शन आम्ही सर्व लोक उघडपणें घेतों तें तुम्हीं चोरून लबाडीनें घेण्याचा यत्न केलात एवढेंच ! हा कांहीं मोठासा गुन्हा नाहीं ! प्रद्योतराय, या राजश्रींची मुखश्री म्लान केलीत इतकें बस्स झालें. यांची इतिश्री न करतां यांना लावून द्या !

**प्रद्यो०:**–खद्योता, गप रहा ! ( कांचनास ) तूं इथे येण्याची सबब सांगतोस ती खरी असती तरी तुझ्यासारख्या माणसाला लांच्छनास्पदच होती ! पण तूं खोटें बोलतो आहेस ! तुझें पाप याहीपेक्षां भयंकर आहे. कारण, खद्योतानें आणलेले हे कामाठी व बाहेर पालखी घेऊन आलेले भोई उभे आहेत ते सर्व तुझे लोक आहेत हें मला पूर्णपणें

माहीत आहे. उज्वलादेवी पालखींत बसून गोटाबाहेर गेल्यानंतर तूं बळजबरीनें तिला कांचनपुरास घेऊन जाणार होतास. या भयंकर फितुराचा पत्ता पूर्णपणें आम्हाला लागला आहे !

**खद्यो०:**–( कानांवर हात ठेवून ) मला नाहीं हो यांतलें कांहीं ठाऊक ! गव्हांबरोबर गरीब बिचारा हा बरड चिरडाता म्हणाल तर तसें मात्र कृपा करून करूं नका !

**प्रद्यो०:**–तूं बरड नाहींस, बेरड आहेस ! तुझ्या मिलाफाशिवाय हा फितूर कसा होईल ?

**खद्यो०:**–माझ्याकडे काय हो गुन्हा ! माझें नेहमींचें काम मोर्चेल धरण्याचें ! हे कामाठी आणि भोई माझ्या कुठून ओळखीचे असणार ? मी हांक मारतांच हे लोक पुढें आले आणि त्यांना घेऊन मी इकडे आलों !

**प्रद्यो०:**–गप बस हरामखोरा !

**खद्यो०:**–( स्वगत ) मला बेरड म्हणतो आहे, हरामखोर म्हणतो आहे, बरें आहे ! पाहून घेईन !

**प्रद्यो०:**–कांचना, हें तुझें पाजीपणाचें काम उघडकीला आलें आहे, तरी तुम्हांपैकी कोणालाही कांहीं इजा करावी असें उज्वलादेवीच्या अगर माझ्याही मनांत नाहीं. मात्र मी सांगतों याप्रमाणें तूं निमूटपणें केलें पाहिजेस.

**कांच०:**– मीं काय केलें म्हणजे माझी सुटका होईल म्हणतोस ?

**प्रद्यो०:**–तूं ज्या अर्थी राज्यकारभार करतोस त्या अर्थी तुझ्या अंगांत कांहीं अक्कल ही असलीच पाहिजे ! इतकें असून ज्या वासनेला बळी पडून असलीं साहसाचीं आणि अधमपणाचीं कृत्यें करायला तूं भीत नाहींस, ती उज्वलादेवीविषयींची तुझी वासना अतिकोटीला पोंचलेली दिसते. ही वासना इतःपर तूं सोडावीस अशी तिची तुला आज्ञा आहे.

**कांच०:**–अशी तिची इच्छा असेल तर या क्षणापासून मीं तिची वासना सोडली. आतां मला जाऊं द्या !



**प्रद्योत०**:–मी सांगितल्याप्रमाणें तूं न करशील तर तुझें गर्दन उडवीन ! (पृ. ४९.)

प्रद्यो०:–नुसतें वासना सोडली एवढें तूं म्हटल्यानें तिची अगर आमची कोणाचीच खात्री होत नाहीं. दैवाची गति आणि दुष्टाची मति यांचा पल्ला कोठवर जाईल हें कुणीं सांगावें ? इथे असलेल्या सर्व लोकांसमक्ष तूं तिच्या पायां पडून तिची माफी मागितली पाहिजेस व याउपर मी तुला बहीण समजतों असें तिला बोलून दाखवलें पाहिजेस !

कांच०:–( काकुळतीनें उज्वलेस ) ताईसाहेब, मी कोण मनुष्य, कोणत्या योग्यतेचा, याचा विचार करा ! हा प्रद्योत सांगतो त्याप्रमाणें मीं केलें तर त्यांत माझी मोठी मानहानि आहे.

उज्व०:–अमात्य, हें संकट तुम्हीं आपण होऊन स्वतःवर ओढून आणलेंत ! तुम्हांवरचा प्रसंग कसा बिनतोड आहे हें ओळखा, आणि आपला बचाव करून इथून निघून जा !

खद्यो०:–अहो अमात्य, मानहानीचें काय एवढें स्तोम माजवू बसलां आहांत ? प्रत्यक्ष तुमच्या मानेचीच हानि होण्याची वेळ आली आहे त्यापेक्षां मानहानि बरी नव्हे का ?

प्रद्यो०:–आतां मी वायफळ बोलून वेळ घालवणार नाहीं, आणि तुझी सबुरीही करणार नाहीं. मी तीन अंक म्हणतों तितक्यांत मीं सांगितल्याप्रमाणें तूं न करशील तर तुझें गर्दन उडवीन ! ( तरवार उगारतो· ) एक ! दोन !–

कांच०:–( उज्वलेच्या पायांवर डोकें ठेवून ) उज्वलादेवी, माझा गुन्हा माफ करा. आपणाविषयींची वासना मीं आजपासून सोडली. मी आपणाला बहीण असें समजत जाईन.

प्रद्यो०:–चल ! निघ इथून ! तोंड काळें कर ! खद्योता, हे सर्व लोक तूं आणलेस तसे गोटाबाहेर घालवून दे. (कांचन व कामाटी यांस घेऊन खद्योत जातो.)

चंच०:–ताईसाहेब, अमात्य कांचन कोणता एवढें प्रद्योतरायांना दाखवण्यापुरतेंच माझें इथे हजर राहण्याचें काम होतें. तें काम आतां झालें, सबब मला निरोप द्या.

उज्व०:–बरें आहे. चंचरीका, जा तूं आतां.

मल्लि०:– थांब चंचरीक ! मीही तुझ्याबरोबर येतें, आणि तुला पहाऱ्यांतून पार करून देतें. ( मल्लिका व चंचरीक जातात. )

प्रद्यो०:–उज्वले, पाहिलास हा कृष्णकांचनाचा घातकी प्रभाव ! या खद्योतानें त्या अमात्यापासून लांच घेऊन असा हा दगा करण्याचा बेत केला होता ! सारंगदेव महाराजांच्या कानीं कपाळीं मी प्रत्यहीं ओरडत असूनसुद्धां त्यांनीं फितुरी लोकांची आजपर्यंत उपेक्षा केली त्याची मजल येथपर्यंत येऊन पोंचली !

उज्व०:–ही आज आपली खात्री झाली, पण माझी कधींच झालेली आहे !

प्रद्यो०:–या खद्योताला देहांतशासन देववलेंच पाहिजे, आणि तें मींच देववणार. या कामांत महाराजांचा हुकूम होण्याची मी वाट पहात नाहीं.

उज्व०:–प्रद्योतराय, मल्लिकेवर नजर देऊन तिच्या बापाचा हा गुन्हा या खेपेपुरता माफ करूं या.

प्रद्यो०:–या क्षमेचा परिणाम राज्याला भोंवल्याखेरीज राहणार नाहीं बरें ! तथापि उज्वले, मल्लिकेवर नजर देऊन तिच्या बापाची गय करावी अशी तुझी मर्जीच असेल तर तसेंच होऊं दे ! असो. उज्वले, आजच्या प्रसंगामुळें कांचनाचा पक्काच बंदोबस्त झाला आहे. पापवासनेनें प्रेरित होऊन तो तुला यापुढें उपद्रव देईल अशी गोष्ट कदापि घडणार नाहीं !

राग–काफी. ताल–त्रिवट.

**गत–भय देवी ! । आमोदा सेवीं ॥ ध्रु० ॥**
**पापी ताप द्याया हत–बल ।**
**मलिन तो वदना मिरवी केंवी ! ॥ १६ ॥**

उज्व०:–छे छे ! हा शत्रूचा अमात्य माझ्यासंबंधानें कामवासनेपासून परावृत्त झाला एवढ्यावरून मीं कसा संतोष मानावा व कसें स्वस्थ

रहावें ? कारण कीं, हा इकडून अपमान पावून परत गेल्यामुळें आमच्या राज्यावर मोठें दुर्धर संकट ओढवण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. हा अमात्य कांचनपुरास जाऊन पोंचण्याचाच अवकाश कीं उभय राज्यांमध्यें प्रचंड युद्ध सुरू झालेंच असें समजावें !

राग–जिल्हा. ताल–केरवा.

जिवें भावें विनवितें तुजसीं प्रिया ।
करुन दया मज म्हणसी प्रिया ॥ ध्रु० ॥
सहवासाचा सुखकारी समय गेला ।
काळ आला कठिण हा निवारूं तया ॥ १७ ॥

**प्रद्यो०:**–( विचार करून ) होय. उज्वले, तूं म्हणतेस तें खरें आहे. नदीच्या द्वारानें गलबत समुद्रांत जावें त्याप्रमाणें आपल्या जीविताची नौका प्रीतीच्या द्वारानें या राष्ट्रीय संकटाच्या महासागरांत प्रवेश करून हेलकावे खात आहे ! तथापि मी डगमगत नाहीं. देशकल्याणाचें सुकाणू धरून, आणि शौर्याचीं व उत्साहाचीं शिडें उभारून मी हाही समुद्र तरून जाण्याची हिंमत धरतों ! तूं कांहीं काळजी करूं नकोस.

राग–शंकराभरण. ताल–त्रिवट.

जन–पद–भार–सागरा पार तराया बल द्यावें रमारामें ॥ ध्रु० ॥
जन–कार्या दृढ जखडिलें मम मन हें तूं प्रेम–सुदामें ॥ १८ ॥

( जातो. )

**उज्व०:**–परचक्राच्या संकटांत सांपडलेल्या या राज्याचा उद्धार करणाऱ्या प्रद्योतरायांना पृथ्वीचा उद्धार करणाऱ्या महाविष्णूचीं उपमा शोभते !

राग–भीमपलास. ताल–झंपा.

लोक–शरण देशोद्धरण कराया हा धजला ॥ ध्रु० ॥
अचला उचलाया । सरसावे घन–नील ।
उपमा सहज ती लाभे शोभे याला ॥ १९ ॥

( जाते. )

---

## प्रवेश ३ रा.

### सीन १ ला.

**स्थळः**—कांचनपुर. कृष्णदेवाच्या वाड्याचा एक भाग.

( नरवाहन सचिंत मुद्रेनें प्रवेश करितो. )

**नरवाहन०**:—कृष्णदेवाचा दीर्घद्वेष आणि सारंगदेवाचा उन्माद हीं विकोपास जाण्याला कांचनाच्या वकिलीचें निमित्त झालें त्यामुळें केवढा अनर्थ ओढवला आहे! मनुष्यमात्राच्या संहारासाठीं हपापलेला कृतांत हर्षानें टाळ्या वाजवीत माझ्या आसपास वावरत असल्याचा इतक्यांतच मला भास होऊं लागला आहे ! ( पडद्यांत शब्द होतो—नरवाहना, टाळी दे टाळी ! ) ( दचकून ) आला वाटतें तोच ! ( पाहून ) नाहीं ! हा प्रत्यक्ष कृतांत तर खचित नव्हे ! पण मी फारसा चुकलों असेंही म्हणवत नाहीं ! कारण वैवर्त देशाचा संहार करण्यासाठीं कृतांताचा दूत होऊं पहाणारा हा कृष्णदेव राजाच इकडे येतो आहे !

**कृष्ण०**:—( प्रवेश करून हर्षानें ) नरवाहना, टाळी दे टाळी !

**नर०**:—( खिन्न मुद्रेनें ) टाळी दे ? कशाची टाळी देऊं ?

**कृष्ण०**:—आधीं टाळी दे गड्या टाळी ! ( हंसतो. )

**नर०**:—अहो, टाळी कशाबद्दल देऊं ? आज आपणाला इतका हर्ष व्हायला झालें आहे तरी काय ?

**कृष्ण०**:—अरे दुसरें काय व्हायचें ! अमात्याला वकिलीकरतां पाठवलें होतें तें काम अगदीं फत्ते करून आला बहादर ! ओहो ! काय मजा आहे ! काय बहार आहे !

**नर०**:—महाराज, उज्वलेबद्दल सारंगदेवाजवळ मागणी करण्याचा त्यानें कुठला हा मूर्खपणा केला म्हणून मी त्याला मनांत शिव्या देतों आहें, आणि आपण त्याची तारीफ करतां याचा अर्थ काय ?

**कृष्ण०**:—( हंसत ) अरे तेंच तें! तें तसेंच व्हायचें होतें ! तसेंच व्हायला पाहिजे होतें ! जसें रामरावणांचें युद्ध सीतेमुळें, जसें भारती युद्ध द्रौपदी-

मुळें, तसें आतां आमचें सारंगदेवाशीं युद्ध उज्वलादेवीमुळें ! आणि तें सारंगदेवाशीं युद्ध तरी त्याचींच चुलत भावंडें सुमंगला व कांचन यांच्याकडूनच मी करवणार ! शत्रूच्या घरांतल्या घरांत अशी कळ माजलेली पाहून मला किती किती आनंद होतो म्हणून सांगूं ! सारंगदेव महामूर्ख ! केवळ गर्वाचा पुतळा ! वकिलाचा कधीं कुणी तरी उपमर्द केला आहे का ? यानें कांचनाला दुरुक्ति कां बोलाव्या ? सुमंगलेला भलतेंच दूषण कां द्यावें ?

**नर०**:—पण आमचें कांचन बाळ तरी कुठे सुधें आहे ! त्यानें उज्व-लेला पळवून आणण्याची मसलत कां करावी ?

**कृष्ण०**:—अरे, तो तरी सारंगदेवाचाच भाऊ ना ! आतां भांडणाला मी निमित्तमात्र राहिलों हें छान झालें ! सारंगदेवाशीं माझें काय भांडण आहे तें आमच्या राणीसाहेब आणि आमचे अमात्य जोर जोरानें भांडून आकाश पाताळ एक करणार ! थांब. थोडा दम धर. पुढें काय मजा होते ती पहाशील तर खरा !

**नर०**:—( रागानें ) आणि हें सारें पुढें असेंच होईल हें ओळखून आपण कांचनाला मुद्दाम वकिलीवर पाठवलेंत ! प्रथम मी जायचें ठरलें होतें त्याप्रमाणें गेलों असतों तर समेटाची कांहीं तरी आशा होती ! पण आपणाला हा असला दुनियेला आग लावण्याचा खेळ करायचा होता, म्हणूनच मला न पाठवतां कांचनाला पाठवलेंत ! खासें केलेंत !

**कृष्ण०**:—( हंसत ) अरे, मीच जाणार असा कांचनानें अट्टहास केला, आणि त्यालाच पाठवावें हें सुमंगलेच्या मनांत वेड ! मग मी काय बरें करणार ? माझा काय बरें उपाय ?

**नर०**:—हो हो ! तुम्हीं काय करणार ? तुमचा काय उपाय ? मला सांगतां या गोष्टी ! असलीं बहीणभावंडांत भांडणें लावलेलीं मला नाहीं आवडत !

**कृष्ण०**:—तुला नाहींच आवडायचीं ! पण जें कांहीं झालें आहे तें परस्पर झालें आहे. आतां म्हणावें भांडा, मारा, ओरखाडे काढा, एकमे-

कांच्या मानगुटीस बसा ! सारंगदेवाचीं बोटें त्याच्याच डोळ्यांत आपो-आप पुन्हां पुन्हां जाऊं देत !

**नर०**:–महाराज, ही गोष्ट फार वाईट केलीत !

**कृष्ण०**:–तूं असाच रडायचास ! तूं मिलाफ करणारा, मी बिघाड करणारा ! तुझें साधलें नाहीं, आणि माझें साधलें ! आतां बस रडत ! तूं रडवाच आहेस ! जा !

(जातात.)

---

## प्रवेश ३ रा.

### सीन २ रा.

**स्थळ**:—कांचनपुर. दरबारचा दिवाणखाना.

( दरबारांत सेनापति व कांहीं सरदार उभे असतां सुमंगला व कांचन येतात. )

**कांचन०**:–अक्का, आज हा तूं काय प्रकार आरंभला आहेस ? तूं दरबारांत येऊन महाराजांसमक्ष असें बोलूं लागलीस तर त्याचा किती बभ्रा होईल बरें ? तूं आपल्या महालांत परत जा. सारंगदेवानें आमचा जो अपमान केला आहे त्याचा सूड घेण्याचा पराक्रम माझ्या अंगांत नाहीं असें तूं समजतेस काय ?

**सुमंगला०**:–अरे, तसा कांहीं पराक्रम तुझ्या अंगांत असता तर हें रडगाणें गायला तूं इथे माझ्यासमोर आलाच नसतास ! जर तुझ्या अंगांत पराक्रम असता तर तुझ्या बहिणीला ‘ भोगांगना ’ म्हणणाऱ्या त्या मदांध नरपशूचें शीर भाल्यावर घालून तें नाचवीत नाचवीत तूं माझ्यापुढें आणलें असतेंस, आणि माझ्या डोळ्यांचें पारणें फेडलें असतेंस ! जर तुझ्या अंगांत तसा कांहीं पराक्रम असता तर तूं सारंगदेवाच्या राजधानीची राखरांगोळी केल्याचा व तिथल्या लोकांची कत्तल केल्याचा बोभाटा तूं इथे येण्यापूर्वीच माझ्या कानावर आला असता !

**कांच०:**–अक्का, तसें करण्याची ती वेळ तरी होती का ?

**सुमं०:**– ( तिरस्कारानें ) पुरे कर तुझें अक्का अक्का ! तुझ्या अक्काच्या नांवाला परदरबारीं लांछन लावलेलें ऐकून घेतलेंस त्यापेक्षां मेला असतास तरी बरें झालें असतें ! तूं मला भाऊ मुळींच शोभत नाहींस ! इथे माझ्यापुढें उभा राहूं नकोस ! चल ! चालता हो ! ( एका सेवकास ) अरे, महाराजांची स्वारी काय करते आहे ? ते कोणच्या कामांत गुंतले आहेत ?

**सेवकः**–( भीत भीत ) महाराज देवपूजा करीत बसले आहेत.

**सुमं०:**–( तिरस्कारानें ) देवपूजा करीत बसले आहेत !

**सेव०:**–पूजा आटपत आली आहे. स्वारी आत्तांच इथे येईल.

**सुमं०:**–कशाला आटोपताहेत पूजा ! त्यांना म्हणावें बसा देवपूजाच करीत ! लोकहो, हे जन्मभर देवपूजाच करायचे ! प्रत्यक्ष यांच्या बायकोची अब्रू शत्रूनें घेतली तरी त्याची क्षिति यांना तिळमात्र वाटायची नाहीं ! बसूं दे त्यांना देवघरांत हरिहरि म्हणत ! आणि ( कांचनाकडे वळून ) पोरट्या ! तूंसुद्धां हातांत कांकणें घालून तोंडावर बुरखा घेऊन कुठे तरी कोंपऱ्यांत जाऊन बैस जा ! मला तुम्हां दोघांचीही जरूर नाहीं ! नवरा आणि पाठचा भाऊ यांच्या हातून जिच्या-अब्रूचें रक्षण होत नाहीं, अथवा अपमानाचा सूड घेववत नाहीं, त्या स्त्रीनें आपल्या अब्रूचें रक्षण आपणच केलें पाहिजे ! सरदारहो, पिढ्यान्पिढ्या या दौलतीचें अन्न तुम्हीं खाल्लेलें आहे. या राज्याचा अपमान झालेला तुम्ही खपवून घेणार काय ? पट्टाभिषेकाच्या वेळीं मंत्रोदकानें पवित्र झालेल्या या सुमंगलेच्या मस्तकावर शत्रूनें अपशब्दाचा वज्रप्रहार केलेला तुम्हांला मानवतो काय ? या सिंहासनाचें महत्त्व कुत्र्याच्या शेंपटाला बांधून शत्रूनें छावणींतून हिंडवलेलें तुम्ही सहन करणार काय ? तुम्ही कधींही सहन करणार नाहीं हें मला ठाऊक आहे. तुम्हाला बरोबर घेऊन शत्रूवर चालून जाऊन या भयंकर अपमानाचा सूड उगवण्याचें

काम मलाच आपल्या शिरावर घेतलें पाहिजे ! तर उठा ! कमरा बांधा ! शस्त्रास्त्रें सज्ज करा ! दिग्विजयाच्या प्रयाणाचे दुंदुभि वाजवा ! कुल-वधूला वेश्या म्हणणाऱ्या त्या सारंगदेव नांवाच्या महिषासुराचें मर्दन करण्यासाठीं मी महाकाली होऊन समरांगणांत प्रकट होणार ! भूमीला भारभूत झालेल्या त्या दैत्याचा संहार मी करणार !

**सेनापति०:**—राणीसाहेब, आम्ही हात जोडून अशी प्रार्थना करतों कीं, आपण कृपा करून कोप आंवरावा ! आपला अपमान झालेला महाराज अथवा आम्ही कोणी निमूटपणें सहन करूं असें आपणाला वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. आपण स्वस्थ असावें. सारंगदेवाशीं युद्ध सुरू केल्याचा पुकारा करण्याकरतांच महाराजांनीं आम्हा सर्वांना इथं बोलावलें आहे.

**सुमं०:**—कशाला तुम्ही माझी समजूत घालतां ! पत्नीच्या अप-मानाचा सूड घेण्याची ईर्षा महाराज धरणार नाहींत ही माझी पक्की खात्रीच आहे !

**राग**—सुदकल्याण. ताल त्रिवट.

**मद्‌पमानही तृण—समान अरिला ।**
**मम अभिमान नृप धरि न ॥ ध्रु० ॥**
**रिपु नृप मातला । परि त्याचें ।**
**दमन दांत मम कांत रणिं करि न ॥ २० ॥**

**कृष्ण०:**—( एकदम प्रवेश करून ) सुमंगले ! असें बोलूं नकोस. आमच्या अपमानाची भरपाई सारंगदेवाकडून भरपूरपणानें करून घेण्याचा निर्धार मीं पक्का ठरवला आहे. काळजी करूं नकोस. स्वस्थ रहा.

**सुमं०:**—महाराज, या भूमंडळावर सांप्रतकाळचे धर्मराज म्हणवून घेण्याची आपणाला फार हौस आहे. पूर्वींच्या धर्मराजानीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांपुढें आपल्या स्त्रीचें वस्त्रहरण झालें तें निमूटपणें सहन केलें. हल्लींच्या काळचे धर्मराजसुद्धां आपल्या स्त्रीचें लज्जाहरण झालेलें निमूट-पणें सहन करायचेच ! अशा पतीच्या पदरीं मी पडलें याबद्दल मी नशीबाला बोल लावतें ! आपणाला बोल लावीत नाहीं ! आणि पराक्रम

गाजवून आपण सारंगदेवाचें पारिपत्य कराल अशी अपेक्षा मीं धरलेली नाहीं !

**कृष्ण०**:—सुमंगले, तूं हा वाग्बाणांचा वर्षाव अनाठायीं करीत आहेस हा बंद कर ! मला जरी धर्मराज म्हणवून घेण्याची हौस असली तरी अपराध्याचें शासन करण्यांत मी प्रत्यक्ष यमधर्म आहें हेंही आतां तुझ्या प्रत्ययाला येईल !

**सुमं०**:—जर आपण शत्रूचें शासन करण्याचा निर्धार केला आहे हें खरें आहे, तर त्याचें नुसतें राज्य घेतल्यानें कांचनाचें व माझें समाधान होणार नाहीं. सारंगदेव व त्याची बहीण यांनीं आम्हांला अतिशय दुःख दिलें आहे. याकरतां त्यांच्यावर आमच्या मनाप्रमाणें यथास्थित सूड आम्हाला घेतां आला पाहिजे.

**कांच०**:—होय महाराज, अक्काप्रमाणेंच माझी सुद्धां आग्रहाची मागणी सूड घेण्याबद्दलचीच आहे. शत्रूनें केलेल्या अपमानाचा प्रतीकार माझ्या हातून झाल्याखेरीज माझ्या मनाची तळमळ कधीं शांत होणार नाहीं !

**राग**—सारंग. ताल—झंपा.

**खेद अंतरिं कढे । आधि हा मज जडे ।**
**रोष भीषण चढे । देह-शोषण घडे ॥ ध्रु० ॥**
**स्वैर-मति वैरि-जन । करिति तो अपमान ।**
**सहन संतत करुन । होय मन बापुडें ॥ २१ ॥**

अशी माझ्या मनाची स्थिति असल्यामुळें शत्रूचें पारिपत्य करण्याच्या कामीं पुढाकार घेण्याची माझी इच्छा आहे ती आपण पूर्ण केलीच पाहिजे.

**कृष्ण०**:—कांचना, सुमंगले, तुम्हां दोघांची इच्छा न्यायाची आहे व ती पूर्ण करण्यांत येईल. सेनापति व सरदार हो, युद्धप्रसंग टाळावा म्हणून सारंगदेवाशीं शिष्टाईचें बोलणें करण्याकरतां गेलेल्या या अमात्यांची त्यानें काय दशा केली हें तुम्हाला ठाऊकच आहे ! याउपर युद्धाखेरीज दुसरा विचारच राहिलेला नाहीं ! गर्वपर्वताच्या शिखरावर आरूढ झालेल्या त्या मत्त सारंगाला खालीं ओढून त्याच्या हृदयाचें विदारण

करणें हेंच या कृष्णकेसरीचें आतां पहिलें कर्तव्य आहे. याकरतां उठा ! आपले सैन्यसंभार सज्ज करून सारंगदेवावर चालून जा आणि त्याचा पराजय करून त्याचें राज्य पादाक्रांत करा ! आणि त्याला कैद करून मुसक्या बांधून इथे घेऊन या ! (म्यानांतून तरवार उपसतो.) सज्जनांचें रक्षण करणें हें काम जसें या तरवारीचें आहे, तसेंच सारंगदेवासारख्या मदोन्मत्त दुर्जनाला दंड करणें हेंही काम याच तरवारीचें आहे व त्यासाठींच ही म्यानांतून निघाली आहे ! ( नागवी तरवार सिंहासनाच्या खांबाला टांगून ठेवतो. ) ही तरवार पुन्हां म्यानांत घालण्याची माझी मर्जी होईपर्यंत युद्ध चालावयाचें आहे व तें चालू असेपर्यंत आवेशानें, उत्साहानें, एकनिष्ठपणानें समरांगणावर आपलें कर्तव्य बजावणें हेंच तुमचें काम आहे. सत्पक्षाचा पाठिराखा श्रीहरि आहे आणि आमचा सत्पक्ष आहे त्याअर्थी आमच्याच गळयांत विजयश्रीची माळ पडणार हें निश्चित आहे. ज्या युद्धावर मी तुम्हाला योजीत आहें त्या युद्धाचा अवधि माझी ही तरवार म्यानांत परत जाईपर्यंतचा आहे. युद्ध चालू रहावें अशी माझी मर्जी असेपर्यंत ही माझी तरवार असंख्य शत्रूंचीं आयुष्यें निरालंब करण्याकरितां अशीच लटकत राहील ! त्या अवधींत शत्रूच्या राज्यांत तुम्ही जाळा, पोळा, लुटा, कत्तल करा, किंवा कोणताही अनन्वित प्रकार करा ! सर्व अन्याय तुम्हाला माफ आहेत ! मात्र सारंगदेवाला कैद करून इथे आणल्याशिवाय मला तोंड दाखवूं नका ! जा ! अमात्य, या युद्धाचें सर्व जोखीम आम्हीं तुमच्या शिरावर सोंपवलें आहे. याकरतां धैर्यानें व युक्तीनें युद्धप्रसंग करून तुम्हांवर विश्वास टाकल्याचें सार्थक्य करून दाखवा !

**कांचन०:**–( हर्षानें ) महाराज ! आपण आनंदानें खुशाल कालक्रमणा करावी ! प्रत्यहीं नवीन नवीन विजयोत्सव करण्याचे आपणाला प्रसंग येतील अशीच कृति आम्हां सेवकांच्या हातून घडेल !

राग–भूप. ताल–दादरा.

तो श्रमद समद कुमति नृपति संहरूं रणीं ।
हठ त्याचा मरणीं । करि तैसी करणी ॥ ध्रु० ॥
शर–जल–धर तव अनुचर पटुतर–कर अहित–मारणीं ।॥ १ ॥

कृष्णदेव व सुमंगलाः—
दुष्ट मारा सुष्ट तारा । प्रभु वदे वाणी ।
योध हें जो मनीं जाणी । त्यास रक्षी चक्रपाणी ॥ २२ ॥

( पडदा पडतो. )

## अंक दुसरा समाप्त.

## अंक ३ रा.

### प्रवेश १ ला.

**स्थळः**—कांचनपुर-ध्वजा, तोरणें, पल्लव व फुलांच्या माळा वगैरेंनीं शृंगारलेलें सुमंगलेचें जलमंदिर. मुली स्वच्छंदानें गात आहेत व नाचत आहेत.

**राग**—यानी. ताल—त्रिवट.

घोष विजय-समयिं उठति जय जय।
विहग भुलति । समद डुलति । जलद झुलति । नाद घुमति।
भ-गण-सदनिं । सकल भुवनिं । विगत-दोष । होय तोष ॥ ध्रु० ॥
युवति युव-गण करिति नाट्य-गान । चमकति वितत मणि-किरण ।
भास करिति जणु दिवोक । स-गृह-तोक । सकल लोक ।
गलित-शोक । प्रमद पसरुं । कलह विसरुं । होउं
सुखित । वीत-रोष ॥ २३ ॥

( सुमंगला रागारागानें प्रवेश करते. )

**सुमंगला०**:—काय पोरींनीं डोचकें उठवलें आहे ! काय हा धिंगाणा ! उठल्या बसल्या नाचायचें नी गायचें ! गायचें तीं नाचायचें ! तुम्हांला दुसरीं कामेंच नसतील जशीं ! आणि माझ्या जलमंदिरांत माझ्या परवानगीखेरीज आज इतकी आरास कुणी कशाकरतां केली आहे ? चला ! व्हा चालत्या इथून ! ( मुली जातात तों दुसरीकडून कृष्णदेव येतो. )

**कृष्ण०**:—हां हां ! त्या मुलींवर कां एवढा गहजब ! आज सर्व राज्यांत विजयोत्सव साजरा करण्यांत येत आहे, तो या मुलींनींच कां करूं नये ? त्या स्वच्छंदानें नाचत होत्या, गात होत्या, त्यांचा कां बरें हिरमोड केलास ? ( सुमंगला रागानें तोंड फिरवून दूर सरते. ) आणि हें काय ! आजचा आनंदोत्सव कुणीकडे आणि तुझें दुर्मुखलेलें तोंड कुणीकडे !

**सुमं०:**–ज्यांना आनंद झाला असेल त्यांना माझें दुर्मुखलेलें तोंड दिसूं नये म्हणूनच तें दुसरीकडे वळवलें आहे !

**कृष्ण०:**–ज्यांना आनंद झाला असेल म्हणजे ! सोन्या राज्याचा आनंद–माझा आनंद–तो तुझा आनंद नव्हेच वाटतें !

**सुमं०:**–खरेंच आहे ! आपला आनंद तो माझा आनंद कसा नसेल ? असलाच पाहिजे ! स्त्रीचें मन दुःखानें कितीका होरपळलेलें असेना ! त्याची पर्वा कोण करणार ! तिनें मनांतल्या मनांत रडावें, जळफळावें, आणि नवऱ्याची लहर आनंदी होण्याची लागेल तेव्हां आनंद मानावा ! पोटांत आग पेटली असतांही हंसावें, खिदळावें, असा हा जगाचा उलटा न्यायच आहे ! '

**कृष्ण०:**–( तिचा हात धरून ) सखे, तुझा आनंद हेंच माझ्या सुखाचें सर्वस्व आहे हें तुला माहीत आहे. असें असून तूं माझ्याशीं अशी कां बरें वागतेस ?

**राग**–पिलू. ताल–धुमाळी.

**न होई भामा । वामा सुशीलतमा । रामा ॥ ध्रु० ॥**
**तव गुण–गरिमा । वाढवी प्रेमा । नोहे त्या उपमा ॥ २४ ॥**

**सुमं०:**–महाराज, हीं खोट्या प्रीतीचीं भाषणें, हीं माझ्या प्रीती-साठीं तळमळण्याचीं सोंगें मला काय समजत नाहींत ?

**राग**–जिल्हा. ताल केरवा.

**अशि माया कोण दाऊं जाणे तुम्हाविण ।**
**काळिज खोटें । प्रेमळ वाणी ॥ ध्रु० ॥**
**कधिं ठावें प्रेम करणें नव्हतें मनांतुन ॥ २५ ॥**

**कृष्ण०:**–मी तुला फसवीन असें तुझ्या मनांत काय म्हणून येतें ? तसें करण्यांत माझा कोणता फायदा आहे हें तूंच सांग बरें ? मी जें जें करतों तें सर्व तुझ्या सुखाकरतां करतों हें तुझ्या ध्यानांत कसें येत नाहीं ?

**सुमंगला०:**–जें काय चाललें आहे तें सारें माझ्याकरतां चाललें आहे असें बोलून दाखवणें म्हणजे माझ्या काळजावर डागणी ठेवणें होय !

पण हें दुःख मी कुणापुढें गावें ! मला कोण विचारतो ! असें कां करतां म्हणून प्रश्न विचारणारे कुणी राजे महाराजे माझे बापभाऊ आपणाशीं बरोबरीनें भांडणारे असते तर आपणही माझ्याशीं नीट वागलां असतां !

**कृष्ण०:**–( स्वगत ) जसे काय तुझे बापभाऊ आजपर्यंत माझ्याशीं भांडलेच नाहींत ! अजूनसुद्धां तेंच करताहेत बरें !

**सुमं०:**–महाराज, मी अज्ञातवासांत वाढलेली गरीब पोरकी मुलगी केवळ आपल्या इच्छेमुळें पट्टराणीचें पद पावलें. माझ्या बटकीची बटीक मीं व्हावें अशी जर आपली इच्छा होईल तर तसेंही वागणें मला भाग आहे !

**राग**–काफी. ताल दीपचंदी.

**सेविन राज्ञी–पदा । पदाश्रयें मी सुखदा विभवदा ॥ ध्रु० ॥**
**नाथा तुमचें पद मज तारी । जरि तें मातें मारी ।**
**॥ वांचवी कोण वदा ॥ २६ ॥**

**कृष्ण०:**–आज हा इतका त्रागा करायला तुला झालें आहे काय ? तूं दुःख करतेस आणि मोघम उरेंबुरें बोलतेस यावरून मीं काय समजावें ? तुझी नाराजी होण्याचें काय कारण आहे तें सांग तरी ! तुझें कोणचें न्यून पडलें आहे ?

**सुमं०:**–इथे माझी कांहीं किंमत वाटत असती तर कुठे न्यून पडलें हें सांगितल्याचा उपयोग !

**कृष्ण०:**–असें कां बरें ? तुझ्या शब्दापेक्षां आणि तुझ्या इच्छेपेक्षां या जगांत मी कोणत्याच गोष्टीला अधिक किंमत देत नाहीं !

**सुमं०:**–आज सर्व राज्यांत होत असलेला उत्सव माझ्याच इच्छेमुळें होत असेल नाहीं बरें !

**कृष्ण०:**–आजच्या उत्सवाचें योग्य कारण तसेंच घडून आलेलें आहे. शत्रूशीं पांच चार लढाया झाल्या त्यांत प्रत्येक वेळीं आमचीच तरवार यशस्वी झालेली आहे आणि शत्रूच्या मनाचा हिरमोड होऊन

आम्हीं पूर्वीं सांगितलेल्या अटींवर तो समेट करून घ्यायला कबूल झाला आहे.

**सुमं०**:—आणि एवढ्याशा अल्प यशावर संतुष्ट होऊन आपण शत्रूशीं तह करणार ! शत्रूचा वकीलसुद्धां तह ठरवून घेण्याकरतां इथे आला, आणि इतकें सारें घडत असतां माझी कुणी विचारपूस सुद्धां केली नाहीं! माझी इथे किंमत नाहीं म्हणतें तें हेंच !

**कृष्ण०**:—तह अजून ठरला नाहीं. शत्रूचा वकील इथे आला आहे खरा, पण तो काळा कीं गोरा मीं अजून पाहिलासुद्धां नाहीं ! समेटाबद्दलची मध्यस्थी नरवाहनाची आहे आणि त्याच्याच मार्फत वकिलाचें बोलणें सुरू आहे; व तें ऐकून घेण्याविषयीं मी कांचनाला सांगितलें आहे इतक्यांत लढाई बंद करावी हें माझ्याही मनांत मुळींच नाहीं. त्यामुळें आतां या वकिलाला काय उत्तर द्यावें याच पंचाइतींत मी पडलों आहें. शत्रूवर जसा सूड उगवायचा असेल तसा तुला उगवूं दिला जाईल असें मी पूर्वीं बोललों आहें. तर सांग तुझें काय म्हणणें असेल तें ! म्हणजे सारंगदेवाला त्याप्रमाणें वागायला लावतों.

**सुमं०**:—माझें म्हणणें असें आहे कीं, जिनें माझ्या भावाची नाचक्की केली आणि जिच्यामुळें सारंगदेवानें माझा आणि कांचनाचा अमर्याद उपमर्द केला ती उज्वला देवी आमच्या घरीं बटीक म्हणून राबण्याकरतां तिच्या भावानें आमच्या हातीं दिली पाहिजे. ती त्यानें बऱ्या बोलानें आमच्या हवालीं केली तर ठीकच आहे. नाहीं तर लढाई बंद होत नाहीं म्हणून वकिलाला साफ सांगावें.

**कृष्ण०**:—सुमंगले, तूं सारंगदेवाला जाणीत नाहींस. मी जाणतों. तो अतिशय मानी आणि गर्विष्ठ राजा आहे. तो राज्यही गमावील, पण बहिणीला आमच्या हातीं कधींही लागूं देणार नाहीं. तशीच वेळ आली तर तो तिला मारूनसुद्धां टाकील ! आणि तीही अतिशय अभिमानी असल्यामुळें मरून जाईल, पण आमच्या हातीं लागणार नाहीं. मग असली अट घालण्याचा उपयोग काय ?

**सुमं०**:– मरून जाईल म्हणे ! मरून जाण्याच्या गोष्टी वाटेवर नाहीं पडल्या ! तें कांहीं नाहीं. सारंगदेवाची पुरती मानखंडना करण्याकरतां अशीच मागणी त्याजवळ केली पाहिजे !

**कृष्ण०**:–सुमंगले, उज्वला ही तेजस्वी, सद्गुणी आणि थोर मनाची राजकन्या आहे. तिला दास्य करण्यासाठीं आमच्या हवालीं करण्याची अट घालणें हें आमच्या अपकीर्तीला कारण होईल. नेहमीं अपकीर्तीला भ्यावें लागतें.

**सुमं०**:–यांत कसली आली आहे अपकीर्ति ?

**कृष्ण०**:–तसें नव्हे सुमंगले, शत्रूशीं वागणूक करायची झाली तरी ती सुद्धां लोकांत गोड दिसली पाहिजे ! एका हातानें शत्रूचा न कळत गळा कापीत असावें तर दुसऱ्या हातानें त्याचें तोंडही गोंजारीत असावें ! लोकांना तर त्याचा कापलेला गळा दिसूं नये आणि तोंड गोंजारलेलें मात्र दिसावें ! गळा कापतांना यदाकदाचित् शत्रु सावध होऊं लागला तर हें सारें तुझ्या सुखाकरतां करतों अशी त्याची समजूत घालावी ! कारस्थानीची खुबी काय ती हीच आहे !

**सुमं०**:–ही कारस्थानीची खुबी शत्रूलाच दाखवायची असते ना ?

**कृष्ण०**:–होय. शत्रूलाच ! दुसऱ्या कोणाला दाखवायची ?

**सुमं०**:–नाहीं, आपलें विचारून घेतलें !

**कृष्ण०**:–तरीपण !

**सुमं०**:–मला वाटलें, आपल्या बायकांशीं वागतांनासुद्धां मुत्सद्दी म्हणवणारे असल्याच कारस्थानीच्या खुब्या करीत असतील ! कारण उज्वलेच्या बाबतींत आपण माझ्याशीं हुबेहूब तसेंच वागतां आहां ! तिच्याशीं लग्न करून माझा गळा कापण्याचा आपला बेत आहे आणि तो छपवण्याकरतां माझें तोंड गोंजारण्याचीही खटपट चाललीच आहे ! आणि मला संशय आल्याचें दिसूं लागतांच मी सारें तुझ्या सुखाकरतां करतों असें आतांच आपण बोलून दाखवलेंही आहे !

**कृष्ण०:**–( आश्चर्यानें ) काय ! उज्वलेशीं लग्न करण्याचा माझा बेत आहे म्हणतेस ?

**सुमं०:**–म्हणतें म्हणजे ! त्याबद्दल माझी खात्री झाली आहे म्हणून म्हणतें ! कांचनाला ती नवरी मिळूं देण्याला माझीच हरकत आहे असें स्पष्ट बोलून नाहीं का दाखवायचें झालें ? आणि तिला धरून आणायची गोष्ट मी काढतांच अपकीर्तीचें भय पडलें आहे, तिच्या मरणाची काळजी लागली आहे, शत्रूशीं सख्य करायची घाई झाली आहे, हें सारें कशाकरतां हें मला समजत नाहीं कीं काय ? मी नकोशी झालें आणि ती आवडली म्हणूनच या साऱ्या गोष्टी नीं दुसरें काय !

**कृष्ण०:**–(स्वगत ) एका बायकोनें जर्जर केलेंच आहे, त्यांत दुसरी आली म्हणजे निर्जर होण्याचीच पाळी यायची ! ( उघड ) उज्वलेशीं लग्न करण्याचें मला काय कारण ?

**सुमं०:**–मी राजकन्या नसतां पट्टराणी झालें म्हणून सारंगदेव पट्टाभिषेक खोटा म्हणतो, लोक हंसतात, आपल्याला मान खालीं घालावी लागते ! ती राजकन्या पट्टराणी झाली म्हणजे हें वैगुण्य नाहींसें होईल हेंच ह्याचें कारण !

**कृष्ण०:**–( स्वगत ) ती राजकन्या आणि तूं कोण ? ( उघड ) तूं म्हणतेस त्याप्रमाणें कांहीं एक प्रकार स्वप्नांतसुद्धां माझ्या मनाला शिवलेला नाहीं. उज्वलेला स्वाधीन करण्याविषयींची अट घातली तर लौकिकांत ठीक दिसणार नाहीं, म्हणून मी अनमान करीत होतों. पण ज्याअर्थी शंकाविषानें तुझ्या बुद्धीला ग्रासलें आहे त्याअर्थीं त्या शंकाविषावर उतारा म्हणून तूं म्हणतेस त्याप्रमाणें वागायला माझी कांहींच हरकत नाहीं ! ( मधुमालती येते. )

**मधु०:**–महाराज, मंत्री नरवाहन व अमात्य कांचन आले आहेत.

**कृष्ण०:**–येऊं देत त्यांना ! वेळेवर आले, फार चांगलें झालें ! ( मधुमालती जाते. नरवाहन व कांचन येतात. )

**कांचन०**:–महाराज, मी शत्रूच्या वकिलाचें बोलणें समजून घेतलें. पण त्यांत अक्काच्या अथवा माझ्या मनाजोगें बोलणें कांहींच नाहीं !

**नर०**:–तुम्हाला आतां पाहिजे तरी काय ? सारंगदेवानें सीमांत देश सोडला, तुमचें स्वातंत्र्य कबूल केलें, आणि लढाई तहकूब करून तो आपल्या सैन्यासह राजधानीला परत निघूनसुद्धां गेला ! आतां आणखी त्यानें काय करावें म्हणतां ?

**सुमं०**:–त्यानें काय करावें म्हणतोस ना ? त्यानें आपली बहीण आमच्या हवालीं करावी. तिला आम्ही जन्मभर बटकीप्रमाणें वागवणार !

**कांचन०**:–अगदीं बरोबर ! उज्वलेला बटीक करीन असें मी सारंगदेवाजवळ बोललों आहें तसें झालेंच पाहिजे !

**कृष्ण०**:–झालेंच पाहिजे ! नरवाहना, उज्वलेमुळें या दोघांची फार अमर्यादा झाली आहे तिचें परिमार्जन याच तऱ्हेनें झालें पाहिजे. उज्वलादेवी हस्तगत झाली तर लढाई बंद होईल. नाहीं तर होणार नाहीं.

**नर०**:–राणीसाहेब, अहो अमात्य, तुम्ही आपल्या बहिणीशीं आणि भावाशीं इतक्या खुनशीपणानें वागणें फारच वाईट आहे !

**कृष्ण०**:– ( चपापून स्वगत ) हें काय भलतेंच बोलतो हा ! (उघड) अरे ! काय वाचाळपणा करतो आहेस हा ?

**सुमं०**:–नरवाहना, शुद्धीवर आहेस काय ? कोण कुणाची बहीण म्हणतोस सांग पाहूं ? उज्वलेनें कांचनाच्या मानेवर तलवार ठेवून स्वतःला बहीण म्हणवून घेतलें; एवढ्यावरून ती आमची बहीण अथवा सारंगदेव आमचा भाऊ असलें नातें उत्पन्न करायला तुला कांहीं शरम वाटायची होती !

**कांचन०**:–असलें हें याचें मानभावीपणाचें बोलणें ऐकून माझ्या अंगाची आग होऊन गेली आहे !

**नर०**:–यांत कसला आला आहे मानभावीपणा ! जें खरें आहे तेंच मी बोललों !

**सुमं०:**—खरें आहे तेंच बोललों असें म्हणतोस; तर मग सांग उज्वला आमची बहीण आणि सारंगदेव आमचा भाऊ कसा होतो तो !

**कांचन०:**—सांग ! आत्तां सांग !

**कृष्ण०:**—( क्रोधाचा आविर्भाव आणून ) हे पापी प्राण्या ! काय हें अप्रयोजक भाषण करतो आहेस ?

**नर०:**—( चपापून ) होय. थोडा घसरलों खरा !

**कृष्ण०:**—घसरला नव्हेस तर काय ! उगीच वडाची साल पिंपळाला लावूं लागलास तर आम्ही बरें ऐकून घेऊं ?

**नर०:**—चुकलों ! चुकलों ! सर्वांनीं क्षमा करावी.

**कृष्ण०:**—(स्वगत) आतां हा विषय झटकन् शिताफीनें बदललाच पाहिजे! ( उघड हंसत ) नरवाहना, तूं मंत्री म्हणवतोस, पण शत्रूच्या मर्मस्थानावर प्रहार कसा करावा हें राणीसाहेबांना जसें कळतें तसें तुला कळत नाहीं ! तुझें मंत्र्याचें काम याच करूं लागल्या तर कसें होईल बरें ! मला वाटतें राणीसाहेब मंत्री, आणि त्यांचे बंधु हे अमात्य, या दोघांच्या सल्ल्यानें माझा राज्यकारभार उत्तम चालेल ! नाहीं बरें ?

**नर०:**—ठीक आहे. तसेंच करा ! आम्ही घरीं बसतों. तुमचें राज्य तुम्हीच करा ! ( स्वगत ) चालूं द्या कारभार ! शंकर, पार्वती आणि नंदी ! ( जाऊं लागतो. )

**कृष्ण०:**—अरे थांब ! जाऊं नकोस. शत्रूचा वकील आम्हाकडे आला आहे, त्याप्रमाणें उज्वलेबद्दलची आमची शर्त कळवण्याकरतां आमचाही वकील कोणी हुशार कर्ता माणूस सारंगदेवाकडे गेला पाहिजे. तो तूंच जाईनास ?

**नर०:**—मी सारंगदेवाकडे जाऊं ? सारंगदेव म्हणजे रावण महाराजांची स्वारी ! आमची बटीक करण्यासाठीं तुझी बहीण आमच्या हवालीं कर असें मी त्याला बोललों तर तो मला हिरवाच खाऊन टाकील हिरवाच ! मी जाणार नाहीं. दुसरा कोणी वकील पाठवा !

**सुमं०**:–महाराज, उज्वलादेवी हस्तगत झाल्यावर ती माझी दासी झाली पाहिजे याबद्दल आपलें वचन पक्कें आहे ना ?

**कृष्ण०**:–होय. तसेंच घडून येईल. आमच्या सैन्यानें तिला कैद केल्याबरोबर तिला तुझ्याच हवालीं करतों. आतां तरी तुझा संतोष झाला ना ?

**सुमं०**:–( हंसत ) ज्याअर्थीं संतोषाचे कल्पवृक्ष आपण मला लाभलां आहां, त्याअर्थीं मला संतोषाचा काय तोटा ! पण मी विनोदानें भांडलें त्याचा राग नाहींना आला ?

**कृष्ण०**:–तुझ्यावर माझा पराकाष्ठेचा राग असल्यामुळें मला तुझा मुळींच राग येत नाहीं !

**सुमं०**:–कांचना, चल जाऊं या. नरवाहनानें तहाची मसलत केली ती आम्हीं हाणून पाडली कीं नाहीं ?

**कांचन०**:–( सुमंगलेस ) उगीच लांवली होती म्हाताऱ्यानें टुरटुर ! आतां बसला आहे गप ! ( दोघें हंसत निघून जातात. )

**नर०**:–महाराज, हा कलहाग्नि अधिकाधिक पेटवून आपण पृथ्वी जाळून टाकणार आहां कीं काय ! उज्वलादेवी जिवंतपणें आपल्या हातीं लागेल असा का आपणाला भ्रम आहे !

**कृष्ण०**:–ती कधीं आमच्या हातीं लागणार नाहीं हें मलाही पक्कें ठाऊक आहे !

**नर०**:–मग अशी अट घालण्यांत हेतु काय ?

**कृष्ण०**:–हेतु म्हणशील तर सुमंगलेचा संतोष होतो हा आहेच; शिवाय युद्ध चालू ठेवून वैवर्तदेशाचा विध्वंस करायला कांहीं तरी सबब पहातच होतों, ती हीच कां असेना; म्हणून पतकरली आहे !

**नर०**:–आणि याचें पुढें पर्यवसान काय ?

**कृष्ण०**:–याचें पर्यवसान सारंगदेव मरणार, आणि त्याचें राज्य मी बुडवणार !

**नर०**:–बुडवणार म्हणजे ?

**कृष्ण०**:–बुडवणार म्हणजे ओस पाडणार ! दोन दोनशें कोसांत दिवा लागूं नये असें करणार ! दुसरें काय ? असलें हें पापी राजाचें राष्ट्र भूतलावर जिवंत रहायला पाहिजे कशाला ? सारा वैवर्तदेश शिकारी-करतां भलें मोठें अरण्य करून सोडतों ! तूं काय समजला आहेस ! सारंगदेव मेला म्हणजे त्याचें राज्यही बुडालें आणि त्याचा वंशही बुडाला ! पुन्हां त्या राजवंशाचें नांव सुद्धां निघायला नको !

**नर०**:–असें कसें होईल ? त्याचा चुलत भाऊ कांचन त्या राज्याचा योग्य वारस अद्यापि हयात आहेच कीं नाहीं ?

**कृष्ण०**:–पण तो सारंगदेवाचा चुलत भाऊ आहे ही गोष्ट मी बाहेर फोडतों आहें कशाला ?

**नर०**:–तर मग सुमंगला व कांचन हीं भैरवदेवाचीं मुलें आहेत हें खुद्द त्यांना अगर सारंगदेवाला कधींच कळूं द्यायचें नाहीं म्हणतां ?

**कृष्ण०**:–होय. अलीकडे मीं तसाच निर्धार केला आहे.

**नर०**:–पण ही गोष्ट कधीं तरी आपण प्रसिद्ध करणार आहों असें एका काळीं आपल्या बोलण्यांत येत होतें.

**कृष्ण०**:–पण त्या वेळचें धोरण निराळें होतें ! कृष्णकांचनाच्या-ही उपायानें सारंगदेव जर वठणीस आला नाहीं तर त्याच्या राज्यांत दुफळी माजवण्याकरतां मला त्याच्या गादीचा आणखी एक वारस म्हणून हें कांचनाचें बाहुलें पुढें उभें करायचें होतें ! आतां तसें करायचें कारण राहिलें नाहीं. आणि म्हणूनच वैवर्त देश ओस पाडण्याचा व शत्रूचा वंशच मुळीं नाहींसा करण्याचा मीं निश्चय केला आहे.

**नर०**:–महाराज, शत्रूचा वंश आणि त्याचें राज्य यांचा उच्छेद करण्याच्या अत्याग्रहाला आपण पडलां आहां हें चांगलें नाहीं. हें तडीला जाणार नाहीं.

**कृष्ण०**:—पहातों कसें तडीला जात नाहीं तें! ( जाऊं लागतो. )

**नर०**:—आपली गुप्त गोष्ट मी सारंगदेवाला अथवा सुमंगलेला कळवीन आणि मग पाहीन कशी लढाई बंद होत नाहीं ती !

**कृष्ण०**:—( मागें वळून रागानें ) कळवशील ? कळवशील तर लढाई बंद व्हायचें बाजूलाच राहील आणि तूं मात्र फुकट मरशील ! कारण तूं रहस्य फोडशील तेव्हां सुमंगलेच्या बापाला कसें विश्वासघातानें तूं मारलेंस हेंही आपोआप बाहेर पडेलच !

**नर०**:—पण तें कर्म मीं आपल्या हुकमावरून केलेलें आहे !

**कृष्ण०**:—खरं; पण मी तें आतां काय म्हणून कबूल करीन ? तूं कळवायला जा मात्र, कीं सुमंगला तुला तत्काळ सुळावर चढवील ! आणि तिच्या भयानें तूं सारंगदेवाकडे पळून गेलास तर तो तुला फांशीं देईल ! तूं माझा खेळीमेळींतला लहानपणापासूनचा मित्र आहेस म्हणून मी तुला वांचवीन म्हणत असशील तर माझा भरंवसा धरूं नकोस. राजा आपला मित्र आहे असें समजणारे लोक महामूर्ख आहेत हें पक्कें समजून ठेव ! आज मुखरस पाघळून तूं मरत होतास. पण आजचा दिवस मीं तुला वांचवलें आहे. पुन्हा असें करूं नकोस. म्हाताऱ्या ! काय चार दोन वर्षें तुला जगायचें आहे तें सुखानें जग ! फुटक्या तोंडाचा आणि फुटक्या कपाळाचा होऊं नकोस ! ( जातो. )

**नर०**:—आज ही स्वारी खूबच रंगांत आली आहे ! स्वर्ग दोन बोटें उरल्याचा याला भास होतो आहे ! बरें आहे ! माझाही दिवस कधीं तरी येईलच ! ( किंचित् थांबून ) हे राजे लोक आपल्या स्वार्थासाठीं प्रेमानें गळ्यांत हात घालून आम्हांकडून दुष्ट कर्में करवतात आणि मग कसे नामानिराळे होतात पहा ! राजाला मित्र समजणाऱ्यांची गणना महामूर्खांत होते हे शब्द नवीन नाहींत ! कवि ते कधींच बोलून गेला आहे ! ( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळः**—सारंगपुर. सारंगदेवाचा वाडा.

( सारंगदेव, उज्वला व सरदार बसलीं आहेत. )

**सारंगदेवः**—सरदार हो, माझे सेनापति व प्रमुख अधिकारी कृष्ण-कांचन घेऊन निमकहराम झाले आणि त्यानीं आयत्या वेळीं दगा करून भरलढाईंत मला धरून शत्रूच्या हवालीं करण्याची मसलत केली होती. परंतु प्रद्योतरायांच्या मर्दुमीमुळें त्या वेळीं माझा बचाव झाला; पुढें दर लढाईंत आमचा पराजय होत असतांही प्रद्योतरायानींच वेळोवेळ बाजू सांवरून धरल्यामुळें हा वेळपर्यंत आमचा निभाव लागला आहे. अशा स्थितींत आम्ही तह करून घेण्याला कबूल झालों असतां त्यावर कृष्णदेव काय म्हणतो ? तर तुझी बहीण उज्वलादेवी आमची दासी करण्यासाठीं आमच्या हवालीं कर! त्याचें म्हणणें कीं, सामोपचारानें ती आमच्या स्वाधीन होईल तर तत्काळ युद्ध बंद करीन. आणि तसें न झाल्यास हें राज्य ओस पाडीन आणि शेवटीं तिला धरून नेल्याशिवाय सोडणार नाहीं! ही धमकावणी म्हणजे गर्वानें फुगून गेलेल्या कृष्णदेवाची पोकळ बडबड आहे असें मात्र समजूं नका! कारण त्याचा सेनापति एक लाख फौजेनिशीं सरहद्दीवर येऊन धुमाकूळ घालतों आहे तर दुसऱ्या बाजूनें आणखी एक लाख फौज घेऊन अमात्य कांचन उज्वलादेवीला धरून नेण्याकरितां राज-धानीवर चालून येतो आहे! याप्रमाणें या राज्यावर हें प्राणसंकट ओढवलें आहे; तथापि मी बिलकुल भीत नाहीं. धैर्याच्या आणि पौरुषाच्या बळावर या राष्ट्रीय संकटाशीं झगडण्याची माझी तयारीच आहे! जेथपर्यंत एक शिपाई माझ्याजवळ असेल, माझ्या या अफाट राज्यापैकीं उभें राहण्यापुरती तरी जेथपर्यंत माझी म्हणून भूमि असेल, तेथपर्यंत मी या जुलमी, दगलबाज व मदोन्मत्त शत्रूशीं वैरच करीन; पण ही माझ्या कुळाची प्रतिष्ठा मी हातची कधीं सोडणार नाहीं! सरदारहो, या राज-

कन्येच्या भालपट्टावर दास्याचीं अक्षरें लिहिलीं असतील असें तुम्हांला वाटतें काय ? हिचें अनुपम सौंदर्य, हिचे असंख्य सद्गुण, देशाभिमानाची स्फूर्ति देणारें हिचें चारित्र्य, या साऱ्या देणग्या परमेश्वरानें हिला दिल्या आहेत त्या शत्रूची गुलामगिरी करण्याकरितां दिल्या आहेत काय ?

राग—देशी. ताल—त्रिवट.

**पहा हे महाभागा । बाला । शीलोदारा ।**
**काशि ओपूं दास्य-दशेला ॥ ध्रु० ॥**
**करिन दूर सुगुण साजिरी पळ जरि ।**
**प्रलय तो होय मनाला ॥ २७ ॥**

नाहीं ! नाहीं ! नाहीं ! मी हयात आहें तोंपर्यंत हिच्या मुखचंद्राला शत्रुभयाचें ग्रहण मी कधींही लागूं देणार नाहीं ! हिचें रक्षण आतां माझ्या हातून होत नाहीं असें सांगणारा दिवस जर माझ्या दुर्दैवानें कधीं काळीं उगवलाच, तर विषाचा पेला या माझ्या लाडक्या बहिणीला देऊन दास्याच्या भयापासून ती कायमची मुक्त झालेली मीं डोळ्यांनीं पाहीन, आणि मागून खंजीर काळजांत भोसकून घेऊन मी मरून जाईन ! पण हा माझा निश्चय तडीला नेणें सर्वस्वीं तुमच्या हातीं आहे. तुमच्या बळावांचून मी पंगु आहें. तर सांगा सरदार हो, या प्रकरणीं तुमचा काय सल्ला आहे ? कांहीं तरी कुरापत काढून हें राज्य बुडवावें याप्रमाणें कृष्णदेवाचा दुष्ट हेतु स्पष्ट दिसतो. आणि हरप्रयत्नानें हें राज्य राखणें हें काम तुमचें आहे. तुम्ही परंपरागत खास पथकांचे सरदार आहां. मोठमोठे सुभे, मोठमोठ्या फौजा, खजिने, हीं पूर्वींपासून तुमच्या हवालीं केलीं आहेत तीं असल्या आणीबाणीच्या वेळीं तुम्ही राज्याचा बचाव करावा एवढ्यासाठींच केलेलीं आहेत. जर अनास्थेमुळें, भयामुळें, अगर लोभामुळें शत्रूशीं सख्य करून या राज्याचें स्वातंत्र्य गमावावें असें तुमच्या मनांत येत असेल तर तें मात्र मला कधींही मान्य होणार नाहीं ! या जिवाला शंभरदां मरण

मानवेल, परंतु क्षणाचेंही पारतंत्र्य मानवणार नाहीं ! या मायभूमीच्या वक्षःस्थलावर होणारा शत्रूच्या मदांध वीरांचा थयथयाट हे डोळे पहाणार नाहींत; आणि विटंबनेमुळें तिनें फोडलेल्या किंकाळ्या हे कान ऐकणार नाहींत ! शत्रूच्या हवालीं हें राज्य करून तो घालील तो तुकडा खाऊन स्वस्थ पडून रहावें अशी दुर्वासना जर तुमच्या मनांत उद्भवली असेल तर तसें मला आतांच सांगा; म्हणजे आम्ही तुम्हांला अधिक संकटांत घालणार नाहीं ! जेथें अनंत ब्रह्मांडें लीन झालीं आहेत त्या विस्मृतीच्या अपार जठरांत मृत्यूच्या महाद्वारानें प्रवेश करायला आम्ही बहीणभाऊ या क्षणीं तयार आहों !

( सरदार आपआपसांत कुजबुजतात. )

**एक सरदारः**–महाराज, कृष्णदेवानें आपल्या नेहमींच्या अधमपणाला अनुसरून उज्वलादेवीविषयीं अशी उर्मटपणाची मागणी केली यांत त्यानें आपला उपहास मात्र करून घेतला आहे ! पण त्याबद्दल आपण इतकी निराशा धरावी, संताप करून घ्यावा, असें त्याचें काय महत्व आहे ? कृष्णदेव म्हणजे कोणच्या झाडाचा पाला ! त्याचा अमात्य अगर सेनापति यांची तरी या राज्याला उपद्रव देण्याची काय किंमत आहे ! या राज्याचे आधारस्तंभ आम्ही खानदानीचे सरदार आहों. आम्हांपैकीं प्रत्येक जण म्हणजे एक प्रचंड सैन्यच आहे ! प्रथमच आम्हाला आपण लढाईवर नेमलें असतें तर आमचें सामर्थ्य केव्हांच शत्रूला जाहीर झालें असतें !

**सारंग०ः**–( आनंदानें ) होय ! तुम्ही तसेच सामर्थ्यवान् आहां यांत मला बिलकुल संशय नाहीं !

**उज्व०ः**–( स्वगत ) तुमच्या सामर्थ्याबद्दल संशय मलाही नाहीं. संशय वाटतो तो तुमच्या इमानाबद्दल ! पण किती सांगितलें तरी हें दादाच्या मनांतच भरत नाहीं याला काय करावें !

**दुसरा सरदारः**–असो. अजूनही कांहीं बिघडलें नाहीं. युद्धासाठीं

आमच्या सेना तयार आहेत व शत्रूची केव्हां गांठ पडेल म्हणून वाट पहात आहेत ! याकरितां महाराजानीं आम्हाला बरोबर घेऊन आजच स्वारीला निघावें; आणि शत्रूचा सेनापति राज्यांत शिरला नाहीं तोंच त्याला गांठून त्याचा संहार करावा.

**सारंग०:**—वाहवा ! फार चांगली गोष्ट ! ही मसलत मला फारच पसंत पडते.

**उज्वला०:**—पण इतकी घाई कां ? चार दिवस दम धरला तर तितकें बरें नव्हे का ?

**सारंग०:**—तुझें म्हणणें ऐकावें तर हे सरदार नाउमेद होणार. तें उपयोगाचें नाहीं. आजच निघायचें !

**उज्व०:**—पण मी आल्याखेरीज कोणतीही मसलत ठरवूं नये असें प्रद्योतरायांचें पत्र आलें आहे त्याचा कांहींच का मान करायचा नाहीं ?

**सारंग०:**—ते येतपर्यंत थांबायला आतां अवकाश नाहीं. माझ्या विश्वासू सैन्याचा हल्ला विद्युत्पाताच्या तडाक्याप्रमाणें कसा भयंकर आणि कसा दुर्निवार आहे हें कृष्णदेवाला जितकें लौकर कळेल तितकें मला कळवायचें आहे ! प्रद्योतरायांच्या पत्राचा मान मी अलबत करणारच; आणि तो असा कीं, तुझें आणि राजधानीचें संरक्षण करण्याचें काम मी त्यांवरच सोंपवतों ! शत्रूच्या सेनापतीचा पराजय करून आम्ही परत येईपर्यंत अमात्य कांचनाला थांबवून धरण्याचें जोखीम आम्ही त्यांच्या शिरावर टाकतों. तुझ्या रक्षणाची मला जी काळजी आहे तिचे विभागी होण्याचा हक्क त्यांचा आहे. कारण कीं आतां लवकरच ते तुझे जन्माचे संरक्षक होणार. त्यांच्या हवालीं तूं असलीस म्हणजे मी कुठेही असलों तरी मला चिंता नाहीं !

**उज्व०:**—( स्वगत ) मला कांहीं या स्वारीची धडगत दिसत नाहीं ! काय कपाळीं असेल तें खरें !

**सारंग०:**—सरदार हो, ठरलें तर ! आम्ही आजच स्वारीला निघणार !

**खद्योत०**–( सारंगदेवाच्या पायावर डोकें ठेवून ) महाराज, मलाही आपण बरोबर नेलें पाहिजे. जिथे आपले पाय तिथे माझें शीर ! आपल्या सहवासाला मी क्षणभरसुद्धां मुकलों तर माझा जीव कासावीस होतो !

**सारंग०**–( हंसत ) खद्योता, तूं आहेसच तसा इमानी ! ऊठ ! तुलाही बरोबर नेईन.

**उज्व०**:–( निक्षून ) नाहीं दादा ! या घातकी नीच मनुष्याला केव्हांही जवळ राहूं देऊं नकोस !

**सारंग०**:–पण यानें काय गुन्हा केला आहे तें सांग म्हणजे याला दूर करतों.

**उज्व०**:–( स्वगत ) मल्लिकेला मी वचन देऊन चुकलें आहें तेव्हां सांगूं तरी कसें ? ( उघड ) तें मी कांहीं सांगत नाहीं. केवळ माझ्या आग्रहाकरतां म्हणून याला जवळ देखील येऊं देऊं नकोस !

**सारंग०**:–बरें आहे. खद्योता, ताईच्या आग्रहाकरतां मी तुला तूर्त बरोबर नेत नाहीं. रागावूं नकोस.

**खद्योत०**:–ताईसाहेब, हा खद्योत आपला दासानुदास आहे. यावर आपली अवकृपा कां झाली हें समजत नाहीं ! ( तिचे पाय धरूं लागतो. )

**उज्वला०**:–चल नीचा ! हो दूर !

**खद्योत०**:–( उठून स्वगत ) अग सटवे ! माझी लठ्ठ शिकार ही दुसऱ्या-न्दां माझ्या हातची घालवतेस काय ! बरें आहे ! याबद्दल तुला लौकरच रडायला आणि ऊर बडवायला लावतों कीं नाहीं तें पहा !

**सारंग०**:–तर मग शत्रूचा वकील इथे येऊन उत्तराकरतां तगादा करीत बसला आहे त्याला काय उत्तर द्यायचें तें मीं निःशंकपणें द्यावें ना ?

**सर्व सरदार**:–होय ! त्याला निःशंकपणें खुशाल उत्तर द्यावें आणि निरोप द्यावा !

**सारंग०**:–ठीक आहे. ( नोकरांस ) जारे, शत्रूच्या वकिलाला घेऊन या. ( नोकर जातात व वकिलास घेऊन येतात. )

**वकीलः**—सारंगदेव महाराज, उज्वलादेवीला हवालीं करण्याविषयीं आमच्या महाराजानीं जी मागणी केली आहे त्याबद्दल आपलें काय म्हणणें आहे ?

**सारंग०**ः—तुम्ही आपल्या धन्याला जाऊन कळवा कीं, जेथपर्यंत या सारंगदेवाच्या कुडींत जीवात्मा आहे तेथपर्यंत तो तुझ्या शब्दाला कधींही मान वांकवणार नाहीं; आणि बहिणीला हवालीं करण्याची अपमानास्पद गोष्ट स्वप्नांतसुद्धां आणणार नाहीं ! असला हा अतिशय मगरूरीचा निरोप तूं कोणच्या बळावर पाठवलास हेंच समजत नाहीं ! हें राज्य घेणें जितकें तूं सोपें समजतोस तितकें तें मुळींच सोपें नाहीं हें पक्कें ध्यानांत ठेव. तुला फितुराची भुसभुशीत जमीन पुढें पुढें लागली ती सहजासहजीं पोंखरून तूं स्वतःला कृतार्थ म्हणवून घेत असशील; परंतु या वैवर्तदेशीयांच्या पराक्रमाचे अढळ पर्वत तुला अद्यापि फोडायचेच आहेत ! प्रेमरज्जूनीं गुंफलेलीं स्वामिभक्तीचीं जाळीं सर्व राज्यभर पसरलीं आहेत तीं तुला अजून तोडायचींच आहेत ! कर्तृत्वशाली व महान् पराक्रमी अशा असंख्य वीरांचे मानग्रंथि अजून तुला उकलायचेच आहेत ! हें काम प्रत्यक्ष अमरेंद्रालाही होणें दुर्घट आहे, येथें तुझा काय पाड आहे ? जा ! वकील ! तुम्ही आपल्या धन्याला आणखी स्पष्ट कळवा कीं, या वैवर्तदेशाच्या राज्यदेवीवर तूं जो कावेबाजपणानें फितुराचा प्रहार केलास त्याचा धक्का लागून ती क्षणैक निश्चेष्ट पडली होती. ती संधि साधून तूं या उज्वलादेवीला धरून नेण्याला उद्युक्त झालास; पण भयत्रस्त झालेल्या या तिच्या परमप्रिय कन्यकेची आरोळी ऐकतांच ती राज्यदेवी आवेशानें खडबडून उठली आहे ! तिनें आतां आपला दैवी सामर्थ्याचा देदीप्यमान मुकुट शिरावर चढवला आहे, आत्मप्रत्ययाचा पदर घट्ट बांधला आहे, निश्चयाची कांची सांवरली आहे, आणि लाखों हातांनीं लाखों शस्त्रास्त्रें सज्ज करून युद्धासाठीं ती तुला धिक्कारानें पुन्हा आव्हान करीत आहे !

राग—अडाना. ताल—तेवरा.

टाकली युद्धासि जन-परमेश्वरी झुंजार ॥ ध्रु० ॥
हास उजळि दिशांस सभय तमास अरि-मनिं थार । १ ।
नाच रणिं करितांच डळमाळि साच भू-विस्तार । २ ।
हांक उपजवि धाक सचकित नाक-सुर-संभार । ३ ।
कोटि-भुज-धृत हेति चमकति होति रिपु-संहार ॥ २८ ॥

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळः—सारंगपुर. एक ओसाड जागा.

( कृष्णदेवाचा वकील व खद्योत बोलत बोलत येतात. )

**वकीलः**—काय हो खद्योत, कालच्या दरबारांतला सारंगदेवाचा तो आवेश आणि ती वीरश्री पाहून आपण तर अगदीं भेदरून गेलों बुवा ! आतां यापुढें आमच्या सेनापतींची काय वाट होईल ही मला धास्तीच पडली आहे !

**खद्यो०**—अहो, तें नुसतें पोकळ अवडंबर आहे ! तें कशाला तुम्ही खरें मानतां ? मी तुम्हाला खात्रीनें सांगतों कीं, कृष्णदेवानें या राज्याला जो वणवा लावला आहे तो विझवून टाकण्याचें सामर्थ्य आतां सारंगदेवांत राहिलेलें नाहीं ! तो गडगडाट करील, विजा चमकावील, पण त्यांत आतां पाणी राहिलेलें नाहीं हें तुम्ही पक्कें समजा ! उगीच कशाला काळजी करतां ?

**वकीलः**—पण तुमचे ते खास पथकांचे सरदार ! एकापेक्षां एक बलाढ्य म्हणून नांवाजलेले ! आमच्या सेनापतींचा पराजय करण्याविषयीं त्यांनीं तर दरबारांत विडा उचलला आहे म्हणे !

**खद्यो०**—( तिरस्कारानें ) विडा उचलला म्हणजे काय झालें ? मी

असले पंचवीस विडे उचलतों आणि खाऊनसुद्धां टाकतों ! अहो, ते बडे लुच्चे दगलबाज सरदार आज कित्येक वर्षं कृष्णकांचन घेऊन घेऊन गबर झाले आहेत ! सारंगदेवाला त्यानीं राजधानींतून काढून नेलें आहे तें नेमकें तुमच्या सेनापतींच्या हवालीं करण्यासाठींच नेलें आहे हें नाहीं का तुम्हाला समजलें ?

**वकील**:–( आश्चर्यानें ) नाहीं बुवा ! हें नाहीं आपल्या ध्यानांत आलें !

**खद्यो०**:–( हंसत ) अहो, कृष्णकांचनाची गंमत ती हीच आहे ! त्याचा प्रभाव सप्तपाताळापर्यंत खोल गेला आहे, आणि दशदिशा व्यापून राहिला आहे, तरी प्रसंगाशिवाय त्याचें ज्ञान कुणालाच होत नाहीं ! कृष्णकांचनाचा प्रसार करणारे तुमच्या धन्याचे दूत हजारों आहेत, परंतु त्यांत एकाची एकाला दाद नाहीं ! आणि तें कांचन घेणारे लाखों आहेत तरी त्यांतसुद्धां एकाचें कर्म दुसऱ्याला माहीत नाहीं !

**वकील**:–एकूण तुमच्या खास पथकाच्या सरदारांनीं सारंगदेवाचा तर निकाल लावलाच म्हणायचा ! आतां प्रद्योताचीच काय ती पंचाईत राहिली ! अमात्य कांचनाला अडवण्याकरतां तो महापराक्रमी व एकनिष्ठ सरदार लांब लांब मजली करून राजधानीकडे येतो आहे त्याची काय वाट करावी ? त्यावर फितुराचा इलाज चालणार नाहीं. त्याला नाहींसा करण्याची कांहीं तरी शक्कल निघाली पाहिजे. आणि ती शक्कल काढाल तर तुम्हींच काढाल !

**खद्यो०**:–तर मग पूल बांधा पूल !

**वकील**:–पूल बांधूं ? कशाचा पूल. बांधूं म्हणतां ?

**खद्यो०**:–या खद्योताकडे ज्याला यायचें त्याला मोहरांचा पूल बांधून त्याच्या आधारावर यावें लागतें, एरवीं हा खद्योत कुणाच्याही हातीं लागत नाहीं ! समजलांत ? हा खद्योत म्हणजे कांचनगंगेंतला मासा आहे बरें ! कांचन ! कांचन ! त्याशिवाय याला दुसरें जीवनच नाहीं !

**वकीलः**–ठीक आहे! आमचें काम कराल तर मागाल तितकें कांचन तुम्हाला देतों! तें काम माझ्याकडे लागलें!

**खद्यो०ः**–आणि प्रद्योताला तुमच्या आटोक्यांत आणून देण्याचें काम माझ्याकडे लागलें! ( स्वगत ) मलाही त्या प्रद्योतावर आणि उज्वलेवर सूड घ्यायचाच आहे!

( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळः**—प्रद्योताच्या छावणीजवळचा एक बाग.

( प्रद्योत येतो. )

**प्रद्योतः**–हें उज्वलेचें पत्र. तुम्हाशीं कांहीं स्वस्थपणानें एकांतांत बोलायचें आहे, याकरतां या मनसंतोष बागेंत मला भेटायला या; असें तिनें या पत्रांत लिहिल्यावरून मी इथे आलों. पण ती अथवा तिचीं माणसें तर इथे कोणीच दिसत नाहींत हें काय बरें असेल? मला कांहीं कळवायचें झालें तर ती नेहमीं माल्लिकेबरोबर निरोप पाठवते. पत्र कधींच पाठवीत नाहीं. आणि आज तिनें पत्र पाठवलें हेंही आश्चर्यच म्हणायचें! हें पत्र खोटें तर नसेल ना? ( कानोसा घेऊन ) छे! पण असली शंका घेण्याचें कारणच नाहीं. कारण त्या झाडीआडून कोणी माणसें धांवत येत असल्याचा भास होतो. ( पाहून चपापतो. ) अरेच्या! हे तर सारे शत्रूचे सैनिकच दिसताहेत आणि हे माझ्याकडेच धांवत येत आहेत! हां! इथे खाचित दगा आहे! धूमकेतूचें दर्शन ज्याप्रमाणें दुष्काळ वगैरे आपत्तींचें सूचक असतें त्याप्रमाणें सैनिकांच्या अग्रभागीं धांवणाऱ्या त्या खद्योताचें दर्शन विश्वासघाताचें सूचक आहे! हें कांहीं तरी कृष्णकारस्थान दिसतें! ( तरवार उपसतो. सैनिकांसह कृष्णदेवाचा वकील व खद्योत येतात. )

**वकील०ः**–हाच प्रद्योत!

**खद्योत०**:–हाच तो हरामखोर बेरड !

**प्रद्योत०**:–अरे समजलों ! हा मी तुमचा काळ तयार आहें ! चला ! या !

**वकील व सैनिक०**:–मारा ! कापा ! तोडा ! ठार मारा ! (प्रद्योतावर तुटून पडतात. तो आवेशानें लढूं लागतो. "काय गलबल आहे ? माझ्या देखत बेकैदी आणि आपसांत मारामारी !" असा पडद्यांत शब्द होतो.)

**खद्योत०**:–( घाबऱ्या घाबऱ्या स्वगत ) हीं कोण माणसें येताहेत कुणाला ठाऊक ! ( पळून जातो. )

( कुबड्याचें सोंग घेतलेला कृष्णदेव तरवार उपसून धांवत येतो. )

**कृष्ण०**:– व्हा दूर ! नाहींतर तुम्हा सर्वांना तोडून टाकतों ! ( सैनिक व वकील पळून जातात व प्रद्योत त्यांचा पाठलाग करीत जातो. ) अरेच्या ! हा काय मूर्खपणा मीं केला ! हे माझे सैनिक आपसांत मारामारी करतात असें समजून मी सोडवायला धांवलों आणि पहातों तों हे आयते आपण होऊन प्रद्योताला मारीत होते ! माझ्याकडे कांहींएक दोष न येतां परस्पर काम भागत होतें, सुंठीवांचून खोकला जात होता, तों मीच इथे येऊन माझ्याच सैनिकांना धुडकावून लावलें ! फार मोठी चूक झाली ! आतां तो प्रद्योत तरी पुन्हां इकडे येतो कीं परस्पर छावणीकडे जातो कोण जाणे ! ( पाहून ) आला ! आला परत ! आतां याला आणखी एकदां कृष्णकांचनाचा लोभ दाखवून कांहीं उपयोग होतोसा पाहूं ! ( प्रद्योत येतो. )

**प्रद्यो०**:–( हर्षानें ) वाहवा ! कोण ? कुबडा शेट !

**कृष्ण०**:–होय. मीच तो ! तुझ्या बापाचा मी जिवलग मित्र असल्याचें पूर्वीं तुला सांगितलें होतें तें आठवतें ना ? अरे, वेळेवर जो मैत्रीला जागत नाहीं तो मित्र कसला ! हें मारेकऱ्यांचें अरिष्ट तुझ्यावर ओढवणार हा सुगावा लागतांच मी इथे धांऊन आलों ! आणि वेळेवर आलों म्हणून बरें, नाहींतर मोठा घात झाला असता !

**प्रद्यो०**:–( तिरस्कारानें ) तीं काय करणार होतीं गव्हारें ! मला मारण्याऐवजीं स्वतःच मरून गेलीं असतीं झालें ! पण एवढ्यानें

तुझ्या वेळेवर उपयोगीं पडण्याची किंमत कमी होत नाहीं. तूं माझा अकारण मित्र आहेस व आदराला पात्र आहेस. तुला पाहतांक्षणींच हे मारेकरी पळून गेले हें कसें काय ?

**कृष्ण०**:—अरे, कृष्णदेवाच्या कोणी दुष्ट अधिकाऱ्यानें तुझ्यावर हे आपले सैनिक मारेकरी घातले होते. पण कृष्णदेव आणि मी नेहमीं एकत्र रहाणारे असल्यामुळें मी पडलों या मारेकऱ्यांच्या ओळखीचा ! त्यामुळें त्या गुलामांनीं मला पाहतांच पोबारा केला ! असो. आतां मी एकदम मुद्याच्याच गोष्टीवर येतों. कृष्णदेव राजानें मला मुद्दाम तुझ्याकडे पाठवलें आहे.

**प्रद्यो०**:—काय म्हणतो कृष्णदेव ?

**कृष्ण०**:—कृष्णदेवाचें म्हणणें असें आहे कीं, हें सर्व राज्य आम्हीं व्यापलें आहे पण तुझ्या पराक्रमामुळें राजधानीमात्र आमच्या हातीं लागत नाहीं. तर तूं हत्यार खालीं ठेवून आम्हाला शरण यावेंस आणि राजधानीच्या किल्ल्या आमच्या हवालीं कराव्यास.

**प्र०**:—अरे वा ! कृष्णदेवाचा स्वभाव फार मिडस्त दिसतो ! राजधानी म्हणजे राज्याचें काळीज. तें सारंगदेवानें विश्वासानें माझ्या हवालीं केलें. त्याची धनदौलत व मुलें माणसें सारीं राजधानींतच आहेत. राज्यांतल्या धनिक लोकांचें द्रव्यही तिथेंच सांठवलें आहे. तर देशद्रोह करून हें राज्याचें काळीज आमच्या हवालीं कर असें कृष्णदेव नव्हे, ब्रह्मदेव म्हणाला तरी मी ऐकणार नाहीं ! जिच्याबद्दल युद्ध चाललें आहे ती उज्वलादेवी सुद्धां राजधानींतच राहते. अर्थात् राजधानीबरोबर तिलाही स्वाधीन करण्याविषयीं कृष्णदेवाचें म्हणणें असेलच ! किंबहुना राजधानी नको, कांहीं नको, तेवढी उज्वलादेवी हातीं आली तरी पुरे; यावर सुद्धां कृष्णदेव राजा आतां कबूल होईल ! नाहीं बरें ?

**कृष्ण०**:—तूं त्याच्या मनाप्रमाणें वागशील तर उज्वलादेवीबद्दल त्याचा हेका नाहीं. तिच्याशीं विवाह करून तूं खुशाल संसार कर ! राजधानी-

तली सर्व दौलत तुला बक्षीस मिळेल. तुझी जहागीर तुझ्याकडे चालेल. आणि शिवाय या राज्याचा चौथा हिस्सा तुला आजच दिला जाईल. हें सारें कमी वाटत असेल तर आणखी माग ! तूं जें मागशील तें यावेळीं तुला मिळण्याजोगें आहे.

**प्रद्यो०:**–( हंसत ) ही झाली कृष्णदेवमहाराजांच्या अनुग्रहाची गोष्ट. आतां त्यांचें बोलणें मीं ऐकलें नाहीं तर ते माझा निग्रह कसा काय करणार तेंही कळूं दे !

**कृष्ण०:**–तें त्यांनीं कशाला सांगायला पाहिजे ? तें तुला नाहीं कळत ? तूं आजपर्यंत त्यांच्या सैन्यांना दाद दिली नाहींस, पण हा तुझा क्रम यापुढें असाच निर्बाध चालेल हा भ्रम वेडेपणाचा आहे ! ज्याचा तुला मुख्य आधार तो सारंगदेव भयाभंगाला जाऊन रानावनांत भटकतो आहे. तेव्हां तूं कुणाच्या आधारावर कुणासाठीं भांडणार ? कांहीं केलेंस तरी पराजय तुझ्या कपाळीं ठेवलेला आहे ! तूं सैन्यासह मारला जाणार. मग उज्वलादेवीचें कोण रक्षण करील ? कृष्णदेव तिला धरून नेऊन आपली बटीक करणार हें उघड दिसतें आहे ! म्हणून म्हणतों कीं स्वतःचा आणि तिचा नाश करून घेण्यापेक्षां तूं उभयतांचें कल्याण करून घ्यावेंस हाच उत्तम पक्ष आहे. राजा कृष्णदेवाच्या निग्रहानुग्रहाचे मार्ग या याप्रमाणें आहेत हें तुला समजून दिलें आहे. आतां यावर तुझें काय म्हणणें असेल तें सांग म्हणजे त्या राजाला जाऊन कळवतों.

**प्रद्यो०:**–माझें उत्तर कृष्णदेवाला सांग कीं, तूं म्हणतोस ती गोष्ट या प्रद्योताच्या हातून कधींही होणें नाहीं ! चौथाई राज्याचा आणि अपार द्रव्याचा लोभ तूं मला दाखवतोस पण प्रत्यक्ष महेंद्राचें ऐश्वर्य मिळत असलें तरीसुद्धां मी देशद्रोह करणार नाहीं ! ! ! उज्वलेबरोबर सुखानें संसार करतां यावा म्हणून तुझें बोलणें मीं मान्य करावें म्हणशील, तर तिच्या गळ्याला मिठी मारण्यासाठीं मी स्वदेशाला गळफांस कसा लावूं ? आणि तें तिला तरी कसें मानवेल ? या युद्धांत आतां आम्हांला जय मिळत

नाहीं हें सांगायला कृष्णदेव नको ! फितुराच्या कूटपाशांत गुरफटलेली जयश्री आम्हांला काय हात देणार हें कळलेंच आहे ! असें जरी आहे तरी या प्रद्योतावर जय मिळवणें फारसें सुखदायक अथवा फायदेशीर नाहीं हेंही कृष्णदेवाला लौकरच कळेल ! कारण कीं या प्रद्योताच्या रक्ताचा प्रत्येक थेंब कृष्णदेवाच्या डोळ्यांतून टिपें पाडील आणि याचा प्रत्येक घाव त्याचें सिंहासन कंपायमान करील ! उज्वलादेवीला धरून नेण्याची जी तो धमकी दाखवतो तिला मी मुळींच भीत नाहीं. कारण कीं, कांचनाच्या दृष्टीला तिचें प्रतिबिंब तरी पडलें, पण कृष्णदेवाची दृष्टि तितकीही दैववान् नाहीं ! मग त्या राज्यकन्येला धरून नेण्याची गोष्ट तर दूरच राहिली ! ती जिवंत अशी त्याच्या हातीं कधीं लागणार नाहीं !

**कृष्ण०:**—पण तिला तर धरून नेण्याची कृष्णदेवाची प्रतिज्ञा आहे !

**प्रद्यो०:**—उज्वला माझें हृदय आहे. मी जिवंत असतां माझें हृदय कोण माझ्यापासून घेऊं शकेल ?

**कृष्ण०:**—पण तूं युद्धांत पडलास म्हणजे तरी कृष्णदेवाची प्रतिज्ञा तडीला जाईल कीं नाहीं ?

**प्रद्यो०:**—मीच पडल्यावर माझें हृदय तरी जिवंत कसें राहील ? पण कुबडाशेट ! तूं असा उपकारी मित्र ज्या कामाकरतां माझ्याकडे आलास तें काम मला धिक्कारपूर्वक साफ नाकारावें लागलें याबद्दल विषाद मानूं नकोस बरें !

**कृष्ण०:**—अरे, मी कृष्णदेवाचा केवळ दूत आहें. इकडचा तिकडे व तिकडचा इकडे निरोप सांगण्याचें माझें काम आहे. कृष्णदेवाचें म्हणणें तूं ऐकलें असतेंस तर तुझें कल्याण झालें असतें असें मला स्वतःला वाटतें, पण तूं ऐकत नाहींस तर तुझी मर्जी ! त्याबद्दल मी विषाद मानून काय उपयोग ! मी आतां जातों. पण तुला मागच्या खेपेप्रमाणें याही खेपेस अगत्यानें सांगतों कीं, कृष्णदेवाच्या हातून होण्याजोगें तुझें कांहीं काम

उद्धवेल तर मजकडे यायला अनमान करूं नकोस अथवा संकोच धरूं नकोस. त्या दिवशींचा तो माझा यात्रेकरू सोबती तूं पाहिला आहेसच. त्याचें नांव नरवाहन. त्याजकडे जाऊन तूं माझी चौकशी केलीस कीं, अर्ध्या घटकेंत हा कुबडाशेट तुझ्यासमोर हजर आहे असें समज ! तुझें कोणतेंही काम असलें तरी मी हटकून करून देईन.

प्रद्यो०:–( हंसत ) तुझ्या मध्यस्थीनें कृष्णदेवाकडून करून घेण्याजोगें माझें काम कधीं उद्भवेल असें मला वाटत नाहीं. तथापि तूं इतक्या कळवळ्यानें सांगतो आहेस तर तुझ्या समजुतीकरतां होय म्हणायला माझें काय जातें ? ( जाऊं लागतो. )

कृष्ण०:–तूं सांगितलास तोच निरोप मी कृष्णदेवाला कळवूं ना ?

प्रद्यो०:–होय. होय. त्या राजाला माझा निरोप स्पष्ट कळव कीं—

राग–बागेसरी. ताल–एक्का.

कपट–पटु कमला विलास विविध दावी दिसे मज
जन–पद्–हित–वध–विकृता झणि अवगणिं मरण
गणिन रणिं अमर–पद् ॥ ध्रु० ॥ मद्ंतांतरित विजय
समज तुज सोपा न भूपा हटतटें फुकट झटसि वि-
कट–कटक विकत्थनोद्धतवचा ॥ २९ ॥

( जातो. )

कृष्ण०:–इथे कांहीं आमची मात्रा चालेल असा रंग दिसत नाहीं ! तथापि मधाचें बोट लावून ठेवलें आहे ! पाहूं कांहीं उपयोग झाला तर ! ( रागानें ) जर कधींकाळीं हा माझ्या तावडींत सांपडला तर याला चतुर्भुज केल्याशिवाय सोडणार नाहीं !!! यानें फार दमवलें आहे मला !

( जातो. )

## प्रवेश ५ वा.

**स्थळः—खद्योताचें घर.**

( खद्योत येतो. )

**खद्यो०:**—साहित्यशास्त्राचा अभ्यास करण्यांत कज्जला चुकवाचुकव करते काय? करूं दे तिला किती चुकारपणा करते ती! म्हणावें माझ्याशीं गांठ आहे! शिकतां शिकतां म्हातारी होऊन मेलीस तरी हर-कत नाहीं; पण तुला राणी बनवल्याखेरीज हा बहाद्दर कधींही सोडणार नाहीं! कज्जले! काय? हांक देखील देत नाहीं? हे कज्जले, लौकर बाहेर ये कशी! हे मन्मनोमयूरकादंबिनि! निद्रावलंबिनि! वृथाविलंबिनि!

( कज्जला येते. )

**कज्जला०:**—( क्रुद्ध मुद्रेनें ) उजाडलें नाहीं तों झाला का शिव्यांचा भडिमार सुरू!

**खद्यो०:**—हे मदनमंजरि! तूं लौकर बाहेर न येतीस तर तुझ्या दर्श-नाविषयीं आतुर झालेले हे प्राण निघून गेले असते!

**कज्ज०:**—ठाऊक आहे सारें!

**खद्यो०:**—अग तूं राणी होणार ना? मग अशी गांवढळासारखी भांडतेस काय? तोंडाला कुत्रें बांधलें आहेस तें दूर फेकून दे! काय हा मूर्खपणाचा गोंधळ! तुला निक्षून सांगतों कीं हल्लीं घरांत जो प्रकार चालतो तो बंद झालाच पाहिजे. मी घरांत पाय ठेवल्याबरोबर तुझ्या मुखांतून रौद्ररसाच्या ज्वाळा निघूं लागतात, आणि त्या शांत करण्या-साठीं माझ्या मुखांतून करुणरसाचे प्रवाह सुरू होतात! त्याबरोबर दारांत पडून राहणारा श्वान वीररसाच्या गर्जनांनीं आळी दणाणून सोडतो! आणि हा सारा एकच कोलाहल माजतो तेव्हां शेजाऱ्यापाजाऱ्यांत हास्य-रसाचा फैलावा होतो! पण या सर्व रसांपैकीं एकाही रसाला खद्योत महाराजांच्या घरांत याउपर आसरा मिळतां कामा नये. सर्व रसांचा

मुकुटमाणि जो शृंगाररस त्याचीच चर्चा ज्याप्रमाणें सारंगदेव राजाच्या वाड्यांत अहर्निश चालली असते त्याप्रमाणें या घरांत चालली पाहिजे, अशी तुला खद्योत महाराजांची आज्ञा आहे. शृंगारिक कल्पना, शृंगारिक भाषणें, शृंगारिक अभिनय, या सर्वांची माहिती साहित्यशास्त्राचें ज्ञान झाल्याखेरीज होत नसते आणि शास्त्रोक्त बोलणें येत नसतें, हें तुला फिरून फिरून कितीन्दां सांगावें ?

**कज्ज०**:–मला तुमचें शास्त्रोक्त बोलणें येत नाहीं, मला त्याचें कारण नाहीं, आणि तें मला शिकायचें नाहीं !

**खद्यो०**:–मी शिकवतों त्याप्रमाणें शास्त्रोक्त भाषण करायला जर तूं न शिकशील तर मी तुला शास्त्रोक्त थपडा लगावीन ! हो ! सांगून ठेवतों आहें !

**कज्ज०**:–( स्वगत ) असें काय ? तर मग आज तुमची चांगलीच खोड मोडतें ! ( उघड ) मी शिकणार नाहीं म्हणतें, आणि तुम्ही शिकवतों म्हणतां; तर मग आतां शिकवा कसें काय शिकवतां तें !

**खद्यो**:–मी सांगतों त्याप्रमाणें अक्षरशः वागलें पाहिजे.

**कज्ज०**:–वागतें. अगदीं अक्षरशः वागतें !

**खद्यो०**:–आणि मी बोलेन त्या धोरणानें बोलत गेलें पाहिजे.

**कज्ज०**:–बोलतें. जसें बोलाल तसें बोलतें.

**खद्यो०**:–शाबास ! हां. ऐक आतां मी काय बोलतों तें. तुझें नाक चांफ्याच्या कळीसारखें आहे ! ( कज्जला विचार करीत स्तब्ध राहते. ) कां उत्तर देत नाहींस ? हें पहा, अशी तुझी बंडाळी मी कधीं चालूं देणार नाहीं ! माझ्या प्रश्नाचें उत्तर द्यायला तूं नेहमीं एका पायावर तयार असलें पाहिजेस. ( कज्जला एका पायावर उभी राहते. ) अग, एका पायावर काय उभी राहिलीस ? काय मूर्ख आहेस ! एका पायावर तयार असायचें म्हणजे सांगितलेलें काम झट्कन करायला तयार असायचें ! एवढें नाहीं तुला समजत ! हां ! पुन्हां बोलतों ऐक. तुझें नाक चांफ्याच्या कळीसारखें आहे !

**कज्ज०**:—तुमचें नाक सोनाराच्या नळीसारखें आहे !

**खद्यो०**:—कुठे आहे सोनाराच्या नळीसारखें ? हें उत्तर नाहीं साधलें ! हरकत नाहीं. फिरून यत्न कर. फिरून यत्न कर. ( कज्जला स्वतःभोंवतीं फिरते. ) छे छे ! तुझ्यापुढें शर्थ झाली ! अग फिरून यत्न कर म्हणजे पुन्हां खटपट कर. अशी गिरक्या काय मारतेस ? आतां दुसरें भाषण बोलतों. विचार करून सावकाशपणानें उत्तर दे ! असें मूर्खासारखें एकदम बोलूं नकोस ! तुझे डोळे हरणीसारखे आहेत !

**कज्ज०**:—तुमचे डोळे—

**खद्यो०**:—अग दम धर ! ( कज्जला नाक दाबून धरते. ) अग श्वास काय कोंडतेस ? मरशील ना ?

**कज्ज०**:—तुम्हीं दम धर म्हणून सांगितलेंत !

**खद्यो०**:—पण दम धर म्हणजे थांब असा अर्थ घ्यायचा कीं नाक दाबून श्वास कोंडायचा ! तुला कांहीं एक शहाणपण नाहीं !

**कज्ज०**:—तुम्हाला स्वतः धड बोलतां येत नाहीं आणि लोकांना शिकवण्याची हौस मोठी !

**खद्यो०**:—तूं मूर्ख आहेस ! पुन्हां माझें भाषण ऐक आणि उत्तर दे. तुझे डोळे हरणीसारखे आहेत !

**कज्ज:०**—तुमचे डोळे बरणीसारखे आहेत !

**खद्यो०**:—कुठे आहेत बरणीसारखे ? कांहीं तरी बोलायचें म्हणून बोलतेस कीं काय ? हरकत नाहीं. फिरून यत्न कर. ( कज्जला खद्योता-भोंवती फिरूं लागते, तिला थांबवून ) लागली पुन्हां गिरक्या घ्यायला ! फिरून म्हणजे पुन्हां. घोक !

**कज्ज:०**—फिरून म्हणजे पुन्हा. घोक !

**खद्यो०**:—आतां काय डोंचकें आपटूं तुझ्यापुढें ! आतां आणखी भाषण बोलतों तें ऐक. तुझा ओंठ पिकलेल्या तोंडल्यासारखा आहे !

**कज्ज०**:—तुमचा ओंठ फुटलेल्या बोंडल्यासारखा आहे !

खद्यो०:—अजून नाहीं साधत! असो- आतां यापुढचें भाषण ऐक आणि अगदीं बरोबर शास्त्रोक्त उत्तर दे. तुझें तोंड चंद्रासारखें दिसतें!

कज्ज०:—तुमचें तोंड चांद्रासारखें दिसतें!

खद्यो०:—बस बस बस! (कज्जला बसते.) अग बसतेस काय म्हणून? ऊठ!

कज्ज०:—तुम्हीं तीनदां बसायला सांगितलेंत, आणि पुन्हा म्हणतां बसतेस काय म्हणून!

खद्यो०:—अग बस म्हणजे पुरे! एवढें समजूं नये? आज इतकेंच बस! (कज्जला बसूं लागते.) अग, बसूं नकोस. आज इतकेंच ब—पुरे! तुझीं उपमानें मुळींच शास्त्रोक्त नाहींत, तरी अज्ञ लोकांकडून वाहवा मिळवायला हीं अगदींच निरुपयोगी आहेत असेंही नाहीं! तूं आजपर्यंत मुळींच बोलत नव्हतीस तीं वेडेंवांकडें कां होईना, पण आज बोलूं लागलीस हेंच मी तुझें सुभाषित समजतों!

कज्ज०:—(स्वगत) दुर्दैव माझें! कितीही वेडेंवांकडें बोललें तरी त्याला हे सुभाषितच म्हणणार! काय करावें या पीडेला!

खद्यो०:—मी अजून राजा झालों नाहीं, पण जर झालों असतों तर म्हटलें असतें कीं, कोण आहे रे तिकडे खजानजी! हिला पांचशें रुपये दे!

चंच०:—(प्रवेश करून) हे आणले पांचशें रुपये!

खद्यो०:—आणलेस? फार उत्तम केलेंस! हिला देणार ना रुपये? दे! देऊन टाक! ते रुपये तिला बक्षीस देऊन टाक! अरे, मी सांगतों ना? दे. दे बक्षीस! (चंचरीक कज्जलेस रुपयांची थैली देतो.) अहो कज्जला राणी, आज तुमच्या बुद्धीला अपूर्व आयास घडलेला आहे. याकरतां घरांत जाऊन पोतेरें घालतां घालतां मीं तुम्हाला भैरवाच्या ताना सांगितल्या आहेत त्या वळवीत बसा म्हणजे विश्रांति पावाल!

**कज्ज०:**–(थैली हालवून) आजच्या साहित्यशास्त्रांत कांहीं तरी अर्थ आहे ! हें असलें शास्त्र मला फार आवडतें ! (हंसत निघून जाते.)

**खद्यो०:**–कायरे चंचरीक ! आज कां आला होतास ?

**चंच०:**–पांचशें रुपये घेऊन ये म्हणजे मुलगी देतों असें तुम्ही म्हणालां होतांत, म्हणून ते रुपये घेऊन आलों होतों.

**खद्यो०:**–दे तर मग ते रुपये ! आण !

**चंच०:**–आतां कुठले आणूं ? मामीसाहेबांना तुमच्या समक्षच दिले कीं हो ?

**खद्यो०:**–अरे वा ! मोठा दीड शहाणा दिसतोस ! अरे, ते रुपये मामीसाहेबांना तूं बक्षीस दिलेस, त्या फार खूष झाल्या, तूं धन्यवाद पावलास, मलाही संतोष झाला, हें सारें ठीकच झालें. पण मुलीबद्दलचे माझे रुपये तूं अजून देणेंच आहेस ! ते रुपये तूं घेऊन ये, मला दे, आणि मग उंबरठ्याच्या आंत पाऊल ठेव. चल ! चालता हो ! नीघ !

**चंच०:**–मामासाहेब, तुमच्या वागणुकीचा मला हा सारा उलटाच प्रकार दिसतो आहे ! लोक मुलीच्या अंगावर दागिने घालून सालंकृत कन्यादान करीत असतात, आणि तुम्हां दोघांचा पहावा तों जेव्हां तेव्हां रुपये उपटायचा रोजगार ! मुलीबद्दल तुम्हीं माझ्यापासून किती द्रव्य घ्यावें याचा सुमारच राहिला नाहीं ! इतकें द्रव्य घेऊन संवरून पुन्हां आणखी द्रव्य मागतांच आहां ! तेव्हां मी म्हणतों, तुमच्या असल्या या कन्यादानाचें नांव तरी काय ?

**खद्यो०:**–(गंभीर स्वरानें) आम्ही कन्यादान करतों त्याचा प्रकार उलटा आहे असें तूं म्हणतोस तें खरें आहे. लोक कन्यादान करतात त्याला साळंकृतकन्यादान असें नांव आहे. आमच्या पद्धतीला गिळंकृत-कन्यादान असें म्हणतात ! आणखी पांचशें रुपये दिल्याशिवाय माझी मुलगी तुला मिळणार नाहीं. (मल्लिका येते.)

**चंच०**:–बरें आहे. पण मी इतका आल्यासारखा तुमच्या मुलीशीं दोन शब्द बोलतों तेवढ्याबद्दल तरी परवानगी द्या !

**खद्यो०**:–एक अक्षर बोलूं देणार नाहीं !

**चंच०**:–बरें आहे ! मी यात्रेकरूंनीं तुम्हाला थैली दिली त्याचा बोभाटा करीन !

**खद्यो०**:–बरें बरें ! मी आंत जाऊन कज्जला राणी भैरवाच्या ताना कशा काय घेते आहे तेवढें पाहून येतों. तितक्यांत तुला मल्लिकेशीं काय बोलायचें तें बोलून निघून जा. ( खद्योत जातो. )

**चंच०**:–मल्लिके, तुझ्या आईबापांच्या परवानगीनें तूं माझ्या हातीं येशील असा कांहीं रंग दिसत नाहीं !

**मल्लि०**:–तर मग त्यांच्या परवानगीची वाट तरी कशाला पहावी ? मला घेऊन याच पावलीं कांचनपुरास जात असशील तर बरोबर येण्याची माझी तयारी आहे ! बाबांच्या या साहित्यशास्त्राच्या वटवटीनें आईचा आणि माझा जीव अगदीं कंटाळून गेला आहे. ते अलीकडे अगदीं पिसाळल्यासारखें करीत असतात.

**चंच०**:–( स्वगत ) कृष्णकांचन म्हणजे दुष्टकांचन ! तें हातीं पडल्याबरोबर माणसाला हटकून दुर्बुद्धि सुचायचीच ! असल्या दुर्बुद्धीचे शेंकडों प्रकार मीं पाहिले आहेत, पण त्यांत या खद्योताइतका वेडगळ प्रकार मात्र कुठेच पाहिला नाहीं ! बरें, याला मूर्ख म्हणावें तर इतर बाबतींत हा पराकाष्ठेचा दुष्टही आहे ! मूर्खपणाची व दुष्टपणाची इतकी बेमालूम भेसळ ब्रह्मदेवानें कशी केली असेल बुवा ! ( उघड ) तूं आज मला कां बोलावलेंस ? सांग.

**मल्लि०**:–उज्वलादेवींचें एक फार महत्त्वाचें काम करून दाखवणें तुझ्या हातीं आहे तें तूं करशील का ?

**चंच०**:–हें काय विचारतेस ? त्या जें काय काम सांगतील तें खचित करीन. कोणचें काम ?

मल्लि०:—काम फारच नाजूक आणि धोक्याचें आहे. बोलूं का?

चंच०:—खुशाल बोल. कोणचेंही काम असलें तरी पार पाडतों.

मल्लि०:—ऐक. सांगतें. लढाईमुळें चोहोंकडे कसा संहार चालला आहे हें तूं पहातोसच. हा संहार थांबवावा व सारंगदेव महाराजांचें राज्य वांचवावें म्हणून उज्वलाताईसाहेबानीं कांहीं एक साहसाचें कृत्य करायचें मनांत आणलें आहे.

चंच०:—( भीतीनें ) म्हणजे? त्या आपल्या जिवाला कांहीं अपाय करून घेणार आहेत कीं काय?

मल्लि०:—छे. छे. त्यांच्या मनांत कांहीं निराळेंच आलें आहे! ( त्याच्या कानांत कांहीं मजकूर सांगते. )

चंच०:—( आश्चर्यानें ) येथपर्यंत मजल आली तर एकूण! अरेरे! फार वाईट गोष्ट! प्रारब्धापुढें उपाय नाहीं!

मल्लि०:—तूं ताईसाहेबांना ताबडतोब समक्ष भेटून हा उद्योग सुरक्षितपणानें पार पाडण्याचें आश्वासन देत असशील तरच त्या हें साहस करणार.

चंच०:—तूं म्हणतेस तें सारें यथास्थित होईल, पण ताईसाहेबांची भेट कशी व्हायची एवढीच काय ती पंचाईत! शत्रूचे हेर जिथे सांपडतील तिथे कांहींएक विचारपूस न करतां मारून टाकावे असा कोतवालाचा हुकूम झाला आहे. मी इथे आलों तोच मुठींत जीव धरून आलों आहें. आणखी असाच राजवाड्यांत जा म्हणशील तर आपण कांहीं वाघाच्या जबड्यांत मान घालणार नाहीं! तूं बरोबर आलीस तरीसुद्धां आपण तिकडे येणार नाहीं! मग उज्ज्वलादेवींची आणि माझी ताबडतोब नेमकी गांठ पडणार कशी? ( पडद्यांत गलबला व 'धरा' 'पकडा' असा शब्द होतो. ) मी बोललों तें तुला खोटें वाटलें नव्हे का! पहा हे शिपाई मला धरायला आले! आतां कसें करायचें? ( शिपाई घरांत घुसतात. )

प० शिपाई:—हेंच खद्योताचें घर!

दु० शिपा०:–( चंचरीकास पकडून ) आणि हाच खद्योत !

चंच०:–नव्हे हो ! खद्योत म्हणतां तो मी नव्हे ! ( कज्जला आंतून धांवत येते. )

कज्ज०:–नव्हे कसा ? हाच खद्योत ! ( स्वगत ) शिपाई सारेच अनोळखी आहेत एवढ्यानें निभावली वेळ !

ति० शिपा०:–चल रे हरामजाद्या ! तुला उज्ज्वलादेवीपुढें नेऊन हजर करण्याचा आम्हांला हुकूम आहे !

मल्लि०:–( स्वगत ) तसें असेल तर खुशाल घेऊन जा ! मला अक्षर बोलण्याचें कारण नाहीं !

प० शिपा०:–( साशंक मुद्रेनें टिपणवही पाहून कज्जलेस ) बाई, तुझें नांव काय ? कज्जला म्हणतात ती कोण ?

कज्ज०:–माझें नांव गौरी. ( मल्लिकेकडे बोट दाखवून ) हिचें नांव कज्जला. ही खद्योताची बायको !

दु० शिपा०:–गडे हो, हें नाहीं नीट जमत ! गौरी म्हणवते ती काळी आणि कज्जला म्हणवते ती गोरी हें घडेल कसें !

ति० शिपा०:–अरे, नांवावर काय आहे ? कृष्णाबाई गोरी असते तर तुंगाबाई ठेंगणी असते ! सुंदराबाई कुरूप असते तर भीमाबाई अशक्त रोडकी असते ! नुसत्या नांवावर काय आहे ? ( टिपणवही पाहून ) या घरांत एकच पुरुष खद्योत आणि त्याच्या बायकोचें नांव कज्जला असें माझ्या वहींत सुद्धां लिहिलेलें आहे. ( चंचरीकाकडे बोट दाखवून ) ज्याअर्थी हा पुरुष आहे आणि इथे एकटाच आहे त्याअर्थी हाच खद्योत हें सिद्ध आहे ! त्याची बायको ती त्यापेक्षां लहान असलीच पाहिजे ! अर्थात् ( मल्लिकेकडे बोट दाखवून ) हीच याची बायको आणि हिचें नांव कज्जला हा सिद्धांत !

कज्ज०:–शाबास ! काय तुमच्या चातुर्याची तारीफ ! बाबानों, तुम्हांसारखे हुशार शिपाई राज्यांत आहेत म्हणूनच राज्य चाललें आहे !

चंच०:–( स्वगत ) राज्य चाललें आहे शत्रूच्या घशांत !

**कज्ज०**:—या खद्योताकडे काय गुन्हा आहे ?

**प० शिपा०**:—यानें प्रद्योतरायांवर मारेकरी घातल्याचें उज्वलादेवींना कळल्यावरून त्यांनीं याला पकडून आणण्याचा आमच्या वरिष्ठांना हुकूम केला.

**चंच०**:—हा आरोप खोटा आहे.

**कज्ज०**:—अरे मांगा ! असलीं कर्मे करतोस आणि आरोप खोटा म्हणतोस ! जा ! जा घेऊन याला ! मुसक्या आंवळून मार देत घेऊन जा !

( शिपाई चंचरीकास घेऊन जातात. )

**मल्लि०**:—आई, बाबांवर हें काय अरिष्ट आलें आहे ?

**कज्ज०**—कोणतें कां अरिष्ट येईना ! ते या लोकांच्या बारशाला जेवले आहेत ! मी यांना बोलण्यांत गुंतवलें तितक्यांत ते मागच्या भिंतीवरून उडी टाकून पार झाले ! ते आतां सारंगदेव महाराजांच्या लष्करांत गेले आहेत. तिथे ते एकदां पोंचले म्हणजे त्यांना कुणाचेंच भय नाहीं ! ( जातात. )

---

## प्रवेश ६ वा.

**स्थळः**—प्रद्योताची छावणी.

( प्रद्योत विचार करीत फिरत आहे. )

**प्रद्योतः**—सारंगदेव राजाचीं इतर सैन्यें पराजित होऊन त्यांची दाणादाण झाली तरी माझ्या सैन्याचा बचाव हा वेळपर्यंत तरी मीं उत्तम रीतीनें केला आहे इतकेंच नाहीं, तर माझ्या प्रतिस्पर्ध्याचा—त्या दगलबाज अमात्य कांचनाचा—पुन्हा पुन्हा पराजय करून त्याला हात-टेंकीला आणलें आहे ! प्रतिज्ञा केल्याप्रमाणें उज्वलेचें रक्षण एवढा वेळ-पर्यंत तरी मीं केलें आहे. हा सर्व महिमा तिनें मला दिलेल्या या चंपक-मालेचा आहे; तरी माझें अनुपकारी मन म्हणतें कीं, या चंपकमालेचा आणि माझ्या कंठाचा वियोग जितक्या लौकर होईल तितका उत्तम ! ही

चंपकमाला जाऊन तिच्या अंगीं प्रियेच्या हातची पुष्पमाला ज्या दिवशीं माझ्या कंठांत पडायची आहे तो विवाहमंगलाचा दिवस कधीं प्राप्त होणार देव जाणे ! हे चंपकमाले ! तुझा त्याग करावा म्हणून मी इच्छा करतों याचा राग धरूं नकोस ! तूं उज्वला आहेस, गुणवती आहेस, हृदयस्थ आहेस, हें सारें खरें; पण तूं कांहीं माझी प्रिया नव्हेस ! तुझी धनीण उज्वलादेवी ही माझी प्रिया होय आणि तिच्याच दर्शनाविषयीं व समागमाविषयीं मला उत्कंठा लागली आहे. जर सामर्थ्य असेल तर तिचें मन वळवून तिला मजकडे घेऊन ये !

**राग**–देस. ताल–त्रिवट.

**जा सखे कांतेला जाउन सांगे ।**
**छंद तुजसिं पाहूं संगें राहूं लागे ॥ ध्रु० ॥**
**नेत्र निवविं होवो तव भेटी ।**
**करीं पूर्ण या कामा प्रेमें मागें ॥ ३० ॥**

**उज्व०:**– ( प्रवेश करून ) प्रद्योतराय ! हीच माझी शेवटची भेट !

**राग**–खमाज. ताल–दादरा.

**कधिं न पुन्हा भेटेन आतां प्रिया ।**
**भेटि न आतां प्रिया ॥ ध्रु० ॥**
**निरवा सुखें या दासीला ।**
**दैवदशा कोपली ॥ ३१ ॥**

**प्रद्यो०:**–( आश्चर्यानें ) काय उज्वले ! तूं या वेळीं अकस्मात् इथे कशी आलीस ? आत्तांच मी आपल्या विवाहमंगलाचें चिंतन करीत होतों आणि तूं हें काय बोलते आहेस ?

**उज्व०:**–प्रद्योतराय, ज्या विवाहमंगलाच्या दिवसाचें आपण हर्षानें चिंतन करीत होतों तो दिवस दैवानें माझ्या आयुष्यांत लिहिलेला नाहीं ! माझ्या रक्षणाकरतां आपण प्रतिज्ञा केल्याप्रमाणें आजपर्यंत अविश्रांत मेहनत केलीत; पण त्या बाबतींत याउपर आपणाला कोणचेही श्रम अगर कोणचेंही साहस करण्याचें कारण उरलें नाहीं !

श्री

**प्रद्यो०:**–आज हें तूं काय बोलूं लागली आहेस ! तुझें भाषण ऐकून मला चिंता व भीति वाटते !

**उज्व०:**–मीं असें ठरवलें आहे कीं, हल्लीं चालू असलेलें भयंकर युद्ध एकदम बंद करावें.

**प्रद्यो०:**–तें तूं कसें करणार ?

**उज्व०:**–मी स्वतः कृष्णदेव राजाकडे जाऊन त्याच्या स्वाधीन झालें म्हणजे युद्धाचें कारणच संपलें !

**प्रद्यो०:**–तो राजा तुला कैदेंत घालील, अगर तुझ्याकडून दास्य करवील, तुझी विटंबना करील, हें भय तुझ्या मनांत कसें येत नाहीं ?

**उज्व०:**–मी ज्या कार्यासाठीं त्या राजाकडे जाणार तें कार्य सिद्ध झालें म्हणजे मला कोणत्याही हालविपत्तीची पर्वा नाहीं ! शत्रूचें दास्य करण्यापेक्षां मरण आलें असतें तरी फार चांगलें हें खरें, पण शत्रूला माझें मरण नको; माझें दास्य पाहिजे; असें जर आहे, तर राज्याच्या बचावासाठीं मला तेंही केलें पाहिजे !

**प्रद्यो०:**–पण कृष्णदेवाकडे जातांना वाटेंत तूं कांचनाच्या हातीं लागलीस तर त्या दुष्टाच्या जुलमापासून तुला कोण सोडवील ?

**उज्व०:**–खुद्द कृष्णदेव राजापर्यंत मला त्वरेनें आणि गुप्तपणानें नेऊन पोंचविण्याची सर्व तजवीज चंचरीकानें केली आहे. तो आणि मल्लिका दोघेंही माझ्याबरोबरच आहेत. शिवाय आम्ही वेष पालटून जाणार आहोंत. मग कशाचें भय ?

**प्रद्यो०:**–उज्वले, इतका वेळ तूं माझ्या प्रश्नाला उत्तरें दिलींस त्यांवरून पाहिलें तर मनाचा पक्का निर्धार करून आणि जाण्याची सर्व तरतूद करून तूं फक्त निरोप घेण्याकरतां माझ्याकडे आली आहेस ! वा ! फार चांगलें मनांत आणलें आहेस ! बरें झालें, तुझा हा बेत तुझ्याच तोंडून मला कळला ! इतकें सारें मला कळल्यावर मी तुला जाऊं देईन असें तुला वाटलें तरी कसें ?

**उज्व०:**—पण मी तरी आपली संमति मागण्याकरतांच आलें आहें! आपली संमति मिळाल्याखेरीज मला कांहींएक करायचें नाहीं हें आधींच सांगून ठेवतें.

**प्रद्यो०:**—उज्वले, तूं मागतेस ती संमति मी तुला कशी देईन ?

**राग**—हंसकिंकिणी—ताल झंपा.

**झालों निराश सखि । शिणलों विचारें ॥ ध्रु० ॥**
**तव अवनिं लागला । जीवासिं या ध्यास ।**
**घातक कसा म्हणवुं । तव मी उदारे ॥ ३२ ॥**

हा निष्ठुरपणाचा संकल्प तूं कां केला आहेस ? सांप्रत चालू असलेल्या समरयज्ञाची तूं देवता आहेस. या यज्ञांत आम्हांकडून कोणचें तंत्र चुकलें, म्हणून तूं आम्हांकडे पाठ फिरवतेस ! तुझ्यासाठीं असंख्य वीर प्राणाला मुकले आहेत आणि असंख्य कुटुंबें धुळीला मिळालीं आहेत. तरी इतक्याही हानीची क्षिति न मानतां या देशांतले आम्ही सर्व योद्धे तुझ्या संरक्षणाकरतां हातावर शिरें घेऊन उभे आहों. एवढ्यानें आमच्या धैर्याची आणि निष्ठेची तुला खात्री होत नसेल तर आणखी आम्हीं काय करावें तें सांग म्हणजे करून दाखवतों ! पण आमच्या कपाळावर नामर्दपणाचा शिक्का मारून तूं शत्रूकडे जाऊं नको ! तूं आमच्या देशाची शोभा आणि आमच्या वैभवाची मंगलपताका आहेस. आणि माझी स्वतःची तर जीवनकलाच आहेस ! माझी दया तुला येत नसेल तर न येवो, पण माझ्या मुखानें हें सर्व राज्य तुझी विनवणी करीत आहे तिचा धिक्कार करूं नकोस !

**राग**—नीलांबरी. ताल—दादरा.

**जन हा सुखासिं मुकला ।**
**नृप-वंशोद्धारिणी ।**
**करुणा न काय तुजला ? ।**
**बुध-मानसहारिणी ! ॥ ध्रु० ॥**
**विनवुं तुला । स्मर अतुला । स्वजन- कुला ॥ १ ॥**
**पथ असला । पतकारिला । तुज न भला ॥ ३३ ॥**

**उज्व०:**—तुमच्या हातून माझें रक्षण होणार नाहीं, या भयानें मी शत्रूच्या स्वाधीन होतें असें मुळींच नाहीं! माझ्या बंधूचें राज्य कायम रहावें, या वैवर्त देशाला स्वस्तिक्षेम असावें, माझ्यासाठीं जिवाची पर्वा न धरतां शत्रूशीं रात्रंदिवस झगडणाऱ्या आपणासारख्या वीरमणींचे क्लेश याउपर तरी दूर व्हावेत, एवढ्यासाठींच मी हें साहस करण्याला प्रवृत्त झालें आहें.

**राग**–कालंगडा. ताल– त्रिवट.

**मन वांछितें परमोदारा ! ।**
**रण-भेरि विरावा विसरो ॥ ध्रु० ॥**
**असो श्रांत विक्रांत-वीरासि-धारा ।**
**दाराश्रु-धारा वीसरो ॥ ३४ ॥**

**प्रद्यो०:**—पण तूं म्हणतेस त्या कारणाकरतांसुद्धां हें साहस आज तूं केलेंच पाहिजेस अशी निराशेची स्थिति अजून आलेली नाहीं. नुसता माझ्यापुरता विचार केलास तरी शत्रूच्या हातीं तुला कधींही लागूं देणार नाहीं असें छातीवर हात ठेवून सांगण्याची धमक अजूनसुद्धां माझी कायमच आहे. माझे आप्त, इष्ट, बंधुबांधव, जिव्हाळ्याचे सोबती, कर्ते एकनिष्ठ अनुयायी, असे या सैन्यांत एक हजार योद्धे मी तुला दाखवून देतों. हे प्रद्योताचे सहस्रकिरणच आहेत. किंबहुना हे सहस्र प्रद्योतच आहेत! इतक्या सर्व योद्ध्यांसह मी समरांगणीं पडल्यावर तूं म्हणतेस तशी गोष्ट होणार असेल तर होऊं दे. त्याला अजून फार अवकाश आहे. आज तर त्याची चर्चाही करण्याचें कारण नाहीं!

**राग**-बिहागडा. ताल–झंपा.

**हठ सोड हा कांते भ्रांते लोटिजे न लोकां शोकांगारीं ॥ ध्रु० ॥**
**प्रिय राज्य-देवि! तुज परदेश वाटे । जासि रहाया**
**कारागारीं ॥ ३५ ॥**

**उज्व०:**—या युद्धांत आम्हाला जय मिळण्याचा संभव कितपत आहे तें सांगा बरं?

प्रद्यो०:–खरें बोलायचें म्हटलें म्हणजे असा संभव आतां मुळींच राहिला नाहीं. देवाचें नांव घेऊन क्षात्रधर्म गाजवावा, झुजावें, मारावें, मरावें, किंवा होईल तसा बचाव करून घ्यावा, एवढेंच आतां आमच्या हातीं राहिलें आहे!

उज्व०:-असें जर आहे तर पुढें आमची वाट काय? प्रजेची वाट काय? राज्याची वाट काय?

प्रद्यो०:–आमची वाट? आमची काय वाट ती दिसतेच आहे! आम्ही एक तर लढाईंत मारले जाऊं, नाहीं तर दुर्गकांताराकडे निघून तरी जाऊं! जी आमची गत तीच प्रजेची गत हें ठरलेलेंच आहे. हें राज्य आतां बुडालें!

उज्व०:–माझ्या पराक्रमी व पुण्यवान् पूर्वजांनीं स्थापन केलेल्या या राज्याचें पुढें काय होणार हें आतां आपण बोलून दाखवलेंच! दादाचाही मला निरोप असाच आहे कीं, मी तुला शत्रूच्या हातीं कधीं देणार नाहीं! तूं भिऊं नकोस. हें राज्य गेलें तरी आपण जंगलांत नवीन राज्य वसवूं! सारांश, राज्याच्या बचावाविषयीं त्याचीही आपणाप्रमाणेंच निराशा आहे. हा वेळपर्यंत आपण सर्वांनीं लढण्याची काय पराकाष्ठा करायची ती करून दाखवलीच आहे, आणि त्याबद्दल आपल्या कीर्तीचे नगारे देशोदेशीं वाजतातच आहेत. याउपर या राज्याच्या कल्याणाचा व तुम्हां सर्वांच्या सुरक्षितपणाचा मीं उपाय योजला आहे त्याला आपण विरोध करावा, आणि दुराग्रहानें सर्वस्व गमावावें, आणि युद्धांत सर्वांनींच मरून जावें, अथवा परागंदा व्हावें, हा कांहीं मला शहाणपणाचा मार्ग दिसत नाहीं! अद्यापि राज्य आहे तोंपर्यंत त्याच्या बचावाचा उपाय करण्यांत कांहीं उपयोग व शोभा आहे. तें गेल्यावर मग कोणचा उपाय कशासाठीं करायचा राहिला! घर जळून खाक झाल्यावर मग त्यावर पाणी आणून ओतण्याचा उपाय निरुपयोगी आहे. आतां उपेक्षेची वेळ राहिली नाहीं. शत्रूचा पाठलाग चुकवीत माझा भाऊ रानावनांतून फिरतो आहे त्याचें

आतां कसें होईल या काळजीनें माझें काळीज धसधस उडतें आहे. कांहीं करायचें असेल तर करण्याची वेळ हीच आहे. या उपर राज्याची दैना बघणें माझ्यानें होत नाहीं !

**राग**–मालकंस. ताल–त्रिवट.

**श्रान्त संतापें वाटे विनवी अचला असरां ॥ ध्रु० ॥**
**नगरें जळति धुमति चिता ।**
**पळति लोक तार–शोक ।**
**पडति परासु धरा–गत ।**
**गगनगामि ज्वाल धूम धूलि नाद वात ॥ ३६ ॥**

येऊन जाऊन माझ्याकरतां आपण काळजी करतां, पण माझ्यासाठीं राज्याचा नाश झालेला मी तरी कसा पाहूं ? देशासाठीं ग्राम टाकावा, ग्रामासाठीं कुळ टाकावें, कुळासाठीं मनुष्य टाकावें, अशी नीति आहे. माझ्या एकट्या व्यक्तीसाठीं सर्व राज्याची होळी करावी ही गोष्ट नीतिसंमत कशी ठरेल ? ठरणार नाहीं. याकरतां कृपा करा आणि शत्रूकडे जाण्याविषयीं आपण मला संमति द्या.

**प्रद्यो०**:–( उसासा टाकून ) उज्वले, तूं मला मोठ्या संकटांत घातलें आहेस ! तुझ्यावर मीं प्रीति केली याबद्दल तूं मला ही शिक्षा करतेस कीं काय ? जर तूं आपल्या मनाचा निश्चय पक्केपणानें ठरवलेलाच आहेस तर माझी संमति तरी काय म्हणून मागतेस ?

**उज्व०**:–मी आपली संमति मागतें याचें कारण पतिपत्नी होण्याबद्दलचीं आपणा उभयतांचीं वचनें झालीं आहेत म्हणून !

**राग**–खमाज. ताल–दीपचंदी.

**प्राणाधारा ! वचनें वरिलें तुला ।**
**तव लाभला प्रिया अनुराग मला ॥ ध्रु० ॥**
**पावसि ताप अनंत मदाश्रयणें । म्हणविन कशि उतराई ॥**
**करिन खचित तव जें मनोगत । मन आज्ञोत्तर–वश होई ॥ ३७ ॥**

मी स्वतंत्र असतें तर आपल्या संमतीचें काय कारण होतें ? पण मी स्वतंत्र नाहीं. शत्रूंकडे जाऊ नको असें आपण म्हणाल तर मी जाणार नाहीं. मात्र या राज्याचा उच्छेद केल्याचें पाप मग माझ्या माथीं राहणार नाहीं !

**प्रद्यो०:**–तर तें माझ्या माथीं राहील हेंच तुझें म्हणणें ! होय ! तेंहि खरेंच आहे ! उज्वले, तूं जें हें मला कोडें घातलें आहेस तें कसें सोडवावें हें मला समजत नाहीं ! तुला न जाऊं द्यावें तर देशोच्छेद केल्याचें पाप माथीं येतें. जाऊं द्यावें तर क्षात्रधर्माला बट्टा येतो ! आम्हां क्षत्रियांचे जन्म लोकांना शत्रूच्या कारागृहांतून काढण्यासाठीं आहेत कीं त्यांना शत्रूच्या कारागृहांत मुद्दाम नेऊन घालण्यासाठीं आहेत ? ज्या वधूच्या प्राप्तीकरतां सहस्रावधि पराक्रम करून दाखवायला मी अजूनसुद्धां कबूल आहें अशी तूं गुणवती वधू मजवर अनुरक्त आहेस आणि माझी हस्तगत आहेस. असें असतां मी आपण होऊन तुला विटंबना भोगण्यासाठीं वैऱ्याच्या दाराशीं कसा धाडूं ? तुला शत्रूकडे जाऊं देण्यांत मी मानवजातीचे आशीर्वाद घेतों कीं शाप घेतों हेंच माझें मला कळत नाहीं !

**उज्व०:**–श्रेष्ठता, प्रीति, अभिमान वगैरे सर्व कल्पना संसारी मनुष्याच्या मनांत विंबलेल्या आहेत त्या ममतामूलक आहेत. अनादि कालापासून या कल्पनांची रचना जीवाभोंवतीं करून ममता त्याला रंजवीत आली आहे. या ममतेच्या तेजानें वेष्टिलेला प्राणी खद्योताप्रमाणें त्या तेजांतच रममाण होऊन त्यांतच संसाराचें सर्वस्व समजत असतो. असे मानवखद्योत गांवोगांव घरोघर असंख्य आहेत ! हा ममतेचा प्रकाश तसल्या खद्योताप्रमाणें आपण स्वतःपुरता मर्यादित न करतां त्याचा व्याप विचाराच्या बळानें अनंतपट मोठा करून तो प्रद्योताप्रमाणें सर्वगामी व सर्वोपकारी करावा, म्हणजे या देशाचीं दुःखें काय आहेत तीं आपण तत्काळ अनुभवाल, आणि देशाला दुःखमुक्त करण्याकरतां शत्रूकडे जाण्याला आपण मला परवानगी द्याल ही माझी खात्री आहे.

पु. क्र. २०६ जॉ दि



**प्रद्योतः**–( बराच वेळ चिंतन करून ) ईश्वरी संकेताप्रमाणें युगायुगाला धर्म बदलत असतो. पूर्वी भारती युद्धांत बंधुबांधवांचा उच्छेद करूं कीं क्षात्रधर्म सोडूं अशी अर्जुनाला विवंचना पडली असतां श्रीकृष्णानीं त्याला बोध केला कीं, कांहीं झालें तरी तूं क्षात्रधर्म सोडूं नकोस. हल्लींच्या या विलक्षण प्रसंगांत मीही तसल्याच विवंचनेंत पडलों असतां अंतर्यामी सद्गुरु श्रीकृष्णजींची मला प्रेरणा होत आहे कीं देशोच्छेद टाळण्यासाठीं तूं यावेळीं क्षात्रधर्मही बाजूला ठेव! ती प्रेरणा शिरसा वंद्य मानून उज्वले, राज्याच्या कल्याणासाठीं तूं मागतेस ती परवानगी मीं तुला दिली आहे !!!

**उज्व०**:–अशी परवानगी आपण द्याल असा मला भरंवसाच होता. युद्धामुळें गांजलेली प्रजा जर माझ्या प्रयत्नानें सुखी झाली तर तो दुवा, तें पुण्य व ती कीर्ति आपली आहे! मीं चांडाळणीनें मात्र आपणाला आशा दाखवून नाना प्रकारें व्यर्थ शीण दिला! माझ्याकरतां आपणाला फार हानि सोसावी लागली, आणि रात्रंदिवस चिंता वहावी लागली; पण त्याचें सार्थक माझ्या हातून कांहींच झालें नाहीं याबद्दल मला फार दुःख होतें. बरें! हें आपलें ऋण माझ्या हातून या जन्मीं फिटत नाहीं, तर तें अन्य जन्मीं तरी फिटो हेंच मी देवाजवळ मागतें! दादाचें सांत्वन करा, सर्वांची समजूत घाला, आणि स्वतः शरीराविषयीं अनास्था न करतां मनाचा विवेक करून वागत जा. तुम्ही सर्वांनीं सुखी रहावें म्हणून हा दुःखाचा डोंगर मीं शिरावर घेतला आहे. मी जातें आतां! जाऊं ना?

**प्रद्यो०**:–( गहिंवरून ) जातेस? बरें! जा! माझे प्राणसुद्धां तुला हाच प्रश्न विचारतात त्यांना काय उत्तर देतेस?

**उज्व०**:–काय उत्तर देऊं? मलाही आपला वियोग फारच दुःसह वाटतो! हा मायेचा पाश तोडणें परम दुस्तर आहे! माझें मन सार्वजनीन कल्याणाच्या निर्मल व उच्च वातावरणांत भरारी मारूं पहात आहे, तरी स्वतःच्या आश्रयस्थानाकडे एकदां तरी न्याहाळून पहावें ही इच्छा याला

सुटत नाहीं! ( परस्पर आलिंगन देतात. ती झटकन् स्वतःला सोडवून घेते. ) आपला वियोग आतां या जन्मीं कायमचा व्हावा असा या देहाचा प्रारब्धयोग आहे त्याप्रमाणें त्याला गेलेंच पाहिजे! ( स्फुंदत ) हेंच आपलें शेवटचें दर्शन ! आतां मी निरोप घेतें ! ( जाते. )

**प्रद्यो०**:—जा! उज्वले! राष्ट्रीय विपत्तीच्या अंधारांत दिशाभूल झालेल्या लोकांस मार्ग दाखण्याकरितां उज्वलोज्वल दीपिकेप्रमाणें तुझी कीर्ति सदैव प्रज्वलित राहो! अनंत कल्याणाची साधक राष्ट्रीय विभूति जी तूं त्या तुला या देशांतले आबालवृद्ध लोक आद्य-देवतेची पूजा अर्पण करोत! जा! परमेश्वर तुझें संरक्षण करो! ( उज्वला दिसेनाशी होते. ) गेली! गेली! हायरे दुर्दैवा! हिचें रूप, हिचे अनेक सद्गुण, हिचें सौजन्य, हिचें औदार्य, आणि अत्यंत श्रेष्ठ कुळ ह्यांपैकीं एकाचेंही साहाय्य हिला दास्यापासून बचाव करण्याच्या कामीं होऊं नये काय? एका राज्याचें सामर्थ्य केवळ हिच्या रक्षणार्थ वाहिलेलें असतां विचारीला शत्रूचा बंदिवास सुटला नाहीं! शेंकडों संग्रामांत विजय पावलेला—अद्यापि अपराजित—असा हा प्रद्योतसुद्धां आज पाषाणाचा पुतळा होऊन बसला! धिक्कार असो सारंगदेवाला! कीं ज्यानें डोळेझांक करून या राज्यांत कृष्णकांचनाचा प्रसार होऊं दिला, राज्यांतल्या लोकांचें शील भ्रष्ट होऊं दिलें, कर्तृत्वाचें तेज मालवूं दिलें, आपला दुबळेपणा न ओळखतां पोकळ अभिमानाच्या भरीस पडून कृष्णदेवाशीं वैर केलें, आणि शेवटीं या निरपराधी राजकन्येला शत्रूच्या कैदेंत घालवलें! आतां तिची कैदेंतून सुटका कशी होणार? पराक्रमाच्या बळावर तिच्या मुक्ततेचा उद्योग करावा हाही मार्ग तूर्त मला मोकळा नाहीं! कारण तसें करूं जावें तर शत्रूच्या ताब्यांत सांपडलेल्या उज्वलादेवीला अधिक जाच होणार आणि ज्यासाठीं तिनें कैद पतकरली तें सारंगदेवाचें राज्य सुटायचें नाहीं तें नाहींच! तेव्हां तूर्तचा उपाय म्हटला तर कुबड्या-शेटाच्या द्वारें कृष्णदेवाची गांठ घेऊन सामोपचारानेंच उज्वलेची सुटका

होते कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे! कृष्णदेवाला काय हाल विपत्ति विटंबना करायची असेल ती त्यानें माझी करावी; किंबहुना मला कैदेंत घालावें, पण उज्वलादेवीला आजच्या आज मुक्त करावें, हेंच मी त्या राजाजवळ मागणार. आणि इतकेंही करून जर तो नच ऐकेल तर मग— कृष्णदेव आहे आणि मी आहें! माझा प्राण जाईपर्यंत अगर उज्वलेची सुटका होईपर्यंत स्वाऱ्या घालघालून त्याचें राज्य हैराण केल्याखेरीज सोडणार नाहीं! पण या झाल्या पुढच्या गोष्टी! तूर्तचें काम तर इथला बंदोबस्त योग्य अधिकाऱ्यांकडे सोंपवून कांचनपुरची वाट सुधारावी हेंच उत्तम! तरवारीच्या बळावर कृष्णदेवापासून उज्वलेचें रक्षण करण्याची मीं प्रतिज्ञा केली काय, ती आजपर्यंत संभाळली काय, उज्वलेला मीं आपण होऊन त्या कट्ट्या दुस्मानाच्या ताब्यांत जाऊं दिलें काय, आणि आतां तिला सोडा म्हणून त्याच शत्रूची मी याचना करतों काय! कुणीकडे माझ्या वीरव्रताची वीरश्री आणि कुणीकडे ही दैन्यवृत्ति! कुबड्याशेटाजवळ मीं वल्गना केल्या काय आणि आतां त्यापुढें तोंड वेंगाडतों काय! पण जिनें देशासाठीं देह दिला तिच्यासाठीं असलें असंबद्ध वर्तनही मला केलेंच पाहिजे! कालदशा! कालदशा! या कालदशेला नमस्कार असो! घटके घटकेला माणसाचीं उलटीं सुलटीं प्रतिबिंबें दाखवणारी ही कालदशा नांवाची आदर्शफलिका समोर उभी राहून आम्हांला अहर्निश वेडावीत असतांही आमचा अहंकार नष्ट होत नाहीं! हे कालदशे! प्राणिमात्राचीं कृत्यें निर्माण करण्याचा व नष्ट करण्याचा तुझा उद्योग ज्याअर्थीं एकसारखा सुरू आहे त्याअर्थीं तूं फारच विलक्षण वाघीण आहेस असें म्हटलें पाहिजे! कारण कीं, तूं आपलीं चित्रविचित्र पिलीं एकीकडून एकसारखीं प्रसवत असतेस आणि दुसरीकडून तीं खातही असतेस! स्वैरिणी! पर्यायानें सुखाचा प्रकाश व दुःखाचा अंधार पाडणारी तूं अहोरात्राच्या आवर्तांप्रमाणें मानवी संसाराभोंवतीं कां फेऱ्या घालीत आहेस? अथवा आतां कालदशेला दोष देत बसण्यांत काय हांशील! क्षणाचाही विलंब न करतां उज्वलादेवीच्या मुक्ततेकरतां कांचन-

पुराकडेच धांव घेतली पाहिजे हेंच खरें ! प्रियेची हृदयद्रावक दीन मुद्रा वारंवार माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते ती मला क्षणभर तरी कसें स्वस्थ राहूं देईल ?

राग—ललत. ताल—त्रिवट.

**येते कांता—करुणामय—मूर्ति मानस—देशीं प्रयाणीं**
**दीन दीन ते दिसली ॥ ध्रु० ॥**
**बाष्प कपोलीं थरथर अधरा ।**
**दर—कंपित उर घर्म कपालीं ॥ ३८ ॥**

( पडदा पडतो. )

**अंक तिसरा समाप्त.**

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

**स्थळः—कांचनपुर. कृष्णदेवाचा महाल.**

( भालदार व हातांत पंखा घेतलेली मधुमालती उभीं आहेत. कृष्णदेव व कांचन बोलत बोलत येतात. )

**कृष्ण०:**—कांचना, प्रद्योताचा पराजय तुम्हां कोणाच्याही हातून होत नाहीं, याला उपाय काय करावा?

**कांचनः**—याला आतां एकच उपाय राहिला आहे आणि तो हाच कीं, महाराजानीं स्वतःच युद्धभूमीवर येऊन सैन्याचें आधिपत्य केलें पाहिजे!

**कृष्ण०:**—अलीकडे मीं युद्धकर्म सोडलेलें असून तें केवळ या प्रद्योताचा पराभव करण्यासाठीं मीं पतकरलें, तर त्यांत माझ्यापेक्षां त्याचीच कीर्ति विशेष होणार! आणि हा शेवटचाही उपाय थकला तर फजीतीला पारावारच नाहीं! प्रद्योताचा जर पराजय होत नाहीं तर शत्रूचें राज्य ताब्यांत येऊन न येऊन सारखेंच! बरें आहे, मी याचा विचार करतों आहें; जा तूं. ( कांचन जातो. स्वगत. ) उज्वलादेवी! तुझ्या प्रियकराच्या हट्टी पराक्रमानें आम्हांला किती अडचणींत पाडलें आहे! त्याला पराजित करण्याच्या कामीं माझ्या एवढ्या मोठ्या साम्राज्याचें बळ कुंठित व्हावें ही केवढी लांछनाची गोष्ट! काय करावें! कांहीं सुचत नाहीं! ( पडद्यांत "अर्जदार' अर्जदार!" असा शब्द होतो. भालदारास ) काय? बाहेर अर्जदार उभा आहे? ( त्रासून ) कोण माणूस आहे तो? त्याचें काय एवढें नडीचें काम आहे कीं त्याचा अर्ज मींच ऐकला पाहिजे! त्याला येथपर्यंत कोणीं येऊं दिलें? या अर्जदारानीं तर भंडावून सोडलें

आहे आग्हीं ! केव्हां वेळीं अवेळीं वाटेल तिथे येऊन ओरडत सुटतात ! ( किंचित् स्वस्थ होऊन ) अर्जदाराची दाद घेणें हें राजाचें पहिलें कर्तव्य आहे; त्याअर्थी या लोकांचा कंटाळा करूनही सोय नाहीं ! भालदार, बाहेर कोण अर्जदार आला आहे त्याला आंत घेऊन या. ( भालदार जातो व पुरुषाचा वेष घेतलेल्या उज्वलेस घेऊन येतो. तिला पाहून स्वगत ) वा ! किती देखणा मुलगा आहे हा ! बिचारा वाट चालून थकलेला आणि दुःखानें व्याकुळ झालेला दिसतो. ( उज्वलेस ) मुला, तुझा काय अर्ज आहे ?

उज्व०:—सारंगदेव राजाशीं आपण जें युद्ध सुरू केलें आहे तें एकदम बंद व्हावें असा माझा अर्ज आहे.

कृष्ण०:—( हंसत ) मुला ! तुझें वय तर फार लहान दिसतें, आणि मागणी तर फारच मोठी करतो आहेस !

उज्व०:—आपण मागणाऱ्याकडे लक्ष न देतां मागणीकडे लक्ष दिल्यानें लाखों लोकांचा दुवा आपणाला मिळणार आहे; म्हणून माझी पुन्हा प्रार्थना आहे कीं, माझी मागणी मान्य व्हावी.

**राग**—तोडी. ताल—त्रिवट.

**मनिं न धरिं राग मागतसें । होवो प्रशम समर उपरम**
**पावो । मम जन-पदा कुशल सदा सेवो ॥ ध्रु० ॥**
**हाय हाय असहाय जन करी । अभय दीजे । कीजे दया**
**दयाळा ! प्रबळा ! ॥ ३९ ॥**

कृष्ण०:—अरे काय वेडा मुलगा आहेस तूं ! तुझी मागणी मान्य करायला माझ्याकडून ना नाहीं ! पण त्याबद्दलची एक शर्त मीं घातली आहे ती जगजाहीर आहे. ती शर्त कुठे पुरी होते आहे ?

उज्व०:—कोणती शर्त ?

कृष्ण०:—सारंगदेवाची बहीण उज्वलादेवी हिला कैद केल्याखेरीज युद्ध बंद करणार नाहीं ही माझी शर्त तुला ठाऊक नाहीं ?

उज्व०:–आपण फार दयाळु आहां असा लौकिक आहे. आपण म्हणतां ती शर्त निर्दयपणानें खरोखरीच आपण पूर्ण करून घेणार कीं काय ?

कृष्ण०:–होय. मुला, ती शर्त रहित करणें आतां माझ्या हातीं राहिलें नाहीं.

उज्व०:–असें आहे तर ही सारंगदेवाची बहीण उज्वलादेवी आपल्या समोर हजर झाली आहे ! ( पुरुषाचा वेष टाकून देते. )

कृष्ण०:–( आश्चर्यानें ) काय ? तूं उज्वलादेवी ?

उज्व०:–होय. कृष्णदेव महाराज, जी आजपर्यंत आपल्या बंधुबांधवांच्या व स्वदेशाच्या असंख्य क्लेशांना कारण झाली ती मी हतभागी उज्वला आपणापुढें उभी आहें !

कृष्ण०:–मधुमालती, जा तूं आतां. भालदार, तुम्हीही क्षणभर बाहेर असा. ( मधुमालती व भालदार जातात. ) उज्वले, तूं अजून लहान आहेस. दुःखाचें वारें काय असतें तें तुला ऐकूनसुद्धां माहीत नाहीं ! तूं गुणवती, शीलवती, सुंदर राजकन्या आपण होऊन दास्याची विटंबना आणि क्लेश कां म्हणून पतकरलेस ? तूं संसार कां सोडलास ? तुझी प्रद्योतरायावर आणि त्याची तुजवर अतिशय प्रीति आहे हें मला माहीत आहे. त्या प्रीतीचा तूं कां अव्हेर केलास ?

उज्व०:–महाराज, देशाचें भय दूर व्हावें म्हणून मीं भय पतकरलें ! देशाच्या हालअपेष्टा वांचाव्यात म्हणून मीं हालअपेष्टा मान्य केल्या ! देशाचें स्वातंत्र्य कायम रहावें म्हणून मीं गुलामगिरी पतकरली ! सर्व लोकांचा संसार सुखरूप चालावा म्हणून मीं संसार टाकला आहे; आणि त्या कामीं प्रियकराच्या प्रीतीनें रंगलेल्या मनाला वैराग्याच्या विभूतीनें चर्चिलें आहे.

कृष्ण०:–( स्वगत ) हें तर मोठेंच विघ्न उत्पन्न झालें ! आतां स्तुतीचें अमोघ अस्त्र सोडूनच या विघ्नाचें निवारण केलें पाहिजे ! ( सिंहासनावरून

खालीं उतरून उचड ) विश्वकल्याणाची चिंता वाहणें ही लीला विश्वंभराची आहे. आणि त्या लीलेचें अनुकरण करणें हाही परमेश्वरभक्तीचा उत्तमोत्तम प्रकार आहे ! अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे तूं अत्यंत पूज्य पदाला पावलेली भगवद्भक्त आहेस ! जिचें दास्य करण्यांत देवालासुद्धां प्रीति वाटल त्या तुझें दास्य मीं कसें स्वीकारावें ?

**उज्व०**:–( भीतीनें स्वगत ) हा बोलल्याप्रमाणें वागायला मागें सरणार कीं काय ?

**कृष्ण०**:–मीच तुझा दास होण्याला पात्र आहें ! ( तिचे पाय धरूं लागतो. )

**उज्व०**:–( घाईघाईने मागें हाऊन ) महाराज ! महाराज ! हें काय ? आपल्या बुद्धीला कांहीं विक्षेप तर नाहींना झाला ? स्वयंस्फूर्तीनें आणि निष्काम बुद्धीनें जे विश्वकल्याणाची चिंता वाहतील ते ममताशून्य निरहंकार महात्मे आपण म्हणतां तसे पूज्य भगवद्भक्त होत ! त्यांची योग्यता मला पामराला कशी येईल ? मीं **माझ्या** बंधूच्या आणि **माझ्या** देशाच्या कल्याणासाठीं हा स्वार्थत्याग केला आहे. माझें आणि तुझें हा विचार माझ्या मनांतून अद्यापि लोपलेला नाहीं. मी करतें हा त्याग नसून त्रागा आहे ! आपण जी पूजा करूं इच्छितां तिला मी मुळींच पात्र नाहीं. माझें मन संसाराच्या वासनेनें रंगलेलें आहे तें कायमच आहे. तथापि युद्धाचा अनर्थ बंद करण्याला दुसरा कांहींच उपाय दिसेना, म्हणून मीं हा आत्मसुखाचा त्याग केला आहे.

**कृष्ण०**:–तसेंही असलें तरी तुझ्यासारखी उदार मनाची मुलगी या भूमंडळावर सांपडणें परम दुर्लभ होय ! पूर्वीं पतीला दास्यांतून मुक्त करण्यासाठीं स्वतः दास्य पतकरणारी तारामती देवी होऊन गेली. त्यानंतर स्वदेशाला दास्यांतून मुक्त करण्यासाठीं स्वतः दास्य पतकरणारी तूं उज्वलादेवी तिच्या जोडीला बसण्यासाठीं अवतरलेली दिसतेस ! तूं इकडे आलीस ती प्रद्योताला कळवून कां आली नाहींस ? तूं आपखुषीनें माझें दास्य पतकरणार असशील तर माझी हरकत नाहीं. पण त्याला

विचारून तूं इकडे यावेंस हें वाजवी आहे. याकरतां परत जाऊन त्याची परवानगी घेऊन मग इकडे ये.

**उज्व०:**—पण मी त्यांची परवानगी घेऊनच इकडे आलें आहें. त्यानीं परवानगी दिली म्हणून तर मला आपणाकडे येतां आलें!

**कृष्ण०:**—( आश्चर्यानें ) परवानगी घेऊन आलें म्हणतेस? अशी परवानगी त्याला देववली तरी कशी? ( किंचित् उपरोधानें ) तूं तर प्रद्योताचें हृदय आहेस!

**उज्व०:**—हें आपलें भाषण जितकें प्रिय आहे तितकेंच तें सत्यही आहे!

**कृष्ण०:**—तर मग जनहिताकरतां ज्यानें आपलें हृदय मजकडे पाठवून दिलें तो प्रद्योतसुद्धां अलौकिक महात्माच समजला पाहिजे!

**उज्व०:**—यांत काय संशय? पूर्वी दधीच ऋषीनें विश्वकल्याणाकरितां आपलीं हाडें दिलीं; पण मृत्यूचा आश्रय केल्याखेरीज तीं त्याला देतां आलीं नाहींत! आणि प्रद्योतरायानीं तर जिवंतपणीं आपलें हृदय काढून स्वदेशाला वाहिलें आहे! हा त्यांच्या धैर्याचा व दाक्षिण्याचा अभिनव अवतार पृथ्वीच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिला जावो!!! मला वाईट म्हणून एवढेंच वाटतें कीं, जशी त्यांचें मी तसेच तेही माझें हृदयच आहेत; आणि अशा त्या माझ्या हृदयाची—माझ्या हृदयदेवतेची—कोणचीच आकांक्षा तृप्त न होतां मला हा वैराग्याचा मार्ग स्वीकारावा लागला!

**राग**—समाज. ताल—केरवा.

**जोगिण झालें। हृदय हें न धालें ॥ ध्रु० ॥**
**दयित उदासी। राहे दूर देशीं**
**संगत तोडुन आलें ॥ ४० ॥**

**कृष्ण०:**—अशी जर तुम्हां उभयतांची प्रीति आहे तर ती फलद्रूप करण्याकरतां तूं हा वैराग्याचा भलताच मार्ग सोडून प्रद्योताबरोबर संसार करण्याची वासना धरावीस हेंच योग्य आहे!

**उज्व०:**—( उसासा टाकून ) तशी वासना असली तरी तिचा या जन्मीं काय उपयोग होणार? जनहितासाठीं मीं जें हें दास्य पतकरलें आहे

त्यांत जर कांहीं पुण्याई असेल तर तिचें फल म्हणून अन्य जन्मीं तरी आम्हीं पतिपत्नी होऊन संसार करावा हेंच मी कृष्णदेवाजवळ मागतें !

**कृष्ण०:**–( उत्सुकतेनें ) कोणचा कृष्णदेव ? कांचनपुरचा ? तो या जन्मींसुद्धां तुझी मागणी हौसेनें पूर्ण करील ! त्याला अन्यजन्म कशाला पाहिजे !

**उज्व०:**–मी ज्याची प्रार्थना करतें तो कांचनपुरचा कृष्णदेव हें खरें, पण तें कांचनपुर हें नव्हे ! पूर्वीच्या युगांत द्वारका नांवाचें कांचनपुर ज्यानें वसवलें त्या श्रीकृष्णदेवाजवळ माझी ती मागणी आहे ! आपल्या प्रश्नाला सरळ उत्तरें देऊन मीं माझें मन उघडून दाखवलें, एवढ्यावरून स्वीकारलेल्या दास्याला मी कचरतें असें मात्र आपण समजूं नये ! माझा निश्चय अढळ आहे तो आहेच. दास्याची माफी मिळण्याविषयीं आपणाजवळ माझी रदबदली मुळींच नाहीं. माझ्या या दास्याचा स्वीकार करून आपण माझ्या बंधूला व देशाला भयापासून मुक्त करावें हाच माझा अर्ज आहे.

**कृष्ण०:**–बरें आहे ! तुला आणखी कांहीं वेळ देतों तेथपर्यंत तुझा निश्चय खरोखरीच कायम आहे कीं काय हें मनाला विचारून पहा. कारण तुझ्यासारख्या राजकन्येनें दुसऱ्याच्या घरीं दासी होऊन जन्मभर राबणें ही अपमानाची आणि क्लेशाची परम सीमा आहे !

**राग**–आनंदभैरवी. ताल–दादरा.

**दिससि रम्य कोमल ललना ।**
**किति अघोर तव दैना ! ॥ ध्रु० ॥**
**नृप-नंदिनि ! बघवेना ।**
**तुजसिं भाग्य-हीना ॥ १ ॥**
**धन-यौवन-कुल-माना ।**
**उचित काय ही घटना ? ॥ ४१ ॥**

हा अपमान आणि हा क्लेश तूं माझ्या स्वाधीन झालीस एवढ्यावरून तुला भोगलाच पाहिजे असेंही कांहीं नाहीं ! कैदेंत किंवा गुलामगिरींत

राहण्याची तुझी इच्छा नसेल तर तुला तुझ्या भावाकडे परत लावून देईन. अथवा इथे राहणें तुला आवडत असेल तर माझ्या कन्येप्रमाणें तुला वागवीन; आणि युद्धाचा निकाल लागल्यावर प्रद्योताला बोलावून आणून त्याशीं तुझें लग्न करून देईन. ज्याच्या कल्याणासाठीं तूं दास्य पतकरावें म्हणतेस तो तुझा भाऊ राज्य करण्याच्या लायकीचा नाहीं हें सारी दुनिया बोलते आहे, तें मीच बोलून दाखवायला पाहिजे असें नाहीं! मग अशा त्या भावासाठीं तूं आपला जन्म दास्यांत कां घालवावास आणि संसाराचीं सर्व सुखें तुला अजूनसुद्धां सर्वतोपरी अनुकूल असतां त्यांना तूं कां मुकावेंस, हें मला समजत नाहीं!

**उज्व०:**—पण या बाबतींत माझा विचार ठरलेला आहे व तो मीं आपणाला कळवलाच आहे!

**कृष्ण०:**—होय. तूं कळवला आहेस. तरी पण त्याबद्दल प्रहर दोन प्रहर आणखी विचार केलास तर तुझें कोणचें नुकसान होणार आहे? तुझ्या लोकोत्तर देशाभिमानामुळें जसा मला विस्मय झाला आहे, तसाच मला तुझा पराकाष्ठेचा राग आला आहे, हेंही सांगून ठेवतों! तुझ्या भावाचें राज्य ओस पाडावें हा माझा संकल्प फार दिवसांचा आहे व तो प्रसिद्ध आहे. तो तडीस नेण्यासाठीं मीं या युद्धाचा अचाट प्रयत्न केला आहे व अतोनात नुकसान सोसलें आहे. तूं हस्तगत झालीस तर लढाई बंद करीन अशी मीं अट घातली होती खरी; पण तूं हस्तगत होशील आणि माझा आशाभंग करशील असें मला कधींच वाटलें नाहीं! माझा हेतु पूर्ण होण्याच्या अगदीं बेतांत आला असतां तूं आयत्या वेळीं इथे येऊन मला शब्दांत पकडीत आहेस, आणि माझ्यापासून आपल्या भावाचें राज्य हिसकावून घेत आहेस, हें मला कसें आवडेल?

**उज्व०:**—माझ्या पूर्वजांचें राज्य राखण्याच्या कामीं मी सत्वाला जागलें आहें; आपण सत्याला जागलां म्हणजे दुनिया सुखी होईल!

**कृष्ण०:**—अलबत! मी जो शब्द बोलून गेलों आहें तो खरा झालाच पाहिजे, आणि तो होईलच! त्यांत काय संशय आहे? तुला मात्र आपला

शब्द पार पाडणें कठिण जाईल! कारण कीं, मी तुझ्या शाब्दिक दास्यावर संतुष्ट न राहतां खरोखरच इतर दासींप्रमाणें तुला जन्मभर राबवीन! म्हणून तुला बजावतों कीं, जें काय करणें तें विचार करून कर 'तुला दास्य कबूल आहे काय?' असा प्रश्न जेव्हां मी तुला पुन्हा विचारीन तेव्हां तूं 'होय' असेंच उत्तर दिलेंस म्हणजे मग मागें सरायला तुला अवकाश राहणार नाहीं. तूं पश्चात्ताप पावशील आणि दुःख करशील. याकरतां मी वेळ देतों आहें याचा उपयोग करून घेऊन विचार कर.

**उज्व०**:–महाराज, माझा देश हा माझा देव आहे! त्याची आराधना करण्यांत कोणतेही कष्ट सोसायला मी तयार आहें.

**कृष्ण०**:–बरें आहे! तुझी ती तयारी कितपत खरी आहे हें मी खरोखरच पहाणार आहें! भालदार!

**भालदार**:–( प्रवेश करून ) आज्ञा महाराज!

**कृष्ण०**:–या बाईसाहेबांना राणीवशांत न नेतां कृष्णमंदिरांत उतरायला जागा देववा, आणि कुलपालिकेकडून यांच्या पाहुणचाराची सर्व तजवीज करवा. आणि मी बोलावणें पाठवीन तेव्हां यांना माझ्याकडे घेऊन या. ( उज्वला व भालदार जातात. नरवाहन येतो. )

**नर०**:–महाराज! आपण कृतकार्य झालां याबद्दल मी आपलें अभिनंदन करतों!

**कृष्ण०**:–पण मला आनंद झाला नसून दुःख झालें आहे! तूं कशाबद्दल माझें अभिनंदन करतोस?

**नर०**:–काय? उज्वलादेवी हस्तगत झाल्याबद्दल आपणाला आनंद झाला नाहीं?

**कृष्ण०**:–त्यांत कशाचा आनंद? इकडे ती हातीं आली तर तिकडे सारंगदेवाचें राज्य हातचें गेलें! हो, तें आतां हातचें गेलेंच म्हणायचें! कारण ही राजकन्या आपल्या हेतूपासून परावृत्त होईल असा कांहीं संभव दिसत

नाहीं ! अरे, मीं तिला श्रेष्ठ व पूज्य म्हटलें, तिचे पाय धरले, तिची आणि तिच्या प्रियकराची वाहवा केली, तिला संसाराचा लोभ दाखवला, भय घालून पाहिलें, पण तिचें बोलणें आपलें इथून तिथून एक ! मी सत्वाला जागलें, तुम्ही सत्याला जागा; असें निर्भयपणानें बजावते ! आतां इथे काय करावें ! किती वर्षांची आटोकाट खटपट ! माणसांची आणि द्रव्याची केवढी नासाडी ! केवढें माझें कारस्थान आणि तें एका पोरीनें इथे येऊन चार शब्दांत ढांसळून पार नाहींसें करावें ! मत्तमातंगाचा स्वैर संचार कोमल वल्लरीनें कुंठित करावा ! ही स्वाधीन झाली तर युद्ध बंद करीन अशी अट घालण्याची दुर्बुद्धि मला कशी झाली ? यदा-कदाचित् जर ही आपण होऊन हजर झाली तर पुढें कसें, एवढी ही एखाद्या पोराला देखील सुचण्याजोगी सोपी गोष्ट मला कशी सुचली नाहीं ?

**नर०:**–उज्वला, प्रद्योत आणि सारंगदेव यांच्या स्वभावाचें केवळ लौकिकव्यवहाराच्या दृष्टीनें परीक्षण करून आपण जें गणित केलें होतें त्यांत चूक नव्हती.

**कृष्ण०:**–जर गणितांत चूक नव्हती तर फलित कसें चुकलें ?

**नर०:**–त्याचें कारण वैवर्त देश ओसाड पाडण्याची दुर्वासना धर-तांना उज्वला व प्रद्योत यांच्या स्वभावांतला राष्ट्रधर्माचा दैवी अंश आपण हिशेबांत घेतला नाहीं त्यामुळेंच हा कार्यनाश घडून आला !

**कृष्ण०:**–नरवाहना, मी मी म्हणणारे आम्ही विशाळ बुद्धीचे मुत्सद्दी मसलती करतों त्या एखाद्या वेळीं किती अप्रयोजक आणि उप-हासास्पद ठरतात ! मीं एवढें प्रचंड कारस्थान करून मिळवलें काय, तर एक दासी ! समुद्रमंथन करून कोणचें रत्न बाहेर काढलें तर शंख !

**नर०:**–ज्या कृत्याला देवाचा आशीर्वाद नाहीं आणि न्यायाचा आधार नाहीं तें कृत्य कितीही कौशल्यानें केलें तरी फलद्रूप होत नाहीं, हेंच यावरून आम्हीं तात्पर्य घ्यायचें !

**कृष्ण०:**–होय. तूं म्हणतोस या गोष्टी आतां मला पटल्या ! पण त्या पटायला उभय राज्यांमध्यें एवढा संहार व्हावा लागला याचें मात्र फार वाईट वाटतें !

**नर०**:—ज्या गोष्टी होऊन गेल्या त्यांबद्दल खेद करून काय उपयोग? वाहिलें तें पाणी आणि राहिली ती गंगा, असें समजून या कपटप्रबंधाचा शेवट गोड करावा म्हणजे झालें!

**कृष्ण०**:—सारंगदेवाचें राज्य सोडा आणि उज्वला देवीचा सन्मान करून तिला परत लावून द्या; हेंच म्हणतोसना? तें तर आतां केलेंच पाहिजे!

**नर०**:—नाहीं! आणखी एक उत्तमोत्तम गोष्ट करायची सोन्यासारखी संधी आली आहे ती कां फुकट घालवतां? (त्याच्या कानांत कांहीं मजकूर सांगतो.)

**कृष्ण०**:—(रागानें) आला का तो शेवटीं माझ्याकडे? मला दोनदां झिटकारून संवरून आतां कशाकरतां आला?

**नर०**:—तो आला आहे उज्वलेच्या सुटकेकरतां! माझी वाटेल ती विटंबना करा, वाटेल तर मला कैदेंत घाला, पण तिला सोडा म्हणतो! तुझें काम हटकून करीन असें कुबडा बोलला आहे म्हणतो!

**कृष्ण०**:—पण तो माझ्या तावडींत कधींकाळीं सांपडला तर त्याला चतुर्भुज करीन असेंही कुबडा बोलला आहे हें कुठे त्याला ठाऊक आहे! ठीक आहे! तो म्हणतोच आहे तर आतां दोन्ही करतों! उज्वलेला मुक्त करतों आणि त्याला चतुर्भुज करतों!

**नर०**:—(हंसत) करा! करा! तसेंच करा! मी तरी काय म्हणतों? त्या नाहीं या—कोणच्या तरी प्रकारानें—त्याला चतुर्भुज कराच करा! सोडूं नका त्या लबाडाला! आपण सर्वांचेंच कल्याण करणार, मग त्यानें एकट्यानेंच काय घोडें मारलें आहे?

**कृष्ण०**:—(प्रसन्न मुद्रेनें) बरें! बरें! तूं म्हणतोस तर तसेंच करूं! (आठवून) अरे हो! पण सगळेंच मुसळ केरांत! उज्वलेवर जसा तुम्हाला सूड घ्यायचा असेल तसा घेऊं देईन असें मी सुमंगलेला आणि तिच्या भावाला कबूल केलें आहे. त्यांना न कळत तूं म्हणतोस ती गोष्ट आम्हीं केली तर

सुमंगला प्रळय करील ! याकरतां त्यांची कशीबशी समजूत काढूनच तें काम केलें पाहिजे ! तर मी आतां सुमंगलेच्या महालाकडे जातों. तें कुबड कुठे आहे तें धुंडाळन ठेव आणि तूंही तिकडेच ये. मग पाहूं पुढें कसें काय होतें तें ! (जातात.)

---

## प्रवेश २ रा.

**स्थळः**—सुमंगलेचा महाल.

( सुमंगला चिंताक्रांत बसली असतां कांचन येतो. )

**कांचन०:**—अक्का, इतक्या घाईघाईनें घाबऱ्या घाबऱ्या मला बोलावणें पाठवलेंस तें कां ? काय काम आहे ?

**सुमं०:**—अरे बाबा, काम काय विचारतोस ! मला राम म्हणायची वेळ आली आहे ! तेव्हां म्हटलें तूं जवळ असलेला बरा !

**कांचन०:**—( घाबरून ) काय ? असें झालें आहे तरी काय ?

**सुमं०:**—( त्रासून ) दुसरें काय व्हायचें ! जें न होईलसें वाटलें होतें तेंच दुर्दैवानें झालें बरें ! ती सारंगदेवाची बहीण उज्वला इथे येऊन प्रत्यक्ष महाराजांनाच भेटली हें तुला अजून कळलेंच का नाहीं ?

**कांचन०:**—आं ! काय सांगते आहेस तूं ! हें झालें तरी कसें ? आम्हांला वाटत होतें कीं सारंगदेव तिला आमच्या हवालीं करण्याऐवजीं विष घालून मारूनसुद्धां टाकील !

**सुमं०:**—अरे, त्यानें तसेंच केलें असतें ! पण त्या आधींच ही त्राटिका इकडे पळून आली ना ! आली तर आली आणि अगदीं थेट महाराजांपर्यंत गेली !

**कांचन०:**—तेथपर्यंत तिची दाद कुणीं लावली बुवा !

**सुमं०:**—तो नरवाहनाचा उपद्व्यापी पोर चंचरीक आहे ना ? तो इचा साथी ! तिकडे जायच्या आधीं जर ती माझ्या हातीं लागली असती तर कुठे तरी तळघरांत कोंडून उपास घालून मारून टाकली असती !

**कांचन०:**–मग? अजून काय झालें आहे? तसेंच करूं म्हणजे झालें!

**सुमं०:**–अरे आतां तूं आणि मी तरी काय करणार? आतां ती आमच्या ताब्यांत कुठून सांपडणार? तिच्या राहण्याचा वगैरे बंदोबस्त तिकडून परभारें अगदीं स्वतंत्र केला आहे! कांचना, तिची भेट झाली तेव्हां एकांत केला होता एकांत! तिथे काय काय झालें तें मधुमालतीनें चोरून आडून ऐकलेंच असेल. तें तिच्याच तोंडून तुला ऐकायचें आहे का? मधुमालती! (मधुमालती येते.) ती नवीन बाई आली आहे तिची भेट झाली तेव्हां तिथे तूं काय ऐकलेंस आणि काय पाहिलेंस तें सांग पाहूं! भिऊं नकोस. बोल.

**मधु०:**–प्रथम ती बाई आली ती पुरुषाच्या वेषानें आली. मागून तिनें तो वेष टाकून दिला.

**कांचन०:**–(आश्चर्यानें) काय! पुरुषाचा वेष!

**सुमं०:**–अरे होय! पहा कशी निर्लज्ज आहे ती! असले ढंग इथे आवडूं लागले असतील म्हणूनच ती करीत असेल! (मधुमालतीस) बरें मग?

**मधु०:**–त्या बाईनें आपलें नांव सांगितल्याबरोबर महाराज सिंहासनाखालीं उतरून तिच्या पायां पडले.

**सुमं०:**–ऐक बाबा! ऐक कशी तिनें दृष्टादृष्ट झाल्याबरोबर मोहनी घातली ती!

**मधु०:**–आणि महाराज तिला म्हणाले, मी तुझा दास होतों!

**सुमं०:**–आतां काय इथे म्हातारचळ लागला म्हणावा कीं म्हणावें तरी काय?

**मधु०:**–ती म्हणाली, मी त्रागा करीन!

**कांच०:**–(हर्षानें) काय? असें म्हणाली ती? करूं दे, करूं दे त्रागा आणि जाऊं दे मरून शिंची!

**सुमं०:**–अरे तसें नव्हे! मला न पतकराल तर मी त्रागा करीन असें उज्वलेचें म्हणणें. समजलास का?

**मधु०:**–मग महाराजानीं तिच्या हनुवटीला हात लावला.

**सुमं०**:–( घाबरून ) अगबाई ! आतां कसें करूं !

**मधु०**:–मग महाराज तिला म्हणाले, तुझ्या मनांतून संसार करायचा आहे तर एकूण ? ती आभाळाकडे तोंड करून उसासा टाकून होय असें म्हणाली.

**सुमं०**:–( उत्सुकतेनें ) मग पुढें काय झालें ?

**मधु०**:–महाराज म्हणाले कीं, जर तुझ्या मनांतून संसार करायचा असेल तर कांचनपुरचा कृष्णदेव तुझे मनोरथ पूर्ण करील !

**सुमं०**–कोण ? कोण मनोरथ पूर्ण करील ?

**मधु०**:–कांचनपुरचा कृष्णदेव.

**सुमं०**:–( रागानें ) उतावळा नवरा नी गुडघ्याला बाशिंग ! पण म्हणावें मी जिवंत आहें अजून !

**मधु०**:–इतकेंच मला पहायला आणि ऐकायला सांपडलें.

**सुमं०**:–आणखी आयकायचें नी पहायचें बाकी काय राहिलें आहे म्हणा ! बरें, जा तूं. ( मधुमालती जाते. )

**कांच०**:–ही सांगते हें सारें खरें असेल का ?

**सुमं०**:–खरें म्हणजे ? एवढीशी लहान मुलगी ! तिला खोटें बोलायचें ठाऊक तरी आहे का रे ? आतां कसें रे करूं ? कुठून ही सवत इथे येऊन माझ्या उरावर पाय देऊन उभी राहिली ! आपल्या घराचें वाटोळें करून माझ्या घरावर विस्तव ठेवायला आली आहे साडेसाती ! या दुष्टेनें कशी माझ्या सुखांत माती कालवली ! आतां कसली मी राणी आणि तूं तरी कसला अमात्य राहतोस ! आमच्या मुळावरच कुऱ्हाड पडली तेव्हां आतां पुढें काय होणार तें दिसतेंच आहे ! उद्यांपासून ती सवत मला कोंड्याची भाकरी खायला लावणार, आणि तुला कामाठ्याची चाकरी करायला लावणार ! तें कांहीं नाहीं. कांचना, आपल्या जिवावरच आलें तेव्हां आतां कांहीं तरी केलें हें पाहिजेच ! तिची नुकती पहिलीच भेट झाली आहे तोंच महाराजांना निकड लावून तिचा कांहीं तरी पक्का बंदोबस्त केलाच पाहिजे !

**कांच०:**–आतां तिचा काय बंदोबस्त करायचा आणि तो होणार तरी कसा ?

**सुमं०:**–तिला आजच्या आज माझ्या घराबाहेर काढलें पाहिजे !

**कांच०:**–तें काय म्हणून? तिला आमच्या दारांत जन्मभर दासी म्हणून राबवण्यासाठीं तर इतके दिवस हा लढाईचा खटाटोप झाला. आणि आतां तिला मोकळी सोडून द्यायची म्हणतेस तें कशाकरितां ? तिनें आमचें काय काय केलें याचा इतक्यांतच तुला विसर पडला वाटतें ! ती तुझी बटीक झालीच पाहिजे.

**सुमं०:**–नको नको ! मला बटीक फटीक कांहीं नको ! कशाला हवी आहे ती सवत इथे माझ्या संसाराचें वारापाणी करायला ! ती धिंडका इथून कशी तरी निघूं दे म्हणजे मिळवलें !

**कांच०:**–पण ती आतां निघणार कशी ?

**सुमं०:**–तें काम महाराजांकडून युक्तीयुक्तीनेंच करून घेतलें पाहिजे ! सरळ बोलून नाहीं ते वळायचे ! तें सारें मी करतें. तूं मात्र नेट धरला पाहिजेस आं !

**कांच०:**–त्याची नको तूं काळजी करूं ! मी असा त्रागा करतों, अशी डोचक्यांत राख घालतों, कीं तूं सुद्धां भिऊन जाशील !

**मधु०:**–( धाईधाईनें प्रवेश करून ) महाराजांची स्वारी आली !

( जाते. कृष्णदेव येतो. )

**कृष्ण०:**–सुमंगले, आज उज्वलादेवी येऊन मला भेटली हें तुम्हाला कळलेंच असेल. इथे कांहीं काळपर्यंत तरी तिचा मुक्काम पडणार त्याअर्थीं तिच्या योग्यतेप्रमाणें तिला ऐश्वर्यानेंच वागवलें पाहिजे. तेव्हां तिला राहण्याकरितां कोणता महाल द्यायचा, तिच्या तैनातीला कोण कोण माणसें द्यायचीं, त्याची तजवीज तूंच करायला पाहिजेस. ती राजकन्या चालून आमच्या घरीं आली, त्यासारखा तिचा मान राखणें अवश्य आहे.

**सुमं०:**–चालून आली ना ? थकली बिचारी माझी गुणाई ! तिचे पाय तरी चुरायचे होते ! महाराज, आपल्या सेवेंत माझ्याकडून कोणची

चूक झाली म्हणून आपण वृद्धपणांत ही आणखी एक स्त्री करून जनाचा उपहास करून घेणार?

**कृष्ण०:**–( स्वगत आश्चर्यानें ) काय मूर्ख माणसें आहेत हीं ! ( उघड ) काय ? मी उज्वलेला स्त्री करून घेणार !

**सुमं०:**–आतां कशाला पाहिजेत हे लपंडाव ! सारें मला समजून चुकलें आहे ! महाराज, आपणाला माझी दया येत नसली तरी जन-लज्जेसाठीं तरी आपण माझा घात करूं नये एवढेंच मी हात जोडून मागतें !

**राग**–जंगला. **ताल**–दादरा.

**प्राणनाथ ! न करिं घात। हात जोडितें ॥**
**उदेलि अशी । भूल कशी ॥ ध्रु० ॥**
**सवँत मारि नयन–बाण ।**
**सहज हरुन घेइ भान ।**
**अवचित मम सकल जिणें विफल तिनें केलें ॥ ४२ ॥**

**कृष्ण०:**–सुमंगले, या तुझ्या संशयाचा निरास मागें मी यथास्थित-पणें केला होता.

**कांच०:**–होय महाराज ! पण आपणाकडून पुन्हा संशय उत्पन्न होण्याजोगें वर्तन होऊं लागलें म्हणून आक्काला आणि मला संशय आला.

**कृष्ण०:**–तुम्हांला संशय येण्याजोगें कोणचें वर्तन माझ्या हातून घडलें ?

**सुमं०:**–( तिरस्कारानें ) कोणचें वर्तन ? सांगतें. उज्वलेला कैद केल्या-वर तुझ्या दारांत तिला बटीक करून राबवीन असें मला आपण वचन दिलें होतें आणि आज ती हातांत सांपडल्यावर तिला कुठे ठेवूं आणि काय करूं असें होऊन गेलें आहे ! याला काय म्हणायचें ? मला वाटतें बेइमान म्हणतात तें हेंच !

**कृष्ण०**:—सुमंगले, उगीच बेइमानाचा आरोप करूं नकोस. मीं वचन मोडलें नाहीं. तिला जर आम्हीं कैद केलें असतें तर ती तुझी बटीक झाली असती. पण ती आपण होऊन आमच्या स्वाधीन झाली त्याअर्थीं मीं पूर्वीं दिलेल्या वचनाचा संबंध आतां कांहींएक राहिला नाहीं!

**कांचन०**:—हा नुसता शब्दच्छल आहे. आम्हीं कैद केली काय आणि आपण होऊन स्वाधीन झाली काय! बटीक ती बटीक!

**सुमं०**:—म्हणे आपण होऊन स्वाधीन झाली! कां झाली? काय धरून आणायला आम्ही असमर्थ होतों? तें कांहीं नाहीं! आपण म्हणतां त्याप्रमाणें जर आपली खरोखरच निष्पापबुद्धि असेल तर तिनें माझ्या दारीं जन्मभर बटकीप्रमाणेंच राबलें पाहिजे!

**कृष्ण०**:—काय? ती एवढ्या मोठ्या योग्यतेची राजकन्या आपण होऊन माझ्या घरीं आली आणि मी तिला बटकीप्रमाणें वागवूं म्हणतां? सुमंगले, तुझे लाड मी नेहमीं चालवीत असतों. पण माझ्या कीर्तीला अजरामर कलंक लावणारी ही गोष्ट तुझे लाड पुरवण्यासाठीं सुद्धां मी करणार नाहीं!

**कांचन०**:—सारंगदेवाच्या दरबारांत उज्वलेला बटीक करीन असे शब्द मी बोलून गेलों ते खरे करून दाखवण्याचा अभिमान जर महाराज, आपण धरीत नाहीं, तर मग आपली सेवा करण्याची बूज ती काय राहिली? मी याच पावलीं काशीयात्रेला निघून चाललों! मला इथे राहण्याचें काय कारण आहे? हाच माझा शेवटचा मुजरा!

**सुमं०**:—आणि कांचन बाळा! तूं गेल्यावर मी तरी कशाला रे जीव ठेवूं? मी सुद्धां अन्न वर्ज करून प्राण देणार!

**कृष्ण०**:—तुम्ही काशीला जा, रामेश्वराला जा; मरा, जगा, काय वाटेल तें करा! ( तोंड फिरवून बसतो. नरवाहन येतो. )

**नर०**:—हें हो काय असलें! महाराजांचें तोंड पूर्वेस, राणीसाहेबांचें पश्चिमेस, आणि अमात्यसाहेबांचें दक्षिणेस! असलें तीनतोंडी



**नरवाहन०:**-असलें तीन्तोंडी दरबार म्हणजे त्रिधारी निवडुंगच म्हणायचें ! (पृ. १२०।१२१)

दरबार म्हणजे त्रिधारी निवडुंगच म्हणायचें ! जिकडून हातीं धरायला जावें तिकडे कांटेच कांटे ! कांहीं तडजोडीचा मार्ग काढून सर्वांचा समेट करण्याचा उद्योग मलाच हातीं घेतला पाहिजे.

**सुमं०:**—नरवाहना, मी हट्टी आहें, दुराग्रही आहें, असलें बालंट माझ्यावर घेशील तर मी ऐकणार नाहीं. मी आपली तडजोडीला कबूल आहें हो !

**कांच०:**—खरेंच आहे. सर्व कामांत तडजोड ही पाहिजेच ! आपण तर तडजोड करून घ्यायला केव्हांही कबूल आहोंत !

**नर०:**—आणि महाराज, आपलें काय म्हणणें ?

**कृष्ण०:**—तडजोड योग्य असेल तर ती मी खुषीनें ऐकेनं. सुमंगले, बोल. तुझें काय म्हणणें आहे ?

**सुमं०:**—माझें आणि कांचनाचें म्हणणें एवढेंच कीं, उज्वलेनें आमची बटीक व्हावें हें जर आपल्या मर्जीला येत नाहीं, तर मग ती माझ्या घरांत हवी कशाला ? तिचें आजच्या आज कुणाबरोबर तरी लग्न लावून देऊन तिला माझ्या घरांतून आजच बाहेर काढलें पाहिजे !

**कृष्ण०:**—पण तिला आजच नवरा कसा मिळणार ?

**सुमं०:**—न मिळायला काय झालें ? असें काय तिचें मोठें स्वयंवर व्हायचें आहे ! बटकीला नवरा गुलाम ! नाहीं का एखादा गुलाम हिला पतकरणारा मिळणार ?

**नर०:**—महाराज, हूं म्हणा आतां ! ओढून चंद्रबळ आणूं नका !

**कृष्ण०:**—बरें बुवा ! हूं म्हणतों. उज्वलेला कोणी तरी नवरा बघून आज तिचें लग्न लावून टाकायचें एवढेंच ना ? केलें कबूल !

**सुमं०:**—( कांचनास हर्षानें हळूच ) आतां हे खुषींत आहेत. जें म्हणूं तें कबूल करतील. आपला डाव साधायची वेळ हीच आहे. नरम लागलें आहे तों दडपूं या ! हूं !

**कांचन०:**–हां हां, महाराज, पण तेवढ्यानें नाहीं भागायचें ! सारंगदेवानें मुके, एकडोळे, लंगडे, कुरूप काळे लोक मद्दाम जमा करून दरबारांत माझ्यासमोर त्यांचा नाच करवलेला आहे. तो सूड मी उज्वलेवर उगवून घेणार ! तिला जो नवरा पहायचा तो अगदीं विद्रूप काळाकुट्ट असला पाहिजे.

**कृष्ण०:**–विद्रूप काळाकुट्ट ! नरवाहना, काय हें ! हीच का तुझी तडजोड ती !

**सुमं०:**–शिवाय तो एकडोळ्या आणि मुका असाच असला पाहिजे !

**नर०:**–राणीसाहेब ! जुलूम ! जुलूम ! जुलूम !

**कांच०:**–आणि तो लंगडाही अवश्य असला पाहिजे !

**कृष्ण०:**–छे छे छे ! आतां मात्र शर्थ झाली ! काय म्हणतां ? विद्रूप, काळा, एकडोळ्या, मुका आणि लंगडा ! पण तुम्हीच विचार करा कीं, असला सुलक्षणी पुतळा आजच कसा बरें मिळणार ?

**कांच०:**–नरवाहना, असला माणूस मिळणें काय मोठेंसें अवघड आहे रे ! शत्रूकडचा एखादा काळा विद्रूप कैदी पाहून त्याचा पाय मोडावा, डोळा फोडावा आणि जीभ कापावी; म्हणजे झाली नवरोजींची तयारी !

**नर०:**–अमात्य, तें कांहीं उपयोगीं पडणार नाहीं. आजच इतक्या जखमा झालेला माणूस लग्नाला उभा राहणार कसा ?

**कृष्ण०:**–मग आतां रे कसें करायचें नरवाहना ?

**नर०:**–( चिंतन केल्यासारखें करून ) हो हो ! आठवलें ! आपण म्हणतां तसला–अगदीं हुबेहूब तसला–एक मनुष्य माझ्या पाहण्यांत आहे. त्याचें नांव चित्रभानु ! त्याला कालच कुठेसा बाजारांत भीक मागतांना मीं पाहिला होता. त्याला शोधून काढतों आणि त्याचें उज्वलादेवीशीं मीच लग्न लावून देतों.

**कांच०:**–तसें नाहीं. लग्न आम्हांसमोरच झालें पाहिजे.

**सुमं०:**–सारी कारस्थानीची खुबी काय ती त्यांतच आहे ! लग्नाचा सर्व कारभार आमचा आम्ही करणार. महाराजानीं स्वस्थ मौज पहात बसावें.

**नर०:**–( वाईट तोंड करून ) छे पण ! तो चित्रभानु नाहीं आपल्या उपयोगीं पडायचा ! त्यांत एक गोम आहे.

**कृष्ण०:**–( हंसत ) अरे गोम असली तरी निघून जाईल ! तिला पुष्कळ पाय असतात ! कोणची गोम ती सांगशील तर खरी !

**नर०:**–त्या चित्रभानूचा ज्याला स्पर्श होईल त्याला वेड लागतें म्हणतात. त्याला कोणी जवळ सुद्धां येऊं देत नाहींत.

**सुमं०:**–वा ! त्याच्या संसर्गानें उज्वला वेडी झाली तर मला तें हवेंच आहे ! तें तर फारच उत्तम !

**कृष्ण०:**–बरें आहे. नरवाहना, तर मग आज रात्रीं तुझ्या त्या चित्रभानूला घेऊन ये; म्हणजे सुमंगलेच्या आणि कांचनाच्या हट्टा-प्रमाणें त्याचें आणि उज्वलेचें लग्न लावून देऊं ! ( सेनापति येतो. )

**सेना०:**–महाराज, सारंगदेवाला जो पकडून देईल त्याला एक लाख रुपये बक्षीस देण्याची महाराजानीं दंवडी पिटवली होती. त्या-प्रमाणें त्या राजाजवळच्या खद्योत नांवाच्या एका नोकरानें त्याला धरून आमच्या हवालीं केलें; आणि त्याला घेऊन मी इथे आलों आहें. त्याला केव्हां आणून हजर करावें याबद्दलची आज्ञा झाली पाहिजे.

**कृष्ण०:**–वाहवा ! सुमंगले, हें सर्वोत्कृष्ट घडून आलें नाहीं बरें ?

**सुमं०:**–( हर्षानें ) हें काय विचारावें ! आमच्या आनंदाचा अगदीं कळस होऊन जावा असाच आजच्या दिवसाचा महिमा आहे !

**कांच०:**–महाराजांचा प्रतापसूर्य पूर्ण देदीप्यमान करणारा आजचा दिवस धन्य होय !

**कृष्ण०:**–नरवाहना, मल्लिकेखेरीज सारंगदेवाच्या ओळखीचें इथे कुणीच नाहीं. याकरतां तिला त्या राजाजवळ राहूं दे, आणि आयत्या वेळीं चंचरीकानें सारंगदेवाकडे जाऊन उज्वला इथे आली हें त्याला कळूं

न देतां युक्तीनें आज रात्रीं आम्हांकडे घेऊन यावें; याप्रमाणें तजवीज कर.
( सेनापति, नरवाहन व कृष्णदेव जातात. )

**सुमं०**:–काय कांचना, आपल्या मनाप्रमाणें बेत उतरला कीं नाहीं? असलीं हेंकट माणसें भेटलीं म्हणजे त्यांच्याकडून असें युक्तीयुक्तीनें काम करून घ्यावें लागतें बरें!

**कांच०**:–आक्का, एवढ्यानेंच तूं संतोष मानूं नकोस. हा नरवाहन मोठा बिलंदर म्हातारा आहे! आणि आमच्या महाराजांच्या मनाचा अंत कुणालाच लागायचा नाहीं! हे दोघेही आम्ही जों जों हट्ट धरावा तों तों हूं हूं म्हणत गेले, यावरून यांच्या मनांत कांहीं तरी काळेंबेरें असावें असा मला जबरदस्त संशय आला आहे.

**सुमं०**:–तूं वेडा आहेस! त्यांनीं प्रसन्न मुद्रेनें आपलें सर्व म्हणणें मान्य केलें. आतां कसला त्यांचा संशय घ्यायचा!

**कांच०**:–तसें तूं म्हणूं नकोस. या जांबुवंत मंडळीशीं वागायचें फार कठिण असतें! एखादे वेळीं हे पायाच्या अंगठ्यानें जातां जातां तिढा घालतील तो आम्हांला हातांच्या दहा बोटांनींसुद्धां सुटायचा नाहीं! असले हे महाविलक्षण कारस्थानी लोक!

**सुमं०**:–त्यांचें कसलें का कारस्थान असेना? चित्रभानूशीं उज्वलेचें लग्न व्हायचें तें आमच्या डोळ्यांसमोरच व्हायचें आहे. प्रत्यक्षाला दुसरें प्रमाण पाहिजे कशाला? करूं देत त्यांना काय कारस्थान करतात तें!

( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळः—दरबारचा दिवाणखाना.**

( कृष्णदेव सिंहासनावर बसला आहे. जवळ नरवाहन उभा आहे.
समोर खद्योत व कज्जला हात जोडून उभीं आहेत.
चवऱ्या वारणाऱ्या दासी व भालदार वगैरे परिचारक
आपापल्या कामावर उभे आहेत. )

**कृष्ण०**:–( खद्योत व कज्जला यांस ) काय हो, तुम्ही इकडे कशाकरतां आलांत? तुमचें काय म्हणणें आहे?

**खद्यो०**:–राजाधिराज, माझा एक अर्ज आहे त्याची दाद प्रथम घ्यावी.

**कज्ज०**:–नाहीं. आधीं माझा अर्ज !

**खद्यो०**:–नाहीं. माझा अर्ज आधीं !

**कज्ज०**:–ठाऊक आहे जेव्हां तेव्हां आपलेंच घोडें पुढें दामटायचा स्वभाव !

**कृष्ण०**:–तुम्ही अशीं भांडूं नका. (खद्योतास) तुम्ही कोण ? तुमचें नांव काय ?

**खद्यो०**:–माझें नांव खद्योत ! मी सारंगपुरचा राहणारा. सारंगदेवाला धरून दिल्यापासून माझें नांव आतां दुनियेंत सर्वांच्या तोंडीं झालें आहे. असा मी प्रसिद्ध मनुष्य आहें. ही माझी स्त्री कज्जला मुळींच प्रसिद्ध नाहीं. सबब माझा अर्ज आधीं आणि हिचा अर्ज मागून !

**कृष्ण०**:–कायहो खद्योत ! तुम्हाला पूर्वी कुठे पाहिल्यासारखें वाटतें. तुमचे पुढचे दांत कशानें पडले हो ?

**खद्यो०**:–(हात जोडून) तो प्रताप हुजूरचाच आहे ! मात्र माझ्या जिभेनें अपराध केला असतां दांतांना शिक्षा मिळाली हा अन्याय झालेला आहे !

**कृष्ण०**:–बाई, तुमचें काय म्हणणें आहे ?

**कज्ज०**:–माझी मुलगी मल्लिका इथल्या चंचरीक नांवाच्या भामट्यानें पळवून आणली आहे ती माझी मला परत मिळावी.

**नर०**:–महाराज, त्या मुलीबद्दल या बाईला आणि इच्या या नवऱ्याला माझ्या चंचरीकानें पुन्हा पुन्हा किती तरी रुपये दिले आहेत. आतां ही काय म्हणून मुलगी परत मागते ?

**कृष्ण०**:–बरोबर आहे. हिला मुलगी परत मिळणार नाहीं.

**खद्यो०**:–हे पूर्णचंद्रानने ! तुला अर्धचंद्राची प्राप्ति झाली आहे. गप बैस !

**कज्ज०**:–रुपये घेतले, रुपये घेतले ! रुपये घेतले म्हणजे मोठा अन्यायच केला असेल ! हीच मुलगी देऊं करून मीं आणखी असे दहा जणां-

पासून रुपये घेतले आहेत ! होय, मीं रुपये घेतले. पण त्याबद्दल मुलगी उठवून न्यायची हा कुठला न्याय !

**नर०:**–पण आतां चंचरीकाचें या बाईच्या मुलीशीं लग्नसुद्धां होऊन गेलें; तेव्हां आतां हा वाद राहिलाच नाहीं.

**कृष्ण०:**–बाई, तुमचा अर्ज नामंजूर आहे.

**कज्ज०:**–( रागानें ) ठाऊक आहे नामंजूर ! ( खद्योत तिला दाबतो. )

**कृष्ण०:**–खद्योत, तुमचें काय म्हणणें आहे ? बोला !

**खद्यो०:**–आतां महाराजानीं माझा अर्ज ऐकावा. सारंगदेवाला धरून देणाराला महाराजानीं एक लाख रुपयांचें बक्षीस लावलें होतें त्याप्रमाणें मीं त्या राजाला धरून दिलें असल्यामुळें ते लाख रुपये मला मिळावे.

**कृष्ण०:**–एकूण तुम्ही आपल्या निमकहरामीबद्दल बक्षीस मागायला आलां आहांत !

**खद्यो०:**–निमकहरामी ? हा पहा दुनियेचा उलटा न्याय ! खरें पाहिलें तर मीं सारंगदेवावर मोठा उपकार केला आहे ! तें सारें बाजूला राहून माझ्याच पदरीं निमकहरामी ! तो राजा जंगलांत दडून राहिला होता तेव्हां दोन प्रहरीं वानराप्रमाणें फळें भक्षण करून क्षुधा शांत करीत होता. सायंकाळीं डुकराप्रमाणें मुळ्या खाऊन रहात होता; आणि रात्रीं शत्रूचा छापा येईल म्हणून घुबडाप्रमाणें जागत होता ! वानर, डुक्कर, व घुबड यांच्या कोटींतून सारंगदेवाला काढून मीं माणसांत आणून घातलें हा माझा उपकार नव्हेच वाटतें ! आतां कैदेंत कां होईना, पण सोन्याचें ताट आणि दूधभात एवढें तरी त्याला मिळेलच कीं नाहीं ?

**नर०:**–खद्योता, सारंगदेवाला मुक्त करून त्याचें सर्व राज्य त्याला परत देण्याचा विचार महाराज करीत आहेत.

**खद्यो०:**–वाः ! ही तर फारच नामी गोष्ट झाली. राज्य परत देण्याच्या बाबतींत सारंगदेवाशीं जो तहनामा होईल त्यांत माझें मोर्चेल धरण्याचें काम त्या राजानें पुन्हा मला द्यावें असें कलम महाराजानीं

जरूर घातलें पाहिजे. असें करण्यांत केवळ माझाच फायदा नसून आपलाही आहे. कारण, पुढें केव्हांही लाख रुपयांचें बक्षीस लावल्यास सारंगदेवाला पुन्हा धरून देण्याचें महाराजांना अभिवचन देण्याला मी तयार आहें!

**कृष्ण०**:–आतां तुम्हाला सारंगदेवाच्या राज्यांत जाऊं दिलें तर तुम्ही प्राणाला मुकाल! तुम्हाला तिकडे जाऊं दिलें जाणार नाहीं.

**खद्यो०**:–तर मग मी आपली चाकरी करणार!

**कृष्ण०**:–आणि सारंगदेवानें लाख रुपयांचें बक्षीस लावलें तर मला धरून त्याच्या हवालीं करणार!

**खद्यो०**:–( स्वगत ) वेळ आली तर तसेंही करायला हरकत नाहीं!

**कृष्ण०**:–तुमच्या चाकरीची मला जरूर नाहीं.

**खद्यो०**:–तर मग माझे लाख रुपये मला द्या म्हणजे मी चाललों!

**कृष्ण०**:–चाललांत कुठे? रुपये तुम्हाला मिळतीलच. परंतु याउपर तुम्हाला मोकळें हिंडूं दिलें तर समाजाकडून तुम्हाला आणि तुम्हांकडून समाजाला धोका पोंचण्याचा संभव आहे. याकरितां तुमचा जीवमान असेपर्यंत तुम्हांला प्रतिबंधांत ठेवलें पाहिजे. तुम्हीं विश्वासघातानें मिळवलेल्या द्रव्याचा उपभोग तुम्हाला मिळेल, पण तो प्रतिबंधांत राहून मिळेल.

**खद्यो०**:–प्रतिबंधांत कां होईना, पण माझ्या स्वकष्टार्जित द्रव्याचा उपभोग मला मिळेल ना? कांहीं हरकत नाहीं! चल! कज्जले! तूं राणी होणार ना? हे खद्योतचंद्रयामिनि! हे कामिनि! भामिनि! स्वामिनि! चल! आतां तुरुंगांत स्वस्थपणें तुला नृत्यगायन शिकवायला कांहीं हरकत नाहीं! बरें. तुला नाचाचा तोडा नुकताच शिकवला आहे तो महाराजांपुढें नाचून दाखव पाहूं! हां, कसें?

( नाचाचा तोडा तालावर म्हणूं लागतो. )

**कृष्ण०**:–( भालदारास ) अहो, या माणसांना इथून हाकून द्या!

( भालदार खद्योतास धक्का मारतो. )

**खद्यो०**:–अरे, धक्का मारलास तें असो एक वेळ ! पण गृहस्था, तोडा समेवर तरी येऊं द्यायचा होतास ! किती गांवढळ खराब बेवकूफ माणूस आहेस तूं !

**नर०**:–हां हां ! तोंड संभाळ ! तोंड संभाळ !

**खद्यो०**:–तोंड संभाळ म्हणतोस ? मीं ओळख विसरलों नाहीं म्हटलें ! ( भालदाराची पगडी काढून तोंडाआड धरतो. ) मार थैली ! दोनशें, पांचशें–हजार मोहरांची सुद्धां थैली मार पाहिजे तर ! नाहीं तर तुला पकडतों !

**कृष्ण०**:–( भालदारास ) भालदार, या माणसांना इथून हांकून लावा म्हणून सांगितलें ना !

**खद्यो०**:–चाललों ! चाललों ! आम्हांला तरी कुठे इथे उभें रहायला वेळ आहे ! चल ! हंसगामिनि ! चल ! तुरुंगांत गेल्याबरोबर तुला नृत्यगायन शिकवण्याचा धडाका सुरू करतों ! चल लौकर !

( कज्जला व खद्योत जातात. )

**कृष्ण०**:–नरवाहना, हें जग कसें विचित्र आहे पाहिलेंस ना ? जिथे प्रद्योत आहे तिथे खद्योत ठेवलेलाच आहे ! आणि जिथे उज्वला झळकते आहे तिथे कज्जलाही नांदतेच आहे ! जिथे सत् आहे तिथेच असत्‌ही आहेच ! यावरून हा संसार विषमय म्हणावा कीं अमृतमय म्हणावा हेंच कळत नाहीं ! ( सुमंगला व कांचन येतात. ) ये सुमंगले, बैस. कांचना, तूंही बैस. ( भालदारास ) भालदार, उज्वलेला घेऊन या. ( भालदार जातो व उज्वलेस घेऊन येतो, ती कृष्णदेवासमोर खालीं मान घालून उभी राहते. ) उज्वले, तुझा काय विचार ठरला ? तूं माझें दास्य कबूल करणार कीं कसें ? कबूल करीत असशील तर युद्ध थांबवतों व सारंगदेवाचें जेवढें राज्य मीं घेतलें आहे तेवढें सारें त्याचें त्याला परत देतों. कबूल करायचें नसेल तर तसें सांग. तुझ्यावर आमचा कोणत्याही प्रकारचा जुलूम नाहीं. इच्छेस येईल त्याप्रमाणें वागायला तूं स्वतंत्र आहेस.

**उज्वला०**:–माझा विचार ठरलेला आहे. आपलें दास्य करायला मी कबूल आहें.

**कृष्ण०**:–उज्वले, मी तुला बजावतों आहें कीं, तूं माझें दास्य पतकरलेंस म्हणजे त्यांत सुमंगलेचें व कांचनाचेंही दास्य तूं पतकरलेंस असें होतें. तीं एखादें काम सांगतील तें करायला तुला फार जड जाईल! मग तूं पश्चात्ताप पावशील. याकरितां पुन्हा विचार करून उत्तर दे. तूं माझें दास्य कबूल केलेंस काय?

**उज्वला०**:–( निश्चयाच्या स्वरानें ) होय. केलें महाराज!

**कृष्ण०**:–केलेंस?

**उज्वला०**:–होय. केलें!

**कृष्ण०**:–( सिंहासनाच्या खांबास टांगलेली नागनी तरवार हातीं घेऊन ) तर मग शत्रूला प्रलयकालरात्रीप्रमाणें भयंकर भासणारी माझी तरवार म्यानांत ही परत गेली! आणि या क्षणापासून युद्ध बंद झालें! ही दवंडी आमच्या कैवर्त देशांत आणि सारंगदेवाच्या वैवर्त देशांत एकाच वेळीं पिटवली जाईल. आणि उभय राज्यांमध्यें शांततेची, सौख्याची आणि मैत्रीची समृद्धि होईल.

**उज्वला०**:–महाराज, आपल्या तोंडचे हे शब्द ऐकून मी धन्य झालें! माझ्या सर्व क्लेशांचा परिहार झाला!

**सुमं०**:–( स्वगत ) इतक्यांतच आपल्याला दैववान् समजूं नकोस बाई! क्लेश ते अजून पुढेंच आहेत!

**कांचन०**:–( स्वगत ) हिनें दूध पाहिलें, पण बडगा कुठे अजून पाहिला आहे!

**कृष्ण०**:–सुमंगले, ही बटीक तुमच्या हवालीं केली आहे. तुमच्या इच्छेला येईल तें काम हिला सांगा.

**उज्वला०**:–( हात जोडून ) बाईसाहेब! मी आपली दासी आहें. जें काम सांगाल तें करून दाखवतें.

**सुमं०**:–जा. नरवाहना, चित्रभानूला घेऊन ये. ( नरवाहन जातो व एकडोळ्या, मुका, लंगडा, व काळा अशा रूपाच्या चित्रभानूला घेऊन येतो. कृष्णदेवास पाहून चित्रभानु चकित व ओशाळा झाल्याच्या खुणा करतो व उज्वलेस पाहून हर्ष झाल्याचा भाव दाखवतो. )

**उज्वला०**:–( स्वगत ) कोण हा विचित्र मनुष्य? आणि ह्या वेळीं इथे हा कशाकरितां आणला आहे न कळे!

**सुमं०:**—कांचना, आपणाला पाहिजे होता तसा हा माणूस आहे कीं नाहीं ते दुरून पारखून घे! जवळ जाऊं नकोस. नाहीं तर त्याच्या स्पर्शानें तुला वेडबीड लागायचें!

**नरवाहन०:**—( स्वगत ) जणु काय वेड लागायचें अजून राहिलेंच आहे! उज्वलेवर सूड घ्यायचें या दोघांना वेड लागलें नव्हे तर काय?

**कांचन०:**—( चित्रभानूकडे जाऊन त्यास ) काय रे ए खुबसुरतराव! तूं मुका आहेस ना? बोल. तूं बोलत नाहींस यावरून तूं मुका आहेस हा सिद्धांत ठरलाच! चार दोन पावलें चाल पाहूं! (चित्रभानु पावलें टाकतो.) हां! लंगडाही आहेसच! धृतराष्ट्र आहेस कीं शुक्राचार्य आहेस पाहूं? होय, तूं शुक्राचार्य आहेस! आणि तसाच आम्हाला हवा होतास. तुझी संजीवनी लौकरच तुला मिळेल! काळजी करूं नकोस. तुझा रंग तर कोळशांतल्या माणकाप्रमाणें झळकतोच आहे! वा! आहा, हा पुरुष छत्तीसलक्षणी आहे!

**सुमं०:**—झालें तर! उज्वले, तुझ्यासमोर हा चित्रभानु नांवाचा मनुष्य उभा आहे याचा तूं पति म्हणून स्वीकार कर!

**उज्वला०:**—शिव! शिव! हें भलतेंच काय मला करायला सांगतां?

**कांचन०:**—( ऐटीनें ) सांगितलेलें काम भलतें सलतें आहे कीं कसें आहे हा विचार आम्हां धनी लोकांचा आहे. आम्ही सांगूं तें आमच्या बटकीनें बिनतक्रार केलें पाहिजे!

**सुमं०:**—केलेंच पाहिजे! हां! आटप लौकर!

**उज्वला०:**—( सुमंगला हातांत पुष्पमाला देत असतां ती झिडकारून कृष्णदेवास हात जोडून ) महाराज, आपण धर्मात्मे आहां. प्रद्योताशिवाय या जन्मीं मला अन्य पति नाहीं हें आपणाला ठाऊक आहे, आणि इथे आल्यावर मी तें नानाप्रकारें बोलून दाखवलेंही आहे. मीं दास्य कबूल केलें तरी एवढ्या एका बाबतींत आपण माझ्यावर जुलूम होऊं देणार नाहीं ही माझी खात्री होती. असें असतां हीं दोघें आपल्या डोळ्यांसमोर माझा छळ करितात, आणि आपण माझी कांहींच दाद घेत नाहीं हें काय? मी आपली धर्मकन्या आहें, आणि मी आपणाला शरण आलें आहें. माझें रक्षण करा!

**कृष्ण०**:—कांचना, सुमंगलेचें एक राहूं दे, पण तूं या अबलेचा छळ करावास हें मला योग्य दिसत नाहीं !

**कांच०**:—महाराज, आपणासमोर ही आतां गरीब गाईसारखी दिसते आहे, पण माझा जीव घेण्यासाठीं तरवार उपसून ही माझ्यापुढें जेव्हां उभी होती तेव्हां ही मला वाघिणीसारखी दिसत होती व हिला पाहून माझ्या जिवाचा थरकांप होत होता !

**सुमं०**:—होय रे बाळा ! काय तो त्या वेळचा तुझ्यावरचा प्रसंग !

**कांच०**:—त्या प्रसंगाचा सूड या वेळीं मीं उज्वलेवर न घ्यावा तर घ्यावा केव्हां ? तो प्रद्योत माझ्या हातीं लागत नाहीं त्याला इलाज नाहीं. जर तो हातीं लागला असता तर त्याचे हालहाल करून इच्या डोळ्यां-देखत मीं त्याचे तुकडे तुकडे केले असते !

**उज्व०**:—( कृष्णदेवास ) महाराज, आपण माझी दाद घेणार कीं नाहीं ? इथे आपणाखेरीज मला दुसऱ्या कोणाचाही आधार नाहीं !

**कृष्ण०**:—उज्वले, तुझी ही दीनवाणी दशा पाहून माझ्याही पोटांत भडभडून येतें ! पण मी तरी आतां काय करूं ? दास्य कबूल करूं नको असें मी सांगत असतां तें तूं केलेंस त्याअर्थीं या दोघांच्या आज्ञेप्रमाणें वागणें तुला भाग आहे. या कामांत मला बोलतां येत नाहीं. माझा नाइलाज आहे !

**उज्व०**:—आपण दाद घेत नाहीं तर आतां मीं कुणाचा धांवा करावा ? प्रद्योतराय, तुम्ही कुठे आहां ? कुठे असाल तिथून उड्या घालीत या, आणि मला या संकटांतून मुक्त करा ! ( चित्रभानु हर्षानें उज्वलेस जवळ येण्याविषयीं खूण करतो. )

**सुमं०**:—( हंसत ) अरे कांचना, त्या चित्रभानूकडे पहा तरी एकदां ! गुलाम कसा हर्षानें वेडा झालेला दिसतो आहे !

**कांच०**:—हर्षानें वेडा होईल तर काय झालें ? गुलामा, असली छान-छबेली बायको मिळवायला पूर्वजन्मीं कुठे तपश्चर्या करायला बसला होतास न कळे !

**उज्व०**:—कांचनदादा, आक्का, ही माझ्या बोटांतली आंगठी पहा ! ही आंगठी प्रद्योतरायाची मी वाग्दत्त वधू असल्याचें सर्वांना जाहीर करते !

**कांच०**:—तुझी विनवणी आम्ही ऐकत नाहीं !

हे यज्ञदेवा श्रीकृष्णा ! हा माझा आत्मयज्ञ तुलाच समर्पण असो ! कृष्णार्पण ! कृष्णार्पण ! कृष्णार्पण ! ( तीनदां नमस्कार करते व मूर्च्छित पडते. आश्चर्यानें व भयानें सर्व चकित होतात. चंचरीक व मल्लिका यांसह सारंगदेव धावऱ्या धावऱ्या प्रवेश करतो. )

**सारंग०**:–( उज्वलेस पाहून ) हाय हाय रे दुर्दैवा ! ( छातींत खंजीर खुपसून घेऊं लागतो तों कृष्णदेव त्याचा हात धरतो व खंजीर हिसकावून घेऊन फेंकून देतो. )

**कृष्ण०**–हां ! हां ! सारंगदेवा, आतां हा तरी मूर्खपणा करूं नकोस ! स्वस्थ रहा. आधीं उज्वलेला सावध करण्याचा उपाय पाहिला पाहिजे. ( कोणी तिला वारा घालतात व कोणी पाणी शिंपडतात. )

**मल्लि०**:–ताईसाहेब, सावध व्हा हो ! माझ्याशीं एक तरी शब्द बोला !

**नर०**:–( मल्लिकेस ) घाबरूं नकोस. ही शुद्धीवर येत चालली आहे. ( चित्रभानु आपल्या गळ्यांतली चंपकमाला काढून उज्वलेच्या गळ्यांत घालतो व तिच्या बोटांतली अंगठी काढून आपल्या बोटांत घालतो. )

**उज्व०**:–( दचकून चावळते. ) हां ! हां ! प्रद्योतरायाखेरीज माझ्या अंगठीला कुणी, हात लावायचा नाहीं ! खबरदार ! ( सावध होऊन भीतीनें व आश्चर्यानें ) ही माझी चंपकमाला माझ्या गळ्यांत कशी आली ? आणि माझी अंगठी कुणीं घेतली ? ( चित्रभानु तिच्या कानांत कांहीं सांगतो. हर्षानें ) असें आहे काय ? मी धन्य धन्य झालें ! ( आनंदानें डोळे मिटून चित्रभानूस मिठी घालते. )

**सुमं०**:–कांचना ! नरवाहन सांगतो त्याप्रमाणें उज्वलेला खरेंच वेड लागलें ! पहा कशी त्या ओंगळ माणसाला मिठी घालून आनंदानें नाचते आहे ! ( दोघें भीतिपूर्वक उज्वलेकडे पहातात. )

**सारंग०**:–हाय हाय ! उज्वले, तुझ्यासाठीं मी माझें राज्यसुद्धां गमावलें ! अशी तूं माझी लाडकी बहीण मला नकळत इथे शत्रूच्या घरीं येऊन याप्रमाणें स्वतःची विटंबना करून घेतलीस आणि त्यांतच हर्ष मानतेस याला म्हणावें तरी काय ?

**उज्व०**:–दादा, तुझें राज्य तुला परत मिळावें म्हणून हें कर्म मीं केलें व याबद्दल मला दुःख न होतां उलट आनंदच होत आहे !

**सारंग०**:–अरेरे ! कृष्णदेवा, तूं माझ्या बहिणीचें उच्चाटन करून तिला इथे आणलेंस आणि मोहनी घालून तिची बुद्धि भ्रष्ट केलीस यांत



**उज्वला०**:–हे यज्ञदेवा श्रीकृष्णा। हा माझा आत्मयज्ञ तुलाच समर्पण असो! कृष्णार्पण! कृष्णार्पण! कृष्णार्पण!

( मूर्च्छित पडते. ) ( पृ. १३४ )

कांहीं संशय नाहीं ! तूं राक्षसी अंतःकरणाचा मांत्रिक आहेस ! असलें हें नीच कर्म करण्यांत तुला काय मोठेपणा वाटला असेल तो असो !

**कृष्ण०:**—अरे, माझा मोठेपणा काय होता तो तूं कुत्र्याच्या शेंपटीला बांधून छावणींतून हिंडवलास ! आतां माझ्याकडून मोठेपणाची अपेक्षा कशाला करतोस ?

**सारंग०:**—मल्लिके, मल्लिके, आण तो खंजीर इकडे ! या अंधळ्या विद्रूप माणसाचा प्राण घेऊन माझ्या अपमानाचें हें लांछन कायमचेंच नाहींसें करतों !

**कांचन०:**—सारंगदेवा, आतां त्या माणसाचें तुला लांछन कां वाटतें ? तूं भरदरबारांत माझ्यासमोर एकडोळे, लंगडे, काळे, विद्रूप लोक मुद्दाम आणून त्यांच्या हातें मला मेजवानी दिली होतीस ! त्यावरून मला वाटलें कीं, तसलेच लोक तुला फार आवडत असतील ! आणि म्हणून तसलाच एक माणूस मुद्दाम शोधून काढून आम्हीं त्याबरोबर तुझ्या बहिणीचें लग्न लावून दिलें आहे !

**सुमं०:**—सारंगदेवा, तूं माझ्या नांवाला काय दूषण लावलें होतेंस तें आठवतें आहेना ? तें उसनें फेडण्याकरतां मीं तुझ्या बहिणीची अशी दुर्दशा केली याचें वैषम्य मानूं नकोस !

**कांचन०:**—तुझ्या बहिणीला मी धरून आणून बटीक म्हणून राबवीन असें त्यावेळीं मी बोललों होतों तें खरें करून दाखवलें कीं नाहीं !

**कृष्ण०:**—सारंगदेवा, उज्वलेनें लोकोत्तर धैर्य दाखवून तुझ्या राज्याचा बचाव केला आहे. ती आपण होऊन माझ्या स्वाधीन झाली आणि माझें दास्य तिनें खुषीनें पतकरलें, त्यामुळेंच मीं तुझी कैदेंतून मुक्तता केली आहे व तुझें राज्य तुला परत दिलें आहे; त्याचा उपभोग तूं खुशाल घेत रहा. आतां आपल्या बहिणीची अधिक पंचाईत कशाला करतोस ?

**सारंग०:**—जळो तें राज्य आणि जळो तें वैभव ! बहिणीच्या लज्जेचें मौल्य देऊन राज्य विकत घेण्यांत काय शोभा आहे ? कृष्णदेवा, मी तुझी प्रार्थना करतों कीं, मला राज्य नको, कांहीं नको ! माझी बहीण मला त्या चित्रभानूच्या ताब्यांतून काढून परत देशील तर तुझे मोठे उपकार होतील !

**कृष्ण०:**—आम्हीं तुझी बहीण तुझ्या ताब्यांतून काढूनही घेतली नाहीं व तिची विटंबनाही केली नाहीं. अजूनसुद्धां ती चित्रभानूला सोडून तुझ्याबरोबर येत असेल तर तिला खुशाल आपल्या देशाला घेऊन जा! आमची कांहीं हरकत नाहीं.

**उज्वला०:**—दादा, मी आपण होऊन ज्यांच्या गळ्यांत माळ घातली ते हे चित्रभानु तुम्हां सर्वांना कसेही दिसले तरी ते मला फार सुंदर दिसतात आणि ते मला प्रिय आहेत व पूज्य आहेत!!! मी त्यांना कधींही सोडणार नाहीं!

**सारंग०:**—राज्य गेलें, अपकीर्ति झाली, हातची बहीणही गेली! हाय हाय! दुनियेंत माझ्यासारखा हतभागी कोण सांपडणार आहे!

**नर०:**—सारंगदेवा, गर्वानें चढून गेलेल्या माणसांना शेवटीं अशाच विपत्ति भोगाव्या लागत असतात बरें!

**सारंग०:**—होय होय! आतां माझा गर्वभंग झाला आहे. संकटांनीं चोहोंकडून कोंडमारा केल्यामुळें माझा जन्म शून्यवत् झाला आहे. यांतून कृष्णदेवा, जर मला तारशील तर तूंच तारशील! मी तुला शरण आहें.

**कृष्ण०:**—( हर्षानें ) हेच शब्द तुझ्या तोंडांतून निघण्याची मी आज इतके महिने वाट पहात होतों! आतां चिंता करूं नकोस. जें जें तुला विपरीत दिसतें आहे तें तें सर्व तुझ्या मनाप्रमाणें यथास्थित आहे असेंच तुला समजून येईल' तूं मला मांत्रिक म्हटलेंसच आहेस. तर आतां माझ्या मंत्रसामर्थ्याचा चमत्कार दाखवतों तो पहा!

**सुमं०:**—( कांचनास ) आतां हे कसला चमत्कार दाखवणार न कळे!

**कृष्ण०:**—सुमंगले, कांचना, तुम्हीं सुद्धां हा चमत्कार पाहण्याजोगा आहे. उज्वले, आपल्या पतीसह पुढें येऊन सारंगदेवाला प्रणाम कर.

**सारंग०:**—( रागानें ) उज्वलेजवळ तो प्राणी उभा आहे तो मनुष्यकोटींतला नसून कुणी भूत, पिशाच, राक्षसांपैकीं असला पाहिजे! तो माझ्याजवळ येईल तर मुष्टिप्रहारानें त्याच्या मस्तकाचें चूर्ण करीन!

**कृष्ण०:**—( हंसत ) बरें बुवा! तसें नको असेल तर राहिलें! अरे चित्रभानु, ज्या रूपामुळें तूं सारंगदेवाला भूत–पिशाचाप्रमाणें भासतो आहेस तें तुझें रूप टाकून देऊन प्रकट हो कसा! ( प्रद्योत चित्रभानूचा वेष टाकून प्रकट होतो. )

**सारंग०:**—कोण? तुम्ही प्रद्योतराय! या! या प्रद्योतराय! मला आलिंगन द्या! ( सारंगदेव व प्रद्योत भेटतात. )

**सुमं०:**—( रागानें व आश्चर्यानें ) अरे कांचना, जांबुवंतांनीं आपल्याला फसवलं!

**कांचन०:**—आमच्या डोळ्यांत धूळ फेंकली!

**सुमं०:**—कैसानें गळा कापला!

**कांचन०:**—दिवसाढवळ्या दरोडा घातला!

**सुमं०:**—उज्वलेचें प्रद्योताशीं लग्न!

**कांचन०:**—आणि तें जांबुवंतानीं आम्हांकडून लाववलें!

**कृष्ण०:**—सारंगदेवा, तूं कांचनाजवळ बैस. उज्वले, तूं सुमंगलेजवळ बैस. या, प्रद्योतराय, तुम्ही असे माझ्याजवळ बसा. कुबड्याशेटानें तुमचा कांहीं तरी उपयोग केला एकूण! असो. आतां सर्वजण आपापसांतले कलह शांत झाल्यामुळें आनंद करूं या!

**सुमं०:**—महाराज, मला व कांचनाला आपण फसवलैंत, आमचा हेका तडीस जाऊं दिला नाहींत, मग आम्हीं हर्ष कां मानावा?

**कृष्ण०:**—कां बरें? सर्वांपेक्षां आज तुम्हांलाच अधिक हर्ष झाला पाहिजे! उज्वलेसंबंधाचे तुमचे बेत जर मीं तडीला जाऊं दिले असते, आणि ती तुमची कोण हें मागून कळलें असतें, तर तुम्हांला अतिशय दुःख झालें असतें! सारंगदेवा, तुझा चुलता भैरवदेव याचीं जयंत व जयंती या नांवाचीं दोन मुलें मीं मारून टाकलीं म्हणून तूं समजत होतास तीं हीं कांचन व सुमंगला तुझ्या दृष्टीस पडताहेत!

**सुमं०:**—( आश्चर्यानें ) एकूण उज्वला माझी चुलत बहीण! कांचना, जिनें तुला बहीण म्हणायला लावलें ती तुझी खरोखरीच बहीण होती एकूण! ( उज्वलेला आलिंगन देते. ) ताई, तुझें मन किती उदार! आणि आमच्या कुळांत मीच कशी क्षुद्र स्वभावाची निघालें!

**कांचन०:**—ताइ, माझ्या हातून जें जें अज्ञानानें झालें त्याबद्दल क्षमा कर.

**सारंग०:**—जयंती! जयंता! तुम्ही मला पुन्हा भेटलांत, वास्तव हा माझ्या जन्मांतला उत्तमोत्तम दिवस होय! आमच्या हातून न कळत ज्या ज्या गोष्टी झाल्या त्याबद्दल मात्र फार वाईट वाटतें.

**कृष्ण०:**—सर्वांच्याच हातून अज्ञानामुळें परस्परांचे अपराध झालेले आहेत, पण त्यांबद्दल मनाला कुणीही वाईट वाटून घेण्याचें कारण नाहीं. सारंगदेवा, तुझें राज्य तुला परत दिलेंच आहे. ज्या सीमांत देशाबद्दल तुझा व माझा तंटा होता तो देश मीं प्रद्योत व उज्वला यांस बक्षीस दिला आहे.

**उज्व०:**—कृष्णदेवमहाराज, आम्हा सर्वांना आजचा आनंदाचा दिवस आपण दाखवला हे आपले केवढे उपकार!

**कृष्ण०:**—पण आजचा माझा आनंद तुम्हा सर्वांहून विशेष आहे. कारण कीं राष्ट्रधर्माच्या चिंतामणीपुढें कृष्णकांचन मृत्तिकेसमान आहे हें जगाचा अभ्युदय करणारें ज्ञान मला नवीन प्राप्त झालें! तर आतां शेवटीं ज्याच्या लीलेमुळें हें सर्व घडून आलें त्या श्रीकृष्ण परमात्म्याला शरण जाऊन आपण त्याची प्रार्थना करूं.

## भरतवाक्य.

**राग**—हिंदोल. **ताल**—त्रिवट.

**तुज रमेशा प्रार्थितों। गत-गद करिं जन-पद**
**सुभाग्य-संभार दुणावो ॥ ध्रु० ॥**
**बलोच्छेद-कर गृह-कलि न घडो। रिपु-मति बिघडो ॥**
**बुध जन-गुरु-पद पावोनि संताप-संतान दुरावो ॥ ४६ ॥**

( पडदा पडतो. )

## अंक चौथा समाप्त.

## संगीत कृष्णकांचन नाटक समाप्त.

# ऐतिहासिक-लेख-संग्रहांतील
## विषयानुक्रम.

भाग पहिला—सन १७६० जानेवारी ते १७६३ मेपर्यंत. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीची अखेर–माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें–मोंगलांची पुण्यावर स्वारी–लढाया व तह–माधवराव व राघोबादादा यांमध्यें वितुष्ट–घोडनदीची लढाई–समेट–राघोबाची पटवर्धन वगैरे सरदारांवर गैरमर्जी–मिरजेचा वेढा–मोंगलांची पुण्यावर दुसरी स्वारी–पुण्याचा विध्वंस–पेशव्यांची मोंगलाईवर स्वारी. डे. अ. पृ. ४८०.

भाग दुसरा—सन १७६३ मे ते १७६४ डिसेंबरपर्यंत. राक्षसभुवनाची लढाई–मोंगलांशीं तह–हैदरअल्लीचें मनोवेधक चरित्र–पेशव्यांची हैदरअल्लीवर पहिली स्वारी–रटेहळ्ळी, अनवटी, हाविरी येथील लढाया–सावनूरचें रक्षण–धारवाडचा वेढा. डे. अ. पृ. ४८०.

भाग तिसरा—सन १७६४ डिसेंबर ते १७६९ ऑक्टोबरपर्यंत. अनंतपूर व बिदनूर येथील लढाया–हैदरअल्लीशीं तह–भोंसल्यावर पहिली स्वारी–तोतयाप्रकरणाचा उद्भव–राघोबाची गोहद वगैरे उत्तरप्रांतीं स्वारी–पेशव्यांची हैदरअल्लीवर दुसरी स्वारी–शिरें, मदगिरी, चेनरायदुर्ग येथील लढाया–तह–माधवराव व राघोबा यांची आनंदवल्लीस भेट–घोडपची स्वारी व राघोबास कैद–भोंसल्यावर दुसरी स्वारी. डे. अ. पृ. ४८०.

भाग चवथा—सन १७६९ ऑक्टोबर ते १७७३ ऑगस्टपर्यंत. भोंसल्यांशीं तह–हैदरअल्लीवर तिसरी स्वारी–कोल्हार, बाळापुर, नंदीदुर्ग वगैरे ठिकाणीं लढाया–हैदराचा गोपाळरावावर छापा-निजगलचा वेढा–पेशवे देशीं येतात–गोपाळरावाचा मृत्यु–त्रिंबकराव मामाचे पराक्रम–मोतीतलावाची लढाई–श्रीरंगपट्टणाचा वेढा–तह–बिनीवाल्यांची फत्तरगडावर स्वारी–जाटांशीं लढाई–बादशहाची स्थापना–दिल्लीची लढाई–रोहिल्यांवर सूड–पेशव्यांचा आजार व त्यांतील अनेक हृदयद्रावक प्रसंग–मृत्यु–रमाबाईचें सहगमन–नारायणरावाची पेशवाईवर स्थापना–छोटी कारकीर्द व खून. डे. अ. पृ. ६००.

भाग पांचवा—स. १७७३ ऑगस्ट ते १७७६ जुलईपर्यंत. बारभाईचें कारस्थान–निजामअल्लीशीं लढाई व भेट–गंगाबाईची स्थापना–कासेगांवची लढाई–राघोबाचा पाठलाग–समेटाची खटपट व राघोबाचें पलायन–गुजराथची मोहीम–इंग्रजांशीं लढाया–पुरंदरचा तह–कोळ्यांचा दंगा–प्रतिनिधींचा दंगा–कोल्हापूरकराशीं लढाया–तोतयाच्या बंडाची सुरुवात. डे. अ पृ. ६००.

भाग सहावा—स. १७७६ ऑगस्ट ते १७७८ एप्रिलपर्यंत. तोतयाच्या बंडाचा बीमोड–परशुरामभाऊंची कोल्हापुरावर मोहीम–पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी–

सावशीची लढाई व सैन्याची वाताहत–परशुरामभाऊ कुमकेस जातात–त्यांच्या गनिमी हालचाली–पाळेगारांचें पारिपत्य–भाऊ व हरिपंत यांची धारवाडप्रांतीं छावणी–हैदरअल्लीवर पांचवी स्वारी–महादजी शिंद्यांची कोल्हापुरावर स्वारी–मोरोबादादाचें कारस्थान–उभारणी व चलती–कर्नाटकच्या फौजा देशीं परत येतात. डे. अ. पृ. ६००.

**भाग सातवा**—सन १७७८ एप्रिल ते १७८४ एप्रिलपर्यंत. मोरोबादादाचें कारस्थान (उत्तरार्ध) व पारिपत्य–दरबारची डळमळ–परशुरामभाऊ स्वारीस निघतात–बेरड बंडखोरांचा दंगा–भाऊंची सुरापुरावर स्वारी–इंग्रजांची पुण्यावर स्वारी–पराजय व वडगांवचा तह–करवीरकरांचा बंदोबस्त–कित्तूरकरांचें पारिपत्य–इंग्रजांशीं तिसरा बिघाड–इंग्रज गुजराथ व्यापितात–वसई व कल्याण घेतात–पुण्यावर चालून येतात–पटवर्धनांशीं निकरानें लढतात–रसदेची लूट व पीछेहाट–सालबाईचा तह–स्वस्थतेचीं दोन वर्षे–काशीयात्रा–करवीरकरांचा पुन्हां बंदोबस्त व तह. डे. अ. पृ. ६१०.

**भाग आठवा**—सन १७८४ मेपासून १७९१ फेब्रुवारीअखेरपर्यंत–मराठे व मोंगल यांच्या यादगीर येथें भेटी–टिपूचा नरगुंदास वेढा–नरगुंदकरांची मर्दुमी–परशुरामभाऊ कुमकेस येतात–झटापटी–तह–टिपू दगा करून नरगुंद व कित्तूर घेतो–टिपूवर पहिली मोहीम–होळकर व बेहरे कित्तूर प्रांतीं येतात–मराठे व मोंगलांच्या पुनः भेटी–बदामी–अदवानी–टिपू मराठे व मोंगल यांस छापे घालून हैराण करितो–तह–स्वस्थतेचीं पुनः तीन वर्षे–पेशवे नाशिकास जातात–परभू ग्रामण्यप्रकरण पुन्हां उद्भवतें–सोनार व वेदोक्त–टिपूवर दुसरी मोहीम–मराठे, मोंगल व इंग्रज एकत्र होतात–परशुरामभाऊंचा धारवाडास वेढा–निकराच्या लढाया–इंग्रजांची मर्दुमी–बातेऱ्या, पेठ, रेवणी, व खंदक यांवर हल्ले.

**भाग नववा**—सन १७९१ मार्च ते १७९६ नोव्हेंबरपर्यंत–धारवाड काबीज होतें–म्हैसूर राज्यावर स्वारी–बांकी नबाबाचा पराजय–इंग्रजांची श्रीरंगपट्टणावर स्वारी व पीछेहाट–इंग्रजी व मराठी लष्करांच्या भेटी–इंग्रजांचा पट्टणास वेढा–घाशीराम कोतवाल–पाटीलबावा देशीं येतात–श्रीमंतांची कृष्णास्नानार्थ स्वारी–साताऱ्यास महाराजांची भेट–टिपूशीं तह–पाटीलबावांचा पुण्यास मुक्काम–वकीलमुतलखी–नानाशीं वैमनस्य–सचिव प्रकरण–गायकवाडांची सरदारी–पाटीलबावांचा मृत्यु–अळत्याची लढाई–करवीरकरांवर मोहीम–खड्यांची स्वारी–खड्यांची लढाई–सवाई रावसाहेबांचा मृत्यु–बाजीरावसाहेब पुण्यास येतात–शिंद्यांचें प्राबल्य–नाना साताऱ्यास जातात–शेणवी कारभारी व पटवर्धन सरदार यांचा मिलाफ–चिमर्जीआप्पाची स्थापना व छोटी कारकीर्द–नाना वाईस जातात–महाडाकडे पळतात–महाडचें कारस्थान–शेणवी व पटवर्धन यांचा पाडाव–परशुरामभाऊंस कैद. डे. अ. पृष्ठें ६०० किंमत ३ रुपये.

[library stamp] ... ग्रंथालय ...
... २०६ ...
अधिकारयोग

एकाहून एक बलिष्ठ अशा प्रतिस्पर्ध्यांवर मात करून नाना फडनवीस यांनीं राज्याधिकार कसा मिळविला व पेशवाईवर आलेल्या दुर्धर संकटांचें निवारण चातुर्यानें कसें केलें, याचें सप्रमाण वर्णन सरदार परशुरामभाऊ वगैरेच्या लेखांतले उतारे देऊन या पुस्तकांत केलें आहे. किं. ०१०. पो. ०१.

## हरिवंशाची बखर.

या पुस्तकांत पटवर्धन सरदारांच्या व पेशवाईंतील प्रमुख मुत्सद्दी व सरदार यांच्या फारच मनोरंजक आख्यायिका दिल्या असून त्यांतल्या प्रसंगवर्णनाची शैली बहारीची आहे. किं. ०१०. पो. ०१.

## ऐतिहासिक-लेख-संग्रह.

या पुस्तकांत पटवर्धन सरदारांच्या जुन्या दप्तरांतील ऐतिहासिक महत्त्वाचे अस्सल कागदपत्र आम्ही साळवारी व प्रकरणवारी लावून तारीख, महिना व सन यांच्या अनुक्रमानें छापीत आहों. प्रत्येक पत्रावर तारीख, महिना, सन व आंतल्या मजकुराचें हेडिंग दिलें असून अर्थाची फोड करणाऱ्या भरपूर टीपा दिल्या आहेत. शिवाय प्रत्येक प्रकरण छापतांना त्यांतल्या विषयाचें सुसंगत विवेचन करणारी एक एक प्रस्तावना जोडिली आहे. पानपतच्या युद्धापासून तों तहत बाजीरावीच्या अखेरीपर्यंतचा इतिहास या पुस्तकांत येत असून तो त्या काळांतील पेशवे, प्रमुख मुत्सद्दी व सरदार यांच्याच शब्दांनीं वर्णिला जात आहे ! या पुस्तकाचे नऊ भाग आतांपर्यंत छापले आहेत, त्यांत पहिले दोन आतां मिळत नाहींत. बाकीच्या सात भागांची किंमत २१ रु. आहे तरी एकदम घेणारास १६ रु. पडतील. शिवाय पोस्टेज १॥ रु. पडेल.

**वासुदेव वामन खरे. मिरज.**

# उपयुक्त पुस्तकें.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| १. **श्रीतुकाराममहाराजांची सांप्रदायिक गाथा.** कापडी बांधणी, अक्षर मोठें ... | २—८—० |
| २. **श्रीतुकारामचरित्र** ओंवीबद्ध. पुस्तक साईज. टाईप मोठा ... ... ... | ०—१२—० |
| ३. **दक्षिणेंतील शेतीची सांपत्तिक स्थिति.** ( श्री० बाबासाहेब घोरपडे चीफ ऑफ इचलकरंजी यांनीं तयार केलेलें ) ... | १—८—० |
| ४. **गांवगाडा.** रावसा. त्रिं. ना. अत्रे कृत | १—४—० |
| ५. **सार्थ वाग्भट.** कै. डॉ. गणेश कृष्ण गर्दे कृत भाषांतर, मूळ श्लोक, भरपूर टीपा सूचीसह | १०—०—० |
| ६. **भारतीय ज्योतिःशास्त्र** अथवा भारतीय ज्योतिषाचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास—कै० शं. बा. दीक्षित कृत ... | ३—४—० |
| ७. **कुवलयपूरची राणी कुमुद्वती**—मनोरंजक कादंबरी... ... ... | १—०—० |
| ८. **जर्मनींतील लोकशिक्षण.** डॉ० पी. डी. गुणेकृत ... .. ... | ०—१२—० |
| ९. **सद्यःस्थिति.** लेखक 'लक्ष्मीतनया' ... | ०—१२—० |
| १०. **गोपाळ कृष्ण गोखलेचरित्र** ... | ०—४—० |
| ११. **राष्ट्रीय सभा**—तिची उत्पत्ति व वाढ, सर्व अध्यक्षांचे फोटोसह ... ... | ०—८—० |
| १२. **वधूवरपत्रिकासंमेलन** आणि कोंकणस्थ व कऱ्हाडे यांची **गोत्रावळी** ... | ०—४—० |
| १३. **गीताधर्म** अथवा **गीतारहस्यखंडन.** य. व्यं. कोल्हटकर कृत ... ... | १—८—० |

किंमतीशिवाय टपालखर्च वेगळा पडेल.

**मॅनेजर—आर्यभूषण प्रेस, पुणें.**

## रा. रा. हरि नारायण आपटे यांनीं लिहिलेले ग्रंथ.

### कादंबऱ्या. (ऐतिहासिक) किं० रु० आ०

१. उषःकाल ( अडीचशें वर्षांपूर्वीचें महाराष्ट्र. ) २—०—०
२. गड आला पण सिंह गेला ! ... ...०—८—०
३. रूपनगरची राजकन्या ( आवृत्ति दुसरी.)...२—०—०
४. चंद्रगुप्त (पंचवीसशें वर्षांपूर्वीचें हिंदुस्थान.) ...१—०—०
५. वज्राघात ! ... ... ... ... ...१—८—०

### कादंबऱ्या (सामाजिक).

१. आजकालच्या गोष्टी ( मधली स्थिति. ) ...२—०—०
२. पण लक्षांत कोण घेतो ! ... ... ...२—०—०
३. भयंकर दिव्य ! ... ... ... ...२—४—०
४. जग हें असें आहे ! ... ... ... ...२—०—०
५. मायेचा बाजार. ... ... ... ...२—०—०
६. मी. ... ... ... ... ... ...२—०—०
७. यशवंतराव खरे. ... ... ... ...१—८—०
८. चाणाक्षपणाचा कळस. ... ... ...०—१२—०

### व्याख्यानें.

१. मराठी वाङ्मयाचा अभ्यास. ... ....०—४—०
२. विदग्ध वाङ्मय. ... ... .... ...०—३—०
३. मुलांस उपदेश. .... ... .... ...०—८—०
४. अकोलें येथील व्याख्यान. ... ...०—२—०

### नाटकें व प्रहसनें.

१. संगीत संत सखूबाई. ... ... ...०—१२—०
२. तीन नाटकें व तीन प्रसहनें. ... ...१—८—०
[ १ जयध्वज. २ श्रुतकीर्तिचरित. ३ सुमतिविजय.
४ धूर्तविलसित. ५ मारून मुटकून वैद्यबुवा. ६ जबरीचा विवाह.]
३. भासकवीच्या नाटककथा ... ...०—१२—०

### गोष्टी.

१. स्फुट गोष्टी, भाग १, २, ३, ४. प्रत्येकीं ०—८—०
२. कसे दिवस गेले !! (प्लेगच्या कहरांतील एक गोष्ट) ०—२—०

☞ किंमतीशिवाय टपालखर्च वेगळा पडेल.

मॅनेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें सिटी.

विक्रीस तयार ! विक्रीस तयार !

# केशवसुत यांची कविता.

**किंमत १२ आणे.**

कविश्रेष्ठ केशवसुत यांची सर्व कविता एकत्र पुस्तकरूपानें वाचावयास मिळावी अशी पुष्कळ लोकांची उत्कंठा होती. त्याप्रमाणें त्यांचीं सर्व प्रसिद्ध-अप्रसिद्ध काव्यें मोठ्या प्रयत्नानें जमवून रा० हरि नारायण आपटे यांनीं या पुस्तकांत प्रसिद्ध केलीं आहेत. पुस्तकांत सुमारें १२५ प्रकरणें असून क्राऊन सांचाचीं पृष्ठें सुमारें २०० आहेत. त्या मानानें **बारा आणे** किंमत कोणासहि माफकच वाटेल. **मॅनेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें.**

# जर्मनींतील लोकशिक्षण.

लेखकः—**डॉ. पां. दा. गुणे**, एम. ए., प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज, पुणें.

प्रो. डॉ. गुणे यांस डी. ई. सोसायटीनें संस्कृताचा अभ्यास करण्याकरितां जर्मनींत पाठविल्यावेळीं त्यांनीं तेथील शिक्षणपद्धतीची माहिती मिळवून ती त्या त्यावेळीं 'ज्ञानप्रकाशच्या' द्वारें प्रसिद्ध केली होती. सदर माहितींत भर घालून प्रस्तुतचें पुस्तक तयार केलें आहे. जर्मनींत हिंदी गृहस्थास लहानसहान गोष्टींबद्दलसुद्धां किती अडचणी येतात याची कल्पना या पुस्तकावरून चांगली येईल. जर्मनीच्या शिक्षणपद्धतीचा जर्मनीच्या मोठेपणास खरा उपयोग झाला आहे. तेव्हां तेथील शिक्षण-पद्धतीचें तुलनात्मक ज्ञान होण्यास मराठींमध्यें एखाद्या पुस्तकाची अवश्यकता असल्यामुळें प्रस्तुतचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. ह्या पुस्तकाचा उपयोग शिक्षणाचें पुण्यकारक काम शिरीं घेतलेल्या लोकांस व इतरांसही होणार आहे. पुस्तकाचीं क्राऊन सोळा पेजी १५० वर पानें आहेत.

टपालहंशिलाशिवाय **किंमत बारा आणे.** पुस्तकें खालील पत्त्यावर व पुणें-मुंबई येथील प्रमुख बुकसेलर्स यांचेकडे मिळतील.

**मॅनेजर—आर्यभूषण प्रेस**, बुधवार पेठ **पुणें**,

**मॅनेजर—मुंबईवैभव प्रेस**, सँढर्स्ट रोड, गिरगांव **मुंबई.** नं ४.

**उज्व०:**–महाराज, अहो राणीसाहेब, अहो अमात्य, असे निष्ठुर होऊं नका ! तुम्हांला कांहीं तरी माझी दया येऊं द्या !

**राग**–जिल्हा. ताल–दीपचंदी.

**माया कैसी हो हृदया तूमचिया येईना ॥ ध्रु० ॥**
**मम असे नाथ मनाचा । स्वामी कैसा मी ।**
**नाठवूं पाप हें । मज होईना ॥ ४४ ॥**

**सुमं०:**–( सिंहासनाखालीं उतरून उज्वलेचा हात धरते. ) कार्टे ! माझा कांचन तुला आवडला नाहीं, आणि तो प्रद्योत तुला बरा वाटला नव्हे का ? आतां कांचन नाहीं नी प्रद्योत नाहीं ! हा मदनाचा पुतळा तुझ्यासमोर उभा आहे याचीच तूं बायको व्हायचीस ! तेल गेलें, तूप गेलें आणि धुपाटणें हातीं आलें असें म्हणतात ना ? घे तें धुपाटणें हातांत आणि बस जन्मभर रडत ! कांचना, तूं उज्वलेचा भाऊ, आणि मी तिची बहीण नव्हें का ? तूं मुख्य वऱ्हाडी आणि मी मुख्य करवली ! आपण दोघें हिला धरून हिच्या नवऱ्याच्या हवालीं करूं या ! ( उज्वलेच्या हातांत पुनः माळ देऊं लागते. ती पुनः झिटकारते. )

**कांचन०:**–थांब आक्का, थांब ! उज्वले, प्रद्योतानें मला तुझ्या पायां पडायला लावलें तेव्हां तो काय म्हणाला होता बरें ? तेच शब्द मी आतां बोलतों ! “ मी वायफळ बोलून वेळ घालवणार नाहीं आणि तुझी सबुरीही करणार नाहीं ! ” मी तीन अंक म्हणतों तितक्यांत आम्ही सांगूं त्याप्रमाणें तूं या चित्रभानूच्या गळ्यांत माळ न घालशील तर तसें आम्ही तुझ्याकडून बळजबरीनें करवूं ! हां. एक–दोन–( उज्वला निस्तेज व स्तब्ध उभी राहते. कांचन तीन हा आंकडा म्हणणार तोंच कृष्णदेव त्यास थांबवतो. )

**कृष्ण०:**–थांबा, थांबा ! सुमंगले, कांचना, या उदार मनाच्या स्त्रीची छळणूक झालेली या उपर माझ्यानें पाहवत नाहीं ! आतां झालें इतकें बस झालें ! उज्वले, तुझ्या भावाचें राज्य सुरक्षित रहावें म्हणून तूं जिवाचा धडा करून ज्या कार्याला प्रवृत्त झालीस तें कार्य तुझ्या आटोक्याबाहेरचें आहे असें दिसून येतें; आणि यांत कांहीं नवलही नाहीं ! हें काम तुझ्या हातून तडीस जात नाहीं याबद्दल तुझ्या मनाला खंती वाटण्याचें कारण नाहीं. तूं करून दाखवलेंस हेंच फार आहे ! शाबास आहे तुझी ! आतां आपल्या भावाला राज्य मिळवून देण्याचा हेका सोडून दे आणि

खुशाल आनंदानें स्वस्थ रहा ! मी तुझें कोणतेंही न्यून पडूं देणार नाहीं. आणि तुझा देश काबीज केल्यावर प्रद्योताशीं तुझें खचित खचित लग्न लावून देईन.

**सुमं०**:—बाई, देशसेवा करण्याच्या गोष्टी फुकाच्या नाहींत बरें ! लोखंडाचे चणे खावे तेव्हां ब्रह्मपदाची प्राप्ति होत असते !

**उज्वला०**:—राणीसाहेब, हा उपदेश करण्याचा आपल्याला अधिकार नाहीं व याचें कांहीं कारणही नाहीं ! ( सुमंगलेच्या हातांतून माळ हिसकुन घेते. ) महाराज, माझ्या देशाच्या कल्याणासाठीं राणीसाहेब व अमात्य सांगतात त्याप्रमाणें मी या चित्रभानूच्या गळ्यांत आपण होऊन माळ घालतें ! !

**कृष्ण०**:—( निराशेनें ) असें करणार तूं? बरें ! वाटेल तसें वागायला तूं मुखत्यारच आहेस !

**उज्वला०**:—( स्वगत ) मीं प्रद्योतरायांना वरण्याविषयीं मनोभावानें शपथ घेतली असतां आतां ती शपथ मोडून या चित्रभानूला मीं वरावें आणि वैवर्त देशाच्या कल्याणासाठीं—मला प्राणाहूनसुद्धां प्रिय असें जें सत्य—तेंही सोडावें असें प्राप्त झालें ना ! या विश्वासघाताबद्दल प्रद्योतराय मला क्षमा करतील ही माझी खात्री आहे, पण परमेश्वर मलाक्षमा करील काय ? होय ! मी कशा प्रसंगांत सांपडलें आहें व कशी लाचार झालें आहें हें तो सर्वसाक्षी जाणीतच आहे ! आणि मी देशासाठीं सत्य सोडतें याचा अर्थ तरी परमेश्वरासाठींच सत्यापासून भ्रष्ट होतें असाच नव्हे काय ? कारण देश म्हणजे तरी परमेश्वराचें विराट्स्वरूपच होय ! ( कांहीं वेळ स्तब्ध राहून ) माझें मन गोंधळून गेलें आहे. हे श्रीकृष्णा ! या माणसाच्या गळ्यांत मी माळ घालण्याचें कृत्य करतें हें पाप आहे कीं पुण्य आहे हें मला समजत नाहीं ! हें कर्म मी तुलाच समर्पण करतें. याच्या पापपुण्याचा धनी तूंच हो !

**राग**—भैरवी. **ताल**—त्रिवट.

**पूजा तुझी हे गणुनि देशकार्या । हा देह दिला देवा ! ॥ ध्रु० ॥**
**कर्मफल न मम । मज नसे मीपण ॥**
**केलि अशा या भावें सेवा । हा देह दिला देवा ! ॥ ४५ ॥**

( चित्रभानूच्या गळ्यांत माळ घालते व तो तिच्या गळ्यांत माळ घालतो. )